
शनिवार, 23 जुलै 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 01
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

प्रथम वर्धापन दिन


● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 23 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-01 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-22 ● PRICE-5


# ईडीच्या हाती लागले मोठे घबाड

## पश्चिम बंगालमधील एसएससी घोटाळा प्रकरणात सक्तवसुली

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकाता : पश्चिम बंगालमधील एसएससी घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचलनालयानं आज छापे टाकले. ईडीमधील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या छापा सत्रातून एजन्सीच्या हाती जवळपास २० कोटी रुपयांची रोकड लागली. जप्त करण्यात आलेल्या नोटांचा फोटो ईडीनं ट्विट केला आहे. पश्चिम बंगाल स्कूल सर्व्हिस कमिशन आणि बंगाल प्राथमिक शिक्षण बोर्ड भरती घोटाळ्याचा तपास करण्यासाठी टाकण्यात आलेल्या छाप्यांची माहिती ईडीनं ट्विट करून दिली आहे.**



शिक्षक भरती घोटाळ्याच्या तपासासाठी आज पश्चिम बंगालच्या दोन मंत्र्यांच्या घरांवर छापे टाकण्यात आले. मंत्री पार्थ चॅटर्जी आणि परेश अधिकारी यांच्या घरांवर धाडी टाकण्यात आल्या. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ईडीचे सात-आठ अधिकारी सकाळी साडे आठ वाजता चॅटर्जी यांच्या निवासस्थानी पोहोचले. दुपारी ११ पर्यंत त्यांनी छापे टाकले. यावेळी केंद्रीय राखीव सुरक्षा दलाचे जवान चॅटर्जी यांच्या घराबाहेर तैनात होते.

ईडीच्या अधिकाऱ्यांच्या आणखी एक पथक कुचबिहार जिल्ह्यातल्या मेखलीगंजमधील अधिकाऱ्याच्या घरी पोहोचली. त्यांनी अधिकाऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांची चौकशी केली. शहरातील जादवपूर परिसरात असलेल्या पश्चिम बंगाल प्राथमिक शिक्षण बोर्डाचे माजी अध्यक्ष माणिक भट्टाचार्य यांच्या घरावरही अधिकाऱ्यांना छापे टाकले. सध्या उद्योग मंत्री असलेले चॅटर्जी, कथित घोटाळ्यावेळी शिक्षणमंत्री होते. सीबीआयने दोनदा त्यांची चौकशी केली आहे. २५ एप्रिलला त्यांनी पहिल्यांदा चौकशी केली. १८ मे रोजीदेखील त्यांची चौकशी करण्यात आली. सीबीआयने शिक्षणाधिकाऱ्यांचीदेखील चौकशी केली आहे.

### एसएससी घोटाळा काय आहे?

पश्चिम बंगालमधील एसएससी घोटाळ्यामध्ये सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये बेकायदेशीर नियुक्त्या करण्यात आल्या, असा आरोप आहे. हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर कोलकाता उच्च न्यायालयाने या घोटाळ्याची चौकशी सीबीआय मार्फत करण्याचे आदेश दिले होते.

### शिक्षकांच्या भरतीमध्ये भ्रष्टाचार

पश्चिम बंगाल शाळा सेवा आयोगाकडून अनुदान मिळणाऱ्या शाळांमधील क आणि ड वर्गातील कर्मचारी आणि शिक्षकांच्या भरतीमध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी होत्या. त्यांची दखल उच्च न्यायालयाने घेतली. यानंतर सीबीआयने प्रकरणाचा तपास हाती घेतला. या प्रकरणात मनी लॉण्ड्रिंग झाल्याचा संशय आहे. त्यामुळे ईडीनेदेखील कारवाई सुरू केली असून अनेक ठिकाणी छापे टाकले जात आहेत. या कारवाईत ईडीने २० कोटी रुपयांची रोकड जप्त केली आहे. तसेच या रोख रकमेसह पोलिसांनी २० मोबाईल फोन जप्त केले आहेत. जप्त करण्यात आलेली रोकड आणि मोबाईल हे स्कूल सर्व्हिस कमिशनमधील घोटाळ्याशी निगडित असल्याचा संशय ईडीला आहे.

## विशेष संपादकीय

# आधुनिक केसरी : आदर्श वृत्तपत्र

अतिथी संपादक




प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361


छत्रपती संभाजीनगर या नामांतर होऊ घातलेल्या औरंगाबाद या मराठवाड्याच्या राजधानीतून नित्यनेमाने प्रकाशित होत असलेले दैनिक अधुनिक केसरी म्हणजे एक आदर्श वृत्तपत्र, समाचार पत्र, बातमीपत्र आहे. अल्पावधीतच वाचकप्रिय झालेले हे दैनिक. आजच्या धावपळीच्या युगात सजग वाचकांना, जनसामान्यांना, वृत्तपत्र क्षेत्राशी जवळीक असलेल्या लेखक, विचारवंत, कवी, साहित्यिक यांना हरघडी मेजवानी देणारे बातमीपत्र आहे. विकत घेऊन सांभाळत बसायची गरज नाही. थोडी उसंत मिळाली, आरामाचा मूड असला, विरंगुळा हवा असला, तणावमुक्तता हवी असेल तर आमचा पेपर चोवीस तास सोबत राहू शकतो. अत्यंत सुबक मांडणी, सर्व क्षेत्रांना स्पर्श, नवकवींना, प्रतिभावान लेखकांना हे उत्तम व्यासपीठ उपलब्ध आहे. हा व्याप फक्त तीन दिग्गज हाताळतात. डॉ. प्रभू गोरे हे मुख्य संपादक आहेत. या वैचारिक चिरतरुण गृहस्थांनी चक्क अग्रलेखात, संपादकीयात डॉक्टरेट मिळवलेली आहे. अतिशय तळमळीने, अखंड ऊर्जेने गोरे अविरत कार्यरत असतात. येणारी प्रत्येक बातमी, लेख, प्रासंगिक लिखाण, सदर, कविता, मनोरंजन, राजकीय, सामाजिक विश्लेषण, धार्मिक, परंपरागत लिखाण, ताज्या घडामोडींचे यथार्थ वर्णन, सत्यता आदी सर्व डॉ. प्रभू गोरे स्वतः नजरेखालून घालतात, तपासून घेतात. संजय व्यापारी हे कविमनाचे आर्टिस्ट आहेत. पेपरमधील बातम्या, लेख, कविता, जाहिराती आदींची समर्पक आणि उठावदार मांडणी, पेपरचे सौंदर्य, आकर्षण हे संजय व्यापारी पाहतात आणि आमचे परममित्र, प्रोत्साहनवीर विभाकर खांदेवाले हे या पेपरचे सरव्यवस्थापक आहेत. हे तिघे मिळून या अधुनिक जगात आपली सोय करण्यासाठी झटत आहेत. हा आधुनिक केसरी पेपर अल्पावधीतच जवळपास पाच लाख वाचकांपर्यंत पोहोचला आहे. या पाच लाख वाचक वर्गात आमच्यासारखे या तिघांचे मित्र, स्नेही, हितचिंतक, सहकारी, कवी, लेखक, विचारवंत, अभ्यासक, विश्लेषक, ज्यांना हा पेपर पाठवतात ते इतर लाखो स्नेह्यांना फॉरर्ड करतात त्यांची गणती शक्य नाही. जसे मी स्वतः दररोज किमान बाराशे-पंधराशे मित्रांना, माझ्या क्लायंटस्ना तसेच नातेवाईकांना अंक पाठवत असतो. तो केवळ या तिघांच्या यज्ञाला मानाचा मुजरा म्हणून. आपणच आपल्या मित्रांच्या प्रतिभेला, प्रयत्नांना प्रोत्साहन दिलेच पाहिजे ना! शिवाय या वृत्तपत्राचा प्रचार-प्रसार करायला तुम्हाला काहीही पदरमोड करावी लागत नाही. मी प्रकाश पांडुरंगराव महागावकर, पुणे. नियमित लेखक आहे. माझ्या तुटक्या फुटक्या पद्धतीने काही विचार मांडत असतो आणि बाबा खांदेवालेच्या प्रेमापोटी खंड पडणार नाही याची काळजी घेत असतो तसेच डॉ. प्रभू गोरे, संजय व्यापारी आणि विभाकर खांदेवाले (बाबा) हे त्रिकूट कर्तेधर्ते असलेला हा न्यूज पेपर 2022 अखेरपर्यंत किमान दहा लाख वाचकांपर्यंत आणि तेही सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे तिघे धडपडत आहेत. अजून डिजिटल पेपर ही कल्पना सर्वदूर पसरायला थोडा वेळ लागेल. पण हे तिघेही ध्येयाने प्रेरित असलेले, उत्साही, आनंदी, संतुष्ट मंडळी. नफा नुकसान, कमाई या कशाचाच विचार न करता मिळतील त्या तुटपुंज्या जाहिरातीतून दैनंदिन खर्च भागवत आहेत. तेही कसेबसे. हे तिघेही स्वखर्चासाठी एक रुययाही उचल करू शकत नाहीत. परंतु आवड, नवीन काहीतरी करण्याची जिद्द आणि उदंड आशावाद या बळावर हा पेपर वाढवत आहेत, सुदृढ करत आहेत. सर्वांनी या तीनही विभूतींना आपापल्या परीने सहकार्य करावे आणि हा अविनाशी पेपर वाढवावा, अशी सर्व वाचकांना जाहीर विनंती करतो. माझ्याप्रमाणेच प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये, विनोद जैतमहाल, डॉ. विजय पांढरीपांडे, बाबासाहेब जोगदंड, सुधीर कोर्टीकर, डॉ. पुरुषोत्तम जुन्नरे, प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी), संजय जेवरीकर, डॉ. सविता बहिरट, डॉ. संध्या मोहिते, कस्तुरी देवरुखकर, सौ. आरती राजाराम परिचारक, दिलीप देशपांडे, आशिष निनगुरकर, मोहन दिवटे, विश्वास सोहोनी, सुनील शिरपुरे, गिरीश जोशी, सौ. उज्ज्वला धर्माधिकारी, प्रा. डॉ. प्रवीण बनसोड, सुरेश मंत्री, भानुदास धोत्रे, अय्युब पठाण लोहगावकर, सुरेश सिरसीकर, सतीश इंदापूरकर, गणेश खाडे, पंकज वसंत पाटील, विश्वास देशपांडे, डॉ. दीपाली उमाळे, किरण डोंगरदिवे, प्रकाश क्षीरसागर, रवींद्र मुळे, रमेश रावळकर, अमोल पुसदकर, संध्या सिनकर, सोनाली जगताप, श्रीमती नंदिनी देशमुख, विद्यावाचस्पती विद्यानंद अशी बरीच मंडळी नियमितपणे यात लिखाण करत असतात. तसेच अनेक लेखक, कवी, विचारवंत, अभ्यासक यात लिहीत असतात. सर्वांचा नामोल्लेख अवघड आहे मला. मी या सर्वांची क्षमा याचना करतो आणि सर्वांनाच विनंती करतो की या त्रिमूर्तींना बळ द्या !


# केंद्र-'आप' यांच्यात नवा संघर्ष

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्र सरकार आणि दिल्लीतील आम आदमी पक्षाचे (आप) सरकार यांच्यातील संघर्ष पुन्हा उफाळून आला आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या सिंगापूर दौऱ्यास परवानगी नाकारल्यानंतर आता नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी 'आप' सरकारच्या उत्पादन शुल्क धोरणाची केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) चौकशी करण्याची शिफारस केली आहे. उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना खोट्या प्रकरणात अटक करण्याचा हा डाव असल्याचा आरोप करत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शुक्रवारी केंद्र सरकारला लक्ष्य केले.

दिल्ली सरकारच्या नव्या उत्पादन शुल्क धोरणात प्रस्थापित कायद्याचे उल्लंघन केल्याचे दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांच्या कार्यालयाने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. मद्य उत्पादन परवानाधारकांना अयोग्य पद्धतीने आर्थिक लाभ देण्यासाठी उत्पादन शुल्क धोरणात जाणीवपूर्वक 'प्रक्रियात्मक त्रुटी' ठेवण्यात आल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे. त्यानंतर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शुक्रवारी उपमुख्यमंत्री आणि उत्पादन शुल्कमंत्री सिसोदिया यांना पूर्ण पाठिंबा व्यक्त केला आणि नायब राज्यपालांची कृती ही 'राजकीय सूड' असल्याची टीका केली. आम आदमी पक्षाचा विस्तार होत असल्याने भाजपला भीती वाटते, असा आरोपही त्यांनी केला. मी सिसोदिया यांना गेल्या २२ वर्षांपासून ओळखतो, त्यांच्याएवढा प्रामाणिक आणि देशभक्त नागरिक आजपर्यंत पाहिलेला नाही, अशी प्रतिक्रिया केजरीवाल यांनी व्यक्त केली. परंतु त्यांच्याविरोधातील ही तक्रार पूर्णपणे खोटी आहे. या प्रकरणात सत्यांश नाही. हे प्रकरण न्यायालयात उभेच राहू शकणार नाही. सिसोदिया हे एक प्रामाणिक व्यक्ती असून त्यांच्यावरील कथित आरोपांतून ते निर्दोष बाहेर पडतील, असे मुख्यमंत्री केजरीवाल म्हणाले.


देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद
अत्याधुनिक बँकिंग सेवा-सुविधांसह ३ हजार कोटींच्या व्यवसायाकडे वाटचाल करणारी
आपली बँक, देवगिरी बँक !
अत्याधुनिक बँकिंग सेवा देणारी अग्रगण्य बँक !
मोबाईल बँकिंग | ई-कॉमर्स | पीओएस सुविधा | आरटीजीएस / एनईएफटीद्वारे फंड ट्रान्सफर सुविधा
रूपे डेबिट कार्ड | एस.एम.एस. अलर्ट | ई-स्टेटमेंट सुविधा | लॉकर सुविधा
सीटीएस (चेक ट्रंकेशन सिस्टीम) | पर्सनलाईज्ड चेकबुक सुविधा | कंपन्यांचे वेतन सुविधा | विविध कर्ज योजना
ग्राहकांच्या समृद्धी आणि संपन्नतेसाठी
देवगिरी बँकेच्या विविध कर्ज योजना...
गृहकर्ज | वाहन कर्ज | शैक्षणिक कर्ज | वैयक्तिक कर्ज
व्यवसाय व उद्योगास कर्ज | प्रोफेशनलसाठी व्यावसायिक कर्ज | सुवर्ण तारण कर्ज
मुख्य कार्यालय : अर्थ कॉम्प्लेक्स, केसरसिंगपुरा, अदालत रोड, औरंगाबाद.
संपर्क : फो. ०२४०-२३३४१२१, २२४०२००, टोल फ्री नं. 9022 100 400
आजच गूगल प्ले स्टोअरवरून आमचे ॲप डाउनलोड करा !
Google Play




आधुनिक केसरी

# या सुखांनो या..

'लाईफ इज ब्युटीफुल' या चित्रपटात जोशुआ नावाच्या एका ज्यू व्यक्तीला नाझी सैनिक पकडतात आणि छळ छावणीत ठेवतात. या चित्रपटाला दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी आहे. नाझी सैनिक ज्यूंचा अनन्वित छळ करतात. आणि शेवटी त्यांची हत्या करतात. या जोशुआला त्यांनी पकडलेले असते. पण तो आपला कायम आनंदी. तो म्हणतो, 'तुम्ही माझ्या शरीराला यातना देऊ शकाल. पण माझ्या मनाला नाही. आनंदी राहायचे की नाही ते मी ठरवणार.' खरंच मला कौतुक वाटतं त्या जोशुआचं. इतक्या विपरीत परिस्थितीत तो आनंदी कसा राहू शकला ? त्याचे एकच कारण म्हणजे त्याची असलेली धारणा. त्याची धारणा ही की मला माझ्या मर्जीविरुद्ध कोणीही दुःखी करू शकणार नाही. पण जोशुआचं उदाहरण चित्रपटातलं म्हणून आपण सोडून देऊ. पण ते खोटं आहे असं मात्र नाही. कुठेतरी ही वस्तुस्थिती असल्याशिवाय दिग्दर्शकाने ते दाखवलेले नाही.

सुख आणि दुःख याच्यावर मी जेव्हा विचार करतो, तेव्हा मला वाटतं की सुख आणि दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कुठलाही प्रसंग किंवा घटना अगदी निर्भेळ अशी सुखाची किंवा दुःखाची नसतेच. सुखाच्या घटनेला अनेकदा दुःखाची किनार असते. आणि दुःखद प्रसंग सुद्धा बऱ्याच वेळेला वाईटातून चांगले घेऊन येतात. WHAT MATTERS IS OUR ATTITUDE TOWARDS LIFE. आपण त्या प्रसंगाकडे कसे बघतो त्यावर सर्व अवलंबून असते.

तुकाराम महाराज म्हणतात, 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे..' या उक्तीतून आपला असा समज होतो की खरोखरच सुख जवापाडे म्हणजे अगदी थोडे आहे आणि दुःख हे पर्वताएवढे म्हणजे प्रचंड आहे. पण तुकाराम महाराजांच्या या उक्तीत 'पाहता' असा शब्द आहे. पाहता म्हणजे आपल्याला वाटते. खरं म्हणजे तसे नसते. सुख आणि दुःख या SUBJECTIVE गोष्टी आहेत. जी गोष्ट एखाद्याला सुखाची वाटेल, तीच दुसऱ्याला दुःखाची वाटू शकते. पण आपल्याकडे लहानपणापासून अशा प्रकारची शिकवण मिळते की त्यामुळे जीवनात दुःख जास्त आहे आणि सुख कमी आहे अशी मनाची धारणा दृढ होते. त्यामुळे होतं काय की ज्या मोकळ्या मनाने आपण सुखाचा स्वीकार करतो, तेवढ्या मोकळेपणाने दुःखाचा स्वीकार करत नाही. दुःखाचा स्वीकार करताना आपण मोठ्या मनाने करतो. मोठ्या मनाने याचा विपरीत अर्थ घेऊ नका. मोठ्या मनाने याचा अर्थ या ठिकाणी आपण असे ठरवून टाकलेले असते की दुःख फार आहे, फार मोठे आहे. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### मनःशांती खूप महत्त्वाची

आधुनिक केसरी

शांतता ही एक मनःशांतीची मानसिक स्थिती आहे; जी आंदोलन, उत्तेजना किंवा अशांतता यापासून मुक्त असते. हे शांतता किंवा शांततेच्या स्थितीत असणे देखील सूचित करते. "मानसिक ताण किंवा चिंता नसणे" ही आपल्या अंतर्मनाची स्थिती निर्माण होणे जरुरीचे असते. ही वर्णने तणाव आणि चिंता टाळण्यासाठी मनःशांतीच्या महत्त्वावर भर देतात. हा खरे तर, तणाव आणि चिंता ह्यासाठी उतारा आहे. मन शांत केल्याने चिंता, तणाव आणि भीती यापासून आपला बचाव होतो आणि आंतरिक शक्ती आणि आत्मविश्वास जागृत होतो. मनःशांती चांगली आहे का? हे आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहार ह्या तीनही बाबींच्या स्थितीवरून स्पष्ट होऊ शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या प्रत्येकासाठी मनःशांती खूप महत्त्वाची आहे, कारण ती आपल्याला चिंता आणि दडपशाहीच्या भावना कमी करून त्रासाच्या वेळी शांत राहण्यास मदत करू शकते. मनःशांती न मिळाल्यास, आपल्याला कदाचित चिंता आणि तणावाची लक्षणे दिसू लागतील, ज्यात काही विशिष्ट गोष्टींचा समावेश आहे, जसे झोपेचा त्रास, ठणका व वेदना, मळमळणे, चक्कर येणे, डोकेदुखी इत्यादींचा समावेश असतो. दैनंदिन जीवनात शांतता मिळवण्याचा एक सुकर मार्ग म्हणजे चिंता करणे थांबवणे आणि समस्यांवर उपाय शोधण्यावर लक्ष केंद्रित करणे. नकारात्मक विचार आपल्याला खाली आणतात, आपले खच्चीकरण करतात; त्यामुळे आपण कोणत्याही गोष्टीला लायक नाहीत आणि आपण काहीही करू शकत नाही, असा अविचार मनाला बोचत राहतो. परंतू असा नकारात्मक विचार करण्याऐवजी आपण आपल्या क्षमता आणि सामर्थ्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.



आधुनिक केसरी

### वाणी अमृताची | मोक्ष देई ||

बोलण्याचे भान | राखावे सदैव ||
वाचाळ वैभव | घात करी ||१||

अंतरीची भाषा | मौन लिपी जाण ||
परावाणी मान | विठु कृपे ||२||

अहंकार वाढे | अज्ञानाच्या पोटी ||
ज्ञानीयांच्या ओठी | मितभाष्य ||३||

व्यसंगाची ओढ | लागो मज देवा ||
परी माझ्या जीवा | दंभ नको ||४||

आत्म शुद्ध बोली | संत ज्ञानेशाची ||
वाणी अमृताची | मोक्ष देई ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## गुरू आपल्याला अंतिम सुख दाखवितात



आधुनिक केसरी

एक लहान मुलगा एका विहिरीजवळ उभा होता. त्याची एक वस्तू आत पडली होती. 'ती काढण्याकरिता मी आत उडी मारतो,' असे तो म्हणू लागला. त्यावर तिथे होता तो एक मनुष्य म्हणाला, 'तू असे करू नकोस, आत पडून बुडून जाशील.' तरीपण तो ऐकेना, एवढ्यात त्याचा बाप तिथे आला. त्यानेही मुलाला पुष्कळ सांगून पाहिले, पण तो ऐकेना, मग त्या मुलाला बापाने धाक दाखवून आणि मार देऊन घरात नेले. आता, मुलाला मारले म्हणून तुम्ही बापाला दोष द्याल का ? "एकुलता एक मुलगा, नवस करून झालेला, त्याला जाऊ दिले असते तर काय झाले असते ?" असे म्हणाल का ? नाही ना ? तर मग गुरू करी काय करीत असतो ? आपण विषय मागत असतो आणि ते दिले तर आपण त्यात बुडून मरू हे त्याला माहीत असते; म्हणूनच तो आपल्याला त्यातून वाचविण्यासाठी चार गोष्टी सांगून पाहतो. आपण तेही न ऐकले, तर तो आपत्ती वगैरे आणून धाक दाखवितो. आपण त्याबद्दल रडत असलो तरी तो आपल्याला त्यातून वर ओढीतच असतो. आपण तर चांगले शिकले-सवरलेले; त्या मुलाप्रमाणे अज्ञान नसून चांगले वयस्कर; तरीसुद्धा आपल्याला विषयात उडी घ्यावीशी वाटते. गुरूने सांगितले, 'लग्न करू नकोस', तर आपण 'लग्न कधी होईल' म्हणून त्याच्या पाठीस लागत असतो. आणि शेवटी तर 'गुरूला समजतच नाही' असे म्हणण्यापर्यंत आपली मजल जाते ! सध्या दिसते तेच सुख आपण खरे असे मानीत असतो. पण अंतिम सुख काय, हे गुरूला कळत असते. म्हणून तो सध्या दिसणाऱ्या सुखापासून आपल्याला परावृत्त करीत असतो. तेव्हा, आपण गुरुवचनावर विश्वास ठेवून त्याच्या आज्ञेप्रमाणे वागणे हेच श्रेयस्कर आहे. तो जे साधन सांगेल तेच करीत राहावे, म्हणजे आपल्याला अंतिम सुखाचा लाभ होईल. गुरू आज्ञा करतो म्हणजे काय करतो ? तर आपले मन जिथे गुंतले असेल तिथून त्याला काढण्याचा तो प्रयत्न करतो. भगवंत भक्ताची संकटे नाहीशी करतो, म्हणजे त्याची प्रापंचिक संकटे दूर करतो असे नाही. ती काय, सहज दूर करता येतात; पण भक्ताला समाधानात ठेवून संकटे सहन करण्याची शक्ति भगवंत देतो. भक्ताला तो नेहमी स्मरणात ठेवतो. असे भक्तच संतपदाला पोहोचतात. एकाद्या विद्वान माणसाची विद्वत्ता ओळखायला आपण थोडे तरी विद्वान झाले पाहिजे, त्याप्रमाणे, संत ओळखायला संतांच्या ठिकाणी असणारा गुण थोडा तरी आपल्या ठिकाणी असला पाहिजे. संतांचा मुख्य गुण म्हणजे, ते भक्तिला चिकटलेले असतात. सत्पुरुषांचे बाहेरून वागण्याचे प्रकार त्या त्या देशकालमानाने निरनिराळे असतात, पण आतले भगवंताचे प्रेम मात्र सर्वांचे एकच असते.

**-श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**




# जिवतीच्या प्रतिमेचा भावार्थ

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

घरात आणि घराबाहेर बाळांवर येणाऱ्या संकटांपासून हे दोन्हीदेव बालकांचे रक्षण करतात म्हणून जिवती प्रतिमेत त्यांचे प्रथम स्थान.

नंतर येतात त्या जरा व जिवंतिका या यक्ष गणातील देवता. जरा या यक्षिणीबद्दल महाभारतात एक कथा येते. मगधनरेश बृहद्रथ याला दोन राण्या असतात. दोन्हीही राण्यांवर त्याचे सारखेच प्रेम असते. परंतु राजाला पुत्र/ पुत्री काहीही नसल्यामुळे राजा चिंतीत असतो. याच सुमारास नगरजवळील उपवनात ऋषी चंडकौशिक आल्याचे राजाला समजते. राजा त्यांचे दर्शन घेऊन आपली चिंता प्रगट करतो. ऋषी राजाला प्रसादात आंबा देतात व राणीला खायला द्या म्हणून सांगतात. दोन्ही राण्यांवर समान प्रेम असल्यामुळे राजा आंब्याचे समान भाग करून राण्यांना देतो. कालांतराने दोन्ही राण्यांना पुत्र होतो परंतु केवळ अर्धा-अर्धा. अशा विचित्र आणि अर्धवट अर्भकांना राजा जंगलात नेऊन टाकतो. त्याच वेळेस तेथून जरा नामक यक्षिणी जात असते. ती दोन्ही अभ्रक तुकड्यांना हातात घेते आणि आपल्या अवयव सांधण्याच्या कलेने दोन्ही शकलं सांधते. जरा ते सांधलेले अर्भक संध्यासमयास बृहद्रथ राजाला आणून देते. जरा यक्षिणीने सांधले म्हणून राजा त्याचे नाव जरासंघ ठेवतो आणि जरा यक्षिणीच्या उपकाराप्रीत्यर्थ नगरात देऊळ बांधून तिला मगधाच्या इष्टदेवतेचा मन देतो. त्याच प्रमाणे जारदेवतेचा वार्षिक महोत्सव सुरू करतो, अशी ही जरा देवी. जरेंचीच सखी जिवंतिका. जिवंतिका या शब्दाचा अपभ्रंश जिवती. जिवंतिकेचा अर्थ होतो दीर्घायू प्रदान करणारी. बालकाच्या दीर्घायुष्याची कामना करून या देवीची पूजा करतात. ही देवी पाळण्यात व आजूबाजूंनी बालकांना खेळवतो अशा रूपात दाखवतात.

प्रतिमेत सगळ्यात शेवटी येतात बुध - बृहस्पती. बुध हा ग्रह हत्तीवर बसलेला असून हाती अंकुश धारण करतो. तर बृहस्पती (गुरु) वाघावर बसलेला आणि हातात चाबूक घेतलेला दाखवतात. बुधाच्या प्रभावाने जातकाला अलौकिक बुद्धिमत्ता, आकर्षक व्यक्तिमत्व, वाक्पटुत्व इत्यादी गुण प्राप्त होतात. तर बृहस्पतीच्या प्रभावाने शैक्षणिक प्रगती, अध्यात्मिक उन्नती, विवेकबुद्धी जागृत होते. बुधाचं वाहन हत्ती. हत्ती हे उन्मत्ततेचं प्रतीक आहे. मानवी मनाला येणारी उन्मत्तता आपल्या बुद्धिमत्तेने, व्यक्तित्त्वाचा अंकुश घालून आवर घालावा हे बुध प्रतिमेवरून लक्षात येते. बृहस्पतीचं वाहन वाघ. हे अहंकाराचा प्रतीक आहे. मानवी मनाला अहंकार लवकर चिटकतो. अहंकार मानवाच्या प्रगतीमध्ये, आध्यात्मिक साधनेत बाधक ठरतो. त्यावर आपण ज्ञानाच्या, गुरुकृपेच्या आशीर्वादाने ताबा मिळवावा हे बृहस्पती प्रतिमा आपल्याला शिकवते. म्हणूनच बुध - बृहस्पती यांना सुद्धा जिवती प्रतिमेत स्थान मिळालं.

प्रथम रक्षक देवता, नंतर जन्माबालकेचे रक्षण व दीर्घायुष्य देणारी देवता आणि नंतर व्यक्तिमत्व प्रभावित करणारे ग्रह देवता असा हा जिवती प्रतिमेचा क्रम. एका मातृशक्तीने दुसऱ्या रक्षक व पालक शक्तीचे केलेले पूजन म्हणजेच जिवती पूजन.

जगातील सर्व प्राणिमात्रांच्या उज्वल भविष्याची, रक्षणाची प्रार्थना करून हा लेख प्रपंच थांबवतो.

जरे जीवन्तिके देवी बालयुक्ते प्रमोदिनी ।
रक्षाव्रते महाशक्ती पूर्णकामे नमोस्तुते ।।

# जनावरांची क्रुरपणे व निर्दयतेने वागणुक देत वाहतुक करणारे वाहनांवर कारवाईचा बडगा

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकिन :** आज दि.२२ रोजी बिडकिन पोलिस ठाणे हद्दीतील बिडकिन ते शेकटा रोडवर अशोक लेलंड गाडी मध्ये गायींची निर्दयतेने वाहतूक केली जात असल्याचे माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळताच सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मनेश जाधव व पोलिस कर्मचारी कृष्णा आधाट व पंचासमक्ष गाडीचालकास विचारपूस करुन त्यास पोलिस ठाणे बिडकिन येथे दाखल केले.

सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी मनेश जाधव पद-पोलिस उपनिरीक्षक यांनी दिलेल्या कायदेशीर फिर्यादीवरून,शेकटा ते बिडकिन रोडवरील गिधाडा शिवारातील रोडवर अशोक लेलंड टेम्पो क्र.एमएच ०३ सीव्ही ५१२९ वाहनाचा चालक मिलिंद दामोदर लोंढे, वय.२८ वर्षे, रा.लिंबगाव, ता.पैठण यांनी टेम्पो मध्ये ०५ गायी, ०२ कालवडी, ०१ नर गो  या जातीचा गो हा असे एकूण ०८ जनावरे अंदाजे किंमत ९५०००/- रु चे व या जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो ज्याची किंमत ७,००,०००/- रु असा एकुण ७,९५,०००/- किंमतीचे मिळुन आल्याने सदर टेम्पो व चालक आणि जनावरांसह ताब्यात घेण्यात आला आहे.

सदरिल टेम्पो मधुन वेदना होतील अशा स्थितीत वाहनात घालून त्यांची वाहतूक करुन क्रुरपणे वागविताना मिळुन आला आहे. तसेच याप्रकरणी पशु वैद्यकीय अधिकारी यांना बोलावून सदर जनावरांची तपासणी केली असता त्यामधील एक पांढरी रंगाची कालवड ही मृत झाल्याचे कळाले. सदरील इसमाविरुद्ध माझी प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ व मुंबई पोलीस अधिनियम ११९ व महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम कलम ३/१८१ प्रमाणे कायदेशीर कारवाई करत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धुळ्यातील हजारो शपथपत्र पोहोचले मातोश्रीवर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सोबत गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या आमदारानीं बंडखोरी केली. यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून शिवसैनिकांकडून आपण उद्धव ठाकरे गटातील मूळ शिवसैनिक असल्याबाबत १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोंदणी करून घेण्याचे आदेश राज्यातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यानुसार धुळे शहरातील शिवसेनेच्या मुख्य कार्यालयात पदाधिकारी व शिवसैनिकांकडून ही स्टॅम्प भरून घेतले त्या नंतर मातोश्री येथे शिवसेना पक्ष प्रमुख मा. उद्धव साहेब ठाकरे यांना शपथपत्र देतांना शिवसेना धुळे नंदुरबार संपर्क प्रमुख बबनराव थोरात साहेब, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किरण तात्या जोंधळे, विधानसभा संघटक डॉ.सुशीलजी महाजन, महानगर प्रमुख धिरज भाऊ पाटील, सर्व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.





# सोनेरी दिवस

आधुनिक केसरी

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) उमेदवार द्रौपदी मुर्मू जिंकल्या आहेत. द्रौपदी मुर्मू या देशाच्या १५ व्या राष्ट्रपती बनणार असून, त्या पहिल्या आदिवासी-महिला राष्ट्रपती ठरतील. दरम्यान उमेदवारीसाठी द्रौपदी मुर्मू यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर टीका करणाऱ्यांना केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार यांनी उत्तर दिले आहे. त्यांनी विरोधकांना आता जुन्या मानसिकतेतून बाहेर पडा असा सल्ला दिला आहे. हा ऐतिहासिक निर्णय असून, सोनेरी क्षण आहे. आदिवासी समाजातील आमची माता राष्ट्रपती होईल याची आम्ही कल्पनाही केली नव्हती. त्यांची उमेदवारी जाहीर झाली तेव्हा आमच्यासाठी तो आश्चर्याचा धक्का होता. त्यांच्या विजयाचा क्षण आदिवासी समाजाची मुलगी म्हणून आमच्यासाठी ऐतिहासिक आहे. आम्ही सर्व या क्षणाचे साक्षीदार आहोत याचा आनंद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी उमेदवारीचा निर्णय घेतल्याने मी त्यांची आभारी आहे, असे भारती पवार यांनी सांगितले. द्रौपदी मुर्मू यांना अधिक मते मिळायला हवी होती का? असे विचारण्यात आले असता त्यांनी सांगितले की आणखी मते मिळतील अशी आशा होती. विरोधक राजकारण बाजूला ठेवून आदिवासी समाजाला प्राधान्य देतील असे वाटले होते. पण दुर्दैवाने त्याला राजकीय रंग देण्यात आला. फक्त भाषणांमध्ये आदिवासी समाजाला पुढे आणले पाहिजे सांगायचे, पण मतदानात राजकारण आडवे येते हे आदिवासी समाज पाहत आहे. हा राजकीय आखाडा नसतानाही तिथे आम्हाला संघर्ष करावा लागत आहे. ज्यांना आवाज नाही त्यांची का निवड होत आहे? अशी विचारणा तेजस्वी यादव यांनी केली होती. त्यासंबंधी बोलताना भारती पवार म्हणाल्या की, या वक्तव्यावर माझा आक्षेप आहे. तुम्ही त्यांचा इतिहासच वाचलेला नाही. भारतमाता आणि समाजसेवेसाठी त्या किती समर्पित आहेत हा इतिहासच वाचला नसेल तर तुमचे वक्तव्य दुर्दैवी आहे. विनावेतन त्यांनी शिक्षणाचे काम सुरु केले होते. माझा वेळ मुलांच्या शिक्षणासाठी दिला तर पुढील पिढीला सक्षम करता येईल असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे रबर स्टॅम्प वैगैरे या संकल्पना आता गेल्या आहेत, आता ते दिवस गेले आहेत. मतमोजणीच्या तिसऱ्या फेरीतच मुर्मू यांनी विजयासाठी आवश्यक मतांचा जादुई आकडा गाठला. मुर्मू यांना ६४.०३ टक्के, तर सिन्हा यांना ३६ टक्के मते मिळाली. द्रौपदी मुर्म यांनी ६,७६,८०३ इतके मतमूल्य मिळवून विजय मिळवला, तर विरोधकांचे उमेदवार यशवंत सिन्हा यांच्या पारड्यात केवळ ३,८०,१७७ इतके मतमूल्य जमा झाले.

# भारतीय असंतोषाचे जनक : लोकमान्य टिळक



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**लोकमान्य टिळक म्हणजे निर्धार! एकदा निर्णय झाला शेंडी तुटो की पारंबी तुटो अशी त्यांची भूमिका असायची. टिळक कट्टर राष्ट्रप्रेमी व स्वातंत्र्यप्रेमी होते. ज्या गोष्टींची त्यांना चीड येत असे त्या गोष्टींवर ते सर्व ताकदीनिशी तुटून पडत असत. टिळकांनी राष्ट्रासाठी केलेला त्याग व ब्रिटिशांविरुद्ध ओकलेली आग यामुळे ते भारत स्वातंत्र्यासाठी सिद्ध करू शकले. त्यांनी तत्परतेने स्वातंत्र्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे भारतवासीयांमध्ये राष्ट्रीय अस्मिता निर्माण झाली आणि टिळक भारतीय असंतोषाचे जनक ठरले. संपादक, लेखक, वक्ता, गणितज्ञ, खगोलतज्ञ, राजकीय तत्त्वज्ञ असलेल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांना नमन.**

२३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखलगावात पार्वतीबाई व गंगाधर टिळक या दाम्पत्याच्या पोटी बाळ गंगाधर टिळक जन्मास आले. बालपणी ते शाळेत असताना एकदा वर्गात शिक्षक नव्हते, तेव्हा मुलांनी शेंगा खाऊन टरफले वर्गात टाकली तो कचरा पाहून शिक्षक रागावले व सर्व मुलांना कचरा उचलण्यास सांगितला असता टिळकांनी त्यास नकार दिला. 'मी शेंगा खाल्ल्या नाहीत मी टरफले उचलणार नाही' असे कणखरपणे सांगणाऱ्या केशवच्या वागण्यात लहणपणापासून बाणेदारपणा व निर्भयतेची चुणूक दिसते.

टिळकांचे मूळ नाव केशव असले तरीही 'बाळ' या टोपणनावानेच ते नावारूपास आले. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यात झाले. पुण्यातील डेक्कन कॉलेजमधून बी.ए. केल्यावर नंतर १८७९ साली ते एल.एल.बी. झाले. कायद्याच्या ज्ञानाचा त्यांना पत्रकारीता करत असताना खूप फायदा झाला.

बालपणापासूनच संस्कृत व गणित, विषयात टिळक पारंगत होते, नंतर खगोलशास्त्राचा अभ्यास करून त्यात ते निष्णात बनले. त्याकाळी इंग्रज सरकारचा अन्याय व अत्याचार जनतेला सळो की पळो करुन सोडत होता. अज्ञानामुळे जनता बऱ्याच गोष्टी सहन करत होती. समाजातील अज्ञान दूर होत नाही तोपर्यंत जनजागृतीच्या कार्यास गती येणार नाही हे ओळखून टिळकांनी चिपळूणकर व आगरकर यांच्यासोबत न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली व नंतर डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन करून फर्ग्युसन कॉलेज सुरू केले.

जनमानसात जागृती निर्माण करण्यासाठी चिपळूणकर व आगरक करांसोबतच १८८१ साली 'केसरी' हे पत्र सुरू केले. स्वतंत्र भारताच्या पायाभरणीची सुरवात टिळकांनी ध्येयवादाने 'शिक्षक' या नात्याने केली. त्यांनी व्यासंगी, ध्येयवादी आणि कळकळीचे, तळमळीचे विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून कार्य केले.

टिळकांनी लुटारू इंग्रजांना अन्याय व अत्याचाराविरुद्ध जाब विचारण्यास सुरूवात केली. जनतेला परदेशी कपड्यांच्या होळ्या पेटवायला लावल्या. स्वराज्याचा खरा अर्थ समजावत त्याच शब्दाभोवती त्यांनी प्रचंड चळवळ उभी केली.

इंग्लंडमध्ये जाऊन इंग्रजांच्या भारत द्वेषी टाइम्सला कोर्टात खेचून नाकीनऊ करणारा नरकेसरी स्वभावाने कमालीचा हट्टी व शब्दाचा पक्का होता. "माझ्यावर आकाश कोसळून पडले तरी त्याच्या विटा पायाखाली घालून मी माझे कार्य करीत राहीन" असे सांगणाऱ्या टिळकांच्या बोलण्यात प्रचंड आशावाद व ध्येयवाद दिसतो.

टिळकांचे 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?', 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे', 'उजाडले पण सूर्य कुठे आहे?', 'देशाचे दुर्दैव' असे त्यांचे स्वराज्य प्राप्तीच्या ध्येयाने झपाटलेले व ब्रिटिशांची झोप उडवणारे अग्रलेख प्रचंड गाजले. या अग्रलेखांनी जनमाणसाच्या मनात स्वातंत्र्याविषयी



संघर्ष निर्माण केला. या परखड विचारांच्या नेत्याने भारताचे प्रश्न जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावली. लोकमान्य टिळक म्हणजे निर्धार! एकदा निर्णय झाला शेंडी तुटो की पारंबी तुटो अशी त्यांची भूमिका असायची. टिळक कट्टर राष्ट्रप्रेमी व स्वातंत्र्यप्रेमी होते. ज्या गोष्टींची त्यांना चीड येत असे त्या गोष्टींवर ते सर्व ताकदीनिशी तुटून पडत असत. टिळकांनी राष्ट्रासाठी केलेला त्याग व ब्रिटिशांविरुद्ध ओकलेली आग यामुळे ते भारत स्वातंत्र्यासाठी सिद्ध करू शकले. त्यांनी तत्परतेने स्वातंत्र्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे भारतवासीयांमध्ये राष्ट्रीय अस्मिता निर्माण झाली आणि टिळक भारतीय असंतोषाचे जनक ठरले.

ब्रिटिश सरकारविरुद्ध टिळकांनी वाणी आणि लेखणीने सारा भारत एक करण्याचा प्रयत्न केला. आपले सारे कौशल्य पणाला लावून त्यांनी देशाला जागृत केले, स्वातंत्र्याच्या लढ्याला राष्ट्रीय स्वरूप व राष्ट्रीय नेतृत्व दिल्याने भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार म्हणून टिळक गणले जाऊ लागले त्यांच्या सिंहगर्जनेतील भाषणे ऐकून, इंग्रजांविरोधी जळजळीत अग्रलेख वाचून स्वातंत्र्याला पर्याय नाही अशी भावना जनमानसातून पेटून उठली. अवघे राष्ट्र एक करण्यासाठी टिळकांनी भारतीय जनतेच्या भावनेला हात घातला. भारतीय आध्यात्मिक परंपरा आणि शौर्याचा इतिहासाचा पुढे आणला, त्यासाठी गणेशोत्सव व शिवजयंती सारखे उपक्रम राबविले. अठरा पगड जातीचे, विविध धर्माचे लोक एकत्र येऊन एकविचाराने चालावे हा गणेशउत्सवाचा उद्देश्य होता. शिवजयंतीच्या माध्यमातून जनतेत स्वधर्माच्या अस्मितेची ज्योत तेवत ठेवली. 'शिवाजी महाराज की जय' हे चार प्रेरणादायी शब्द सर्वांना हलवून जात असत आणि लोक हेवेदावे विसरून एकत्र येत असत. इंग्रजांच्या कपटनितीला जशास तसे उत्तर देण्याची धमक असणाऱ्या टिळकांनी जनसामान्यांच्या परंपरा व रूढींना धक्का न लावता स्वराज्य ध्येयामागे मोठा समुदाय उभा केला व ते खऱ्या अर्थाने लोकमान्य झाले. लोकमान्य होण्याच्या प्रवासात त्यांना त्रास, संकटे, संघर्ष, तुरुंगवास, न्यायालयीन खटले असे अनेक खाचखळगे पार करावे लागले.

राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार, स्वदेशी, व स्वराज्य ही चतुःसूत्री टिळकांनी तेव्हा जनतेला दिली. इंग्रजांनी देशद्रोहाच्या कलमाखाली टिळकांना खडतर मंडाले कारावास घडविला. ते मंडाले शिक्षेपूर्वी सुद्धा दोन वेळा तुरुंगाची हवा खाऊन आले होते. त्यांच्यावर दोन वेळा राजद्रोहाचा खटला चालवण्यात आला. त्यांचे मानसिक खच्चीकरण करण्याच्या हेतूने, त्यांना एकांतवास घडवून आणण्यासाठी इंग्रजांनी त्यांना मंडाले तुरुंगात ठेवले होते, परंतु मंडालेच्या तुरुंगात त्यांनी 'गीतारहस्य' नावाचा ज्ञान भक्ती व कर्म योगाचा त्रिवेणी संगम असणारा ग्रंथ लिहिला. त्यांची 'ओरायन' आणि 'आर्क्टिक होम इन वेदाज' ही दोन पुस्तके क्लिष्ट विषय नावीन्यपूर्ण पद्धतीने हाताळण्याच्या क्षमतेची उत्तम उदाहरणे आहेत. तसेच 'गीतारहस्य' भागवत गीतेतील कर्मयोगावर समीक्षा मानले जाते. 'वेदांचा काळ आणि वेदांत ज्योतिष्य', 'हिंदू फिलोसोफी ऑफ लाइफ', 'इथिक अँड रिलिजन', 'टिळक पंचांग पद्धती' ही त्यांची काही पुस्तके आहेत. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" असे ठणकावून सांगणारे टिळक भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे आद्यप्रवर्तक म्हणून ओळखले जातात.

४ मे १९०८ रोजी शिवजयंती उत्सवानिमित्त झालेल्या अकोल्यातील लोकमान्यांच्या सभेला श्री गजानन महाराज हजर होते. यानंतरच काही दिवसांनी टिळकांना अटक झाली व त्यांची रवानगी मंडालेच्या कारागृहात करण्यात आली, मंडालेला जाण्यापूर्वी गजानन महाराजांनी टिळकांना भाकरीचा प्रसाद पाठवला होता, महाराज म्हणाले होते,

"**सज्जनांसी त्रास झाल्याविना | राज्यक्रांति होईना ||**
**कंसाचा तो मनी आणा | इतिहास म्हणजे कळेल ||**
**या भाकरीच्या बळावरी | तो करील मोठी कामगिरी ||**
**जातो जरी फार दूरी | परी न त्याला इलाज ||**"

टिळकांनी तो प्रसाद स्वानंद ग्रहण केला, मंडालेच्या कारागृहात अवघ्या चार पाच महिन्यात टिळकांनी साडेपाचशे ते सहाशे पानाचे गीतारहस्य लिहून काढले. श्री गजानन महाराजांचे शब्द खरे ठरले.

१ ऑगस्ट १९२० रोजी स्वराज्य व सुराज्याचे स्वप्न प्रत्येक भारतीयाला देऊन हा स्वातंत्र्य सेनानी आपल्याला सोडून गेला. "जनतेसाठी जगलेल्या आणि जनतेसाठी मरण पावलेल्या या थोर पुरुषाला आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जाईल" असे त्यांना श्रद्धांजली वाहताना गांधीजी म्हणाले होते.

# महान स्वातंत्र्यसेनानी : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**इतिहासातील सन्माननीय आणि आदरणीय व्यक्तींमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्मरण प्रामुख्याने होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसेनानी, राजकारणी, तत्त्वज्ञ, संपादक, लेखक आणि वक्ते लोकमान्य टिळक यांची आज जयंती. जुलै २३, इ.स. १८५६ मध्ये त्यांचा जन्म झाला. शाळा, महाविद्यालये आणि इतर सामाजिक संस्थांद्वारे हे औचित्य साधून या विषयावर अनेक वक्तृव स्पर्धा आयोजीत केल्या जातात. या भाषणांच्या निमित्ताने टिळकांच्या स्मृतीचे स्मरण केले जाते. या अनुषंगानेच लोकमान्यांविषयी थोडक्यात माहिती या लेखात जाणून घेऊया.**

इतिहासाचा अभ्यास करताना एक बाब विशेष करून लक्षात येते ती अशी की ऐतिहासिक घटनांमधील प्रत्येक घोषणा ही अजरामर झाली आहे. उदाहरणार्थ, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची 'मेरी झाँसी नहीं दूँगी', महात्मा गांधींनी दिलेली `चले जाव' घोषणा ! त्याचप्रमाणे स्वराज्याचे प्रणेते म्हणजेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी अहमदनगरमध्ये भर पावसात एका सभेत उच्चारलेली "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" ही घोषणा! या वाक्याने देशवासीयांच्या मनात स्फुरण निर्माण करणारे आणि भारतीयांना देशप्रेम व स्वातंत्र्याची गरज याची जाणीव करून देणारे लोकमान्य टिळक यांची आज 166 वी जयंती आहे.

केशव गंगाधर टिळकांचा जन्म 23 जुलै 1856 रोजी एका चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण घरात झाला. टिळकांचे वडील गंगाधर रामचंद्र टिळक आणि आईचे नाव पार्वतीबाई होते. त्यांचे वडील हे पेशाने शिक्षक आणि संस्कृत पंडित होते. टिळक शिक्षणासाठी पुण्यात आल्यावर काहीच दिवसात त्यांच्या आईचे तर वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी वडिलांचे निधन झाले. त्यानंतर काका गोविंदराव पंत यांनी लोकमान्यांचा सांभाळ केला.


अभ्यासक , कुशाग्र व तल्लख बुद्धीचे लोकमान्य शिक्षणातही हुशार होते. लहानपणापासूनच त्यांचा पुराण व ग्रंथांचा तगडा अभ्यास होता. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर 1877 मध्ये त्यांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेज मधून गणित विषयात पदवी प्राप्त केली व त्यापाठोपाठ लगेचच 1879 मध्ये त्यांनी एलएलबी पूर्ण केले.

**डेक्कन एज्युकेशन संस्थेची स्थापना :**

लोकमान्य टिळकांनी गोपाळ गणेश आगरकर यांच्यासोबत मिळून 1884 मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.यामधून तरुणांना देशप्रेमाचे धडे दिले जाऊ लागले. या पाठोपाठ 1885 मध्ये त्यांनी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना करून तिथून त्यांनी गणित शिकवण्यास सुरुवात केली. कालांतराने 1890 मध्ये टिळक डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून विभक्त झाले.

**भारतीय असंतोषाचे जनक :**

ब्रिटीश लेखक सर व्हॅलेंटाईन चिरो यांनी टिळकांना फादर ऑफ इंडियन अनरेस्ट म्हणजेच भारतीय असंतोषाचे जनक असे म्हंटले होते. टिळकांच्या जहालमतामुळे अशी प्रतिमा तयार झाली होती असे म्हण्टले जाते.



**राजद्रोहाचा खटला आणि तुरुंगवास :**

ब्रिटिश सरकारच्या जुलमी कायद्यामुळे आणि स्वतःच्या जहाल मतामुळे टिळकांना आपल्या हयातीत अनेकदा तुरुंगवास पत्करावा लागला. केसरी या वृत्तपत्रातून त्यांनी देशद्रोहाला प्रोत्साहन दिल्याचा आरोप ठेवत ब्रिटिशांनी 1897 मध्ये त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. यासाठी त्यांना १८ महिने कारावास भोगावा लागला. यानंतर प्रफुल्ल चकी आणि खुदिराम बोस यांना पाठिंबा देणारे लेख लिहिण्यासाठी 1908 ते 1914 या सहा वर्षांसाठी त्यांना मंडालेच्या तुरुंगात धाडण्यात आले होते.

**बंगालच्या फाळणी विरुद्धचा लढा :**

19 जुलै 1905 रोजी भारताने तत्कालीन वाइसराय लॉर्ड कर्झन द्वारा केली गेली होती. देशात फूट पडण्याच्या या कृत्याविरुद्ध बंगाल प्रांतात वंग भंग आंदोलन सुरू झाले. या घटनेच्या विरोधात लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल, व लाला लजपतराय यांनी रान उठविले होते. याच पार्श्वभुमीवर आनंद मोहन बोस यांच्या अध्यक्षतेखाली टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार या चतुःसूत्रीची घोषणा केली.

**केसरी व मराठा ची सुरुवात :**

टिळकांनी आगरकर, चिपळूणकर आणि इतर सहकाऱ्यांच्या मदतीने इ.स. 1881 साली केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरू केली. यापैकी केसरी हे मराठीतून प्रसिद्ध होत होते तर मराठा हे इंग्रजीमधून. 1882 च्या अखेरीस केसरी हे भारतातील सर्वाधिक खप असलेले प्रादेशिक वर्तमानपत्र बनले. यापुढी चाळीस वर्षांच्या काळात टिळकांनी केसरीमधून 513 अग्रलेख लिहिले.टिळकांचे अग्रलेख हे खऱ्या अर्थाने केसरीचा बाणा म्हणून ओळखले जात होते. ' सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ', ' उजाडले पण सूर्य कुठे आहे ,' ' टिळक सुटले पुढे काय ',हे त्याचेच काही खास दाखले आहेत.

**गणेशोत्सव व शिव जयंती :**

हिंदूंना एकत्र आणण्यासाठी 1894 मध्ये टिळकांनी घरगुती स्तरावरील गणेशोत्सवाला सार्वजनिक बनवण्याचे आवाहन केले, त्यानुसार सर्वत्र गणेशोत्सव हा सण साजरा होऊ लागला. तसेच आदरणीय राजे छत्रपती शिवाजी महाराजांची शिवजयंती साजरी करायला प्रारंभ केला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षी अमृतयोग !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**नेल्सन/ विनी मंडेला, कमला हॅरिस, ओबामा / मलाला यांचेच अप्रूप असणाऱ्या ज्या जमाती पुरोगामी, डावे, लुटीयन्स या नावाने आपल्याकडे ओळखल्या जाणाऱ्या आहेत त्यांना द्रौपदी मुमूर् यांच्या निवडीचा आनंद होणे अशक्य आहे. त्यांचे महिला सक्षमीकरणाचे ढोंगी तुणतुणे तुटून पडले आहे. कारण त्यांनी मांडलेली सगळे विषमतेचे सामाजिक समीकरणे उध्वस्त होताना बघण्याचे दुःख त्यांना होत आहे. ते जरी शोकसागरात असले तरी तमाम भारतीय आनंदोत्सव साजरा करत आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात हा अमृत योग घडवून आणण्यात ज्यांनी पुढाकार घेतला त्या पंतप्रधान मोदीजी यांचे विशेष अभिनंदन करायला हवे. सत्ता हे व्यवस्था परिवर्तनाचे आणि विचारांच्या द्दधिकरणासाठीचे माध्यम आहे हे पुन्हा त्यांनी सिद्ध केले आहे. राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी अंधभक्ती करण्यापेक्षा त्यांच्याकडून हे शिकावे असे वाटते. एकूण आजचा दिवस हा सुवर्णाक्षरांनी लिहण्याचा, मातृशक्तीच्या संघर्षाच्या गौरवाचा आणि एकात्म समरस हिंदू समाजाच्या आत्मसाक्षात्काराचा आहे तो साजरा करू या !**



आज देशात राष्ट्रपती निवडणूक झाली आणि श्रीमती द्रौपदी मुर्मु या प्रचंड मताने निवडून आल्या! समस्त भारतीयांचे उर भरून आले आहे. त्या एक महिला आहेत आणि वनवासी आहेत. व्यक्तिगत जीवनात अनेक आपत्ती त्यांनी सहन केल्या आहेत. पण एखाद्या कर्मयोगिनींप्रमाणे त्या जीवन जगल्या आहेत. त्यांची निवड ही समस्त मातृशक्ती आणि वनवासी भगिनी यांच्या सन्मानाचे प्रतीक आहे. या देशाच्या प्राक्तनात जे काही दुर्दैवी अध्याय आहेत त्यात अस्पृश्यता हा जसा एक होता, (अजूनही काही प्रमाणात आहेच) तसा वनवासी बंधू याना विकासापासून वंचित ठेवण्याचे पाप हाही एक अध्याय आहे.

याचा फायदा स्वाभाविकपणे मुस्लिम आक्रमक आणि धूर्त इंग्रज आणि ढोंगी मिशनरी यांनी बरोबर उचलला. वनवासी समाजाला इंग्रज आणि मिशनरी यांनी समन्वय साधत लक्ष केले. खरे तर स्वातंत्र्याचे युद्ध इंग्रजांच्या विरुद्ध खरे सुरू केले वनवासी समाजाने. बिरसा मुंडांपासून आमच्या नगर जिल्ह्यातील राघोजी भांगरेपर्यंत असंख्य नावे घेता येतील! पण इंग्रजांनी ही चळवळ दाबून टाकण्यासाठी जंगल कायद्यासारखे अनेक कायदे आणून वनवासींना हक्क नाकारले, दुर्दैवाने तेच कायदे स्वतंत्र भारतात तसेच राहिले आणि वनवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिला.

दुसरीकडे मिशनरी मंडळींनी इंग्रजांनी केलेला अन्याय हा जणू शहरातील हिंदू बांधवांकडून आहे असे भासवत त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत त्यांना हिंदू समाजापासून तोडले आणि धार्मिक श्रद्धा बदलायला लावत राष्ट्रीय प्रवाहात जाण्यापासून रोखले.

स्वतंत्र भारतात खुद्द नेहरूंना याचे परिणाम बघावे लागले, कारण ते प्रवासात असताना गो बॅक इंडियन प्रा. मिनिस्टर नेहरू म्हणत काळे झेंडे दाखवण्याची हिम्मत मिशनऱ्यांनी वनवासी बंधूंमध्ये निर्माण केली. त्यामुळे मध्यप्रांताच्या मुख्यमंत्री शुक्लाजी यांनी नियोगी कमिशन नेमले त्याचा अहवाल मिशनरी करत असलेल्या देशद्रोही कारवायांवर डोळे मिटून बसणाऱ्या सर्वधर्मसमभावीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे होते. मिशनरी मंडळींवर कारवाईचा बडगा उचलणे अपेक्षित होते पण नेहरू यांचे उदार, तथाकथित धर्मनिरपेक्ष धोरण आडवे आले. मिशनरी मंडळींचे नितीधैर्य वाढले आणि ते आणखी निर्ढावले.

या अहवालाने अस्वस्थ झालेला एक स्वयंसेवक होते जे संघाच्या सरसंघचालक पूजनीय गुरुजी यांच्याकडे गेले आणि पूजनीय गुरुजी यांनी त्यांना तूच उपाय सुरू कर अशी आज्ञा केली त्यातून ठक्कर बाप्पा यांच्या मदतीने जशपूर मध्ये जे काम त्यानी सुरू केले तेच 'वनवासी कल्याण आश्रम' या नावाने सर्व वनवासी क्षेत्रात पसरले आणि आता तर वनवासी नव्हे सर्व जनजातीच्या विकासाचे ध्येय घेऊन पुढे चालले आहे. त्या कार्यकर्त्यांचे 'बाळासाहेब देशपांडे ' हे नाव कुणाला माहीत नसेलही पण त्यांनी लावलेल्या रोपट्याला आज देशाच्या राष्ट्रपती म्हणून द्रौपदी मुर्मू यांच्या निवडीच्या रूपाने अमृत फळ आले आहे. वनवासी बंधूंना केवळ मिशनरी मंडळींचा ससेमिरा नव्हता तर असा समस्याग्रस्त समाज ज्या विचार समूहाच्या दृष्टीने रोजी रोटीचा खाद्याचा विषय त्या मंडळींनी वेगवेगळे विचार आणि कथानके रुजवत या बंधूंना भ्रमित करून सोडले. मग आर्य/ अनार्य, शहरवासी / आदिवासी, मूळनिवासी या संकल्पना त्यांच्यावर थोपवल्या. रावण दशग्रंथी ब्राह्मण हे सिद्ध असूनही त्याला वनवासी समाजाचा पुराण पुरुष म्हणायचे, महिषासुर ते बकासुर याना देवत्व देताना हिडिंबा, घटोत्कच काल्पनिक ठरवायचे आणि शबरी मातेला नाकारत शूर्पणखेला मात्र ग्रामदैवत बनवायचे. वनवासी समाजात पण राजघराणे होते हे नाकारत निषाद, केवट हे संदर्भ दुर्लक्षित करायचे, असले थेरे यांचे चालू राहिले. व्यवस्थेविरुद्ध भडकावून नक्षलवादी विचार रुजवायचे हा डाव्यांचा आणखी एक कार्यक्रम स्वातंत्र्य मिळाल्यावर चालू झाला. सत्याला असत्य आणि असत्य ते सत्य सांगण्यासाठी कला क्षेत्र पुढे आले, साहित्य नाटके, सिनेमा, संगीत, कला, चित्रकला ही खोट्या प्रचाराची माध्यमे बनली आणि शहरी भागात दाढी वाढवून शबनम अडकवून या मंडळींची झुंड प्रचाराला लागली. स्वतःला विचारवंत म्हणत, कलाकार, प्रतिभावान अशी शेखी मिरवत यांनी शहरी आणि वनवासी, गिरीवासी यांच्यातली दरी अजून रुंदावण्याचे काम इमाने इतबारे केले. पण घड्याळाचे काटे तुम्ही कितीही कृत्रिमपणे उलटे फिरवले तरी कालचक्र पुन्हा दुपट्ट वेगाने आपली गती पकडते आणि काटे आपल्या नैसर्गिक अवस्थेत पोहचतात. कालचक्र पुन्हा नैसर्गिक अवधारणेतून धावू लागते. तेच आज घडले आहे.

सर्व प्रकारचे विघातक प्रयत्न करणाऱ्या मिशनरी ते लिब्रानडु डावे आणि राजकीय ठेकेदार याना श्रीमती द्रौपदी मुर्मु यांची निवडीच्या रूपाने सणसणीत चपराक बसली आहे. त्यांची अवस्था दाखवता येत नाही आणि सहनही होत नाही अशी झाली आहे. ज्यांना मनुवादी म्हणून आयुष्यभर हिणवले त्या विचाराच्या प्रतिनिधींनी राष्ट्रप्रमुख म्हणून त्याच विचाराच्या सावलीत वाढलेल्या प्रथम दलित आणि आता वनवासी व्यक्तीला सन्मानित केले आहे आणि तेही व्यक्तित्व त्या पदावर आपल्या गुणवत्तेच्या आधारावर पोहचले आहेत. हे सत्य लवकर पचनी पडणे अवघड आहे.

श्रीमती द्रौपदी मुर्मु उमेदवार म्हणून घोषित झाल्यावर शंकराच्या मंदिरात जातात, मंदिर झाडून घेतात आणि स्वतःच्या हाताने अभिषेक करतात हे दृश्य बघून वनवासी बंधू सहित समस्त हिंदू समाजमन श्रद्धेने उचंबळून जाते आणि नियती स्मित करत जणू भारत मातेशी हितगुज करताना, कानात सांगते 'तू खूप विपरीत काळ बघितलास आता चांगल्या गोष्टी बघण्याचा तुझा काळ सुरू झाला आहे ' !

अर्थात नेल्सन/ विनी मंडेला, कमला हॅरिस, ओबामा / मलाला यांचेच अप्रूप असणाऱ्या ज्या जमाती पुरोगामी, डावे, लुटीयन्स या नावाने आपल्याकडे ओळखल्या जाणाऱ्या आहेत त्यांना याचा आनंद होणे अशक्य आहे. महिला सक्षमीकरणाचे ढोंगी तुणतुणे त्यांचे तुटून पडले आहे. कारण त्यांनी मांडलेली सगळी आवडते विषमतेचे सामाजिक समीकरणे उध्वस्त होताना बघण्याचे दुःख त्यांना होत आहे. असो, ते जरी शोकसागरात असले तरी तमाम भारतीय आनंदोत्सव साजरा करत आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात हा अमृत योग घडवून आणण्यात ज्यांनी पुढाकार घेतला त्या पंतप्रधान मोदीजी यांचे विशेष अभिनंदन करायला हवे. सत्ता हे व्यवस्था परिवर्तनाचे आणि विचारांच्या दृधिकरणासाठीचे माध्यम आहे हे पुन्हा त्यांनी सिद्ध केले आहे. राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी अंधभक्ती करण्यापेक्षा त्यांच्याकडून हे शिकावे असे वाटते. एकूण आजचा दिवस हा सुवर्णाक्षरांनी लिहण्याचा, मातृशक्तीच्या संघर्षाच्या गौरवाचा आणि एकात्म समरस हिंदू समाजाच्या आत्मसाक्षात्काराचा आहे तो साजरा करू या !



# !! पितळखोरा लेणी !!



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**जो देखे न रवी...ओ देखे कवी...असं म्हटलं जातं...त्यांची प्रचिती येते ती पितळखोरा लेणीवरील हे काव्यरचना लिहिणाऱ्या कवीला पाहून. श्रीकांत उमरीकर यांच्यासारख्या उत्तुंग प्रतिभासंपन्न कवीच्या काव्यरचनेचे रसग्रहण करण्यात इतका मी नक्कीच मोठा कवी नाही. नव्हे तर माझी योग्यता देखील नाही. असो... श्रीकांत उमरीकर यांच्यासारख्या ज्येष्ठ कविवर्यांनी लिहिलेल्या या काव्यरचनेचा मला जो उमगला तो अर्थ मी शब्दांमधून अधोरेखित करण्याचा प्रयत्न करणार आहे.**

पितळखोऱ्याच्या या परिसरातील कातळ डोंगराच्या पाषाणातून त्याकाळातील शिल्पकारांनी प्रचंड मेहनत घेऊन यामध्ये अनेक शिल्प साकारलेली आहेत. आज या डोंगरांच्यावर हिरवीगार वनराई बहरलेली आहे त्या शिल्पकारांची प्रचंड मेहनत या प्रत्येक शिल्पातून जाणवत आहे. ही शिल्प खोदत असताना त्यांनी घेतलेले परिश्रम त्याची आज फलश्रुती झाली आहे असंच म्हणावं लागेल ...कारण आज या दगडांच्या कणाकणामधनं साकारलेलं हे शिल्प प्रत्येक शिल्प हे देवत्व सांगून जात आहे असंच वाटत आहे .इतका सुंदर अर्थ या पहिल्या कडव्यामध्ये कवींनी आपल्या शब्दातून अधोरेखित केलेला आहे.

कवितेच्या दुसऱ्या पद्यामध्ये कवीच मनं निसर्गात रममाण होऊन गेलेलं आहे. वनराईनं अंथरलेले हिरवेगार गालिचे पांघरून ही वसुंधरा अल्लडपणे इकडे तिकडे स्वच्छंदीपणे बागडत आहे.

डोंगरमाथ्यांवरून खळखळून वाहणारे ते निर्झर.. या निर्झरांची आणि वाऱ्याची सुसंगत झाल्यामुळे जणू काही एखाद्या बासरीची धून कानावर यावी इतका सुंदर सुमधुर असा आवाज कानावर येत आहे.. हे सर्व निसर्गाचं रूप पाहिल्यानंतर कवीचं मन स्वच्छंदपणे बागडू लागतं ते फुलपाखरांच्या रूपाने ..त्या निसर्गरम्य वातावरणामध्ये कवी एकरूप होऊन जातो. हिरव्यागार त्या बहरलेल्या वनराई मधून पानांपानांमधून, झाडांच्या मधून, मध्येच सोनेरी रवी किरणांची आलेली सोनेरी तिरीप उजळून टाकतं आहे असंच कवीला भासतं. काव्यरचनेच्या तिसऱ्या पद्यामध्ये कवीला वेगळीच अनुभूती येते.

पूर्वी पैठण नगरीमध्ये खूप मोठा व्यापार चालत असे.



संपूर्ण भारतातून नव्हे तर भारताच्या बाहेरून अनेक व्यापारी पैठणमध्ये व्यापारासाठी येत असत. उदाहरण सांगायचं झाल्यास काबुल ..कंधार ..बलुचिस्तान.. अफगाणिस्तान या ठिकाणाहून अनेक धनवान.. धनसंपन्न व्यापारी पैठणमध्ये व्यापार करण्यासाठी येत असत .ते येताना उच्च दर्जाची उत्तरे घेऊन येत असत .त्याचबरोबर दर्जेदार खजूर आणि सुकामेवा देखील येताना घेऊन येत असत .पैठण मधून जाताना मसाल्याचे पदार्थ उच्च दर्जाचे रेशीम आणि तलम कापड ते खरेदी करून जात असत. या धनवान व्यापाऱ्यांनी जेव्हां पितळखोऱ्यातील कोरलेली अलौकिक शिल्प पाहिली आणि ते विस्मित होऊन गेले. मग त्या परदेशी व्यापाऱ्यांनी अलोकिक शिल्प साकारणाऱ्या शिल्पकारांना मोठी मदत केली. अशा प्रकारचे संदर्भ पितळखोऱ्यातील शिलालेखात कोरून ठेवलेले आहेत. श्रीकांत उमरीकर केवळ भाव विश्वात वावरणारे ... रमणारे कवी नसून कवी मनाच्या बरोबर ते एक उत्तम अभ्यासक.. इतिहास तज्ञ.. विचारवंत.. आहेत हे त्यांच्या या काव्याच्या मधून आपणास सहजतेने दिसून येते.

या काव्यरचनेच्या चौथ्या पद्यांमध्ये कवी पितळ खोऱ्या मधिल लेणीतील शिल्पकलेची अलोकिकता किती सुंदर आहे याचे खूप सुंदर शब्दात त्यांनी वर्णन केलेले आहे. पितळखोऱ्यातील या लेण्या मधील शिल्पांच्या मधून अजूनही विलोभनीय असा गंध दरवळत आहे. म्हणूनच ही सारी शिल्प मनास भावतात आणि पाहणाऱ्याच्या मनास वेगळा आनंद देऊन जातात. या दगडांच्या शिल्पावर त्या कालखंडामध्ये चितारलेले रंग विविध रंगसंगती अजूनही इतकी अलौकिक आहे.ही शिल्पे पाहताना ती नुकतीच तयार केलेली.. चितारलेली आहे की काय असा भास प्रत्येक चित्र शिल्प पाहताना आजही जाणवतो. हे सारं वर्णन खूप सुंदर शब्दाच कवीने सहजतेने केलेलं आहे.

पितळखोऱ्याच्या या लेण्याच्या दरवाजातच येणाऱ्या पर्यटकांच्या स्वागतासाठी अतिशय सुंदर असा द्वालपाल उभा आहे .हा द्वारपाल अत्यंत भावपूर्णपणे हास्य मुद्रेने येणाऱ्या प्रत्येकाचं स्वागत करण्यासाठी उभा आहे असंच वाटून जातं. त्याचबरोबर या ठिकाणी उभी केलेली शिल्पातील हत्तींची ही रांग पाहून सारे जण सीमित होऊन जातात. हत्तींची ही रांग जणू निळ्या आकाशकडे पाहून येणाऱ्यांचे स्वागतच करीत आहे असं कवी मनाला वाटून जातं.

पितळखोऱ्याची ही अलौकिक लेणी ह्या शिल्पकारांना तयार केलेली आहे खोदलेली आहे त्या गोष्टीला आज दोन हजार वर्षाहून अधिक काळ लोटलेला आहे. अशा या कलासंपन्न शिल्पकारांचं कौतुक ते काय करावं. त्यांनी हजारो वर्षानंतर देखील येणाऱ्या सगळ्या मानवतेसाठी हा आपल्या शिल्पातून सुंदर संदेश जणू काही दिलेला आहे.. खोदून ठेवलेला आहे.. त्याचे शब्दातून वर्णन करणं खचितच अवघड आहे असंच कवीला वाटतं.

कविवर्य श्रीकांत उमरीकरांनी पितळखोरा लेणी विषयी लिहिलेली काव्यरचना वाचताना जणू काही आपण सारे त्या पितळखोऱ्या लेणीच्या समोर उभे आहोत... त्या परिसरातून भ्रमंती करीत आहोत ...मधूनच एखाद्या पाण्याचा आवाज बासरीच्या रूपाने आपल्या कानावर येतोय की काय ...बहरलेली ती सुंदर वनराई.. ती शिल्प.. याच सुंदर शब्दशिल्पच आपल्यासमोर त्यांनी साकारलेला आहे.. जिवंतपणे समोर उभं असलेलं हे प्रत्यक्ष शिल्पच आपण पहात आहोत की काय असं असा भास ही काव्यरचना वाचताना प्रत्येकाच्या मनाला भावून जातो हे बाकी खरं ...अशा कविवर्यांना माझी ही शब्दसुमनांची वंदना....

## पितळखोरा लेणी

हिरवाईची झालर लेवुन
कातळ काळा डोंगर बसतो
कुणी खोदता लेणी त्यातुन
दगडाचा मग कण कण हसतो

झरा वाहतो दरीमधुनी
खळखळ अवखळ ओठी धुन
फुलपाखरू बनुन उडते
हिरव्या पानांमधून ऊन

परदेशी व्यापार कराया
अत्तर घेवुन निघे कुणी
त्याच्यासाठी स्वप्न कोरतो
शिल्पकार हा कोण गुणी

रंग कधीचे चितारलेले
अजुन ताजे दगडांवरती
अजुन ताजा गंध दरवळे
अजुन येते मनास भरती

द्वारपाल हा स्वागत करण्या
सुहास्य वदने सज्ज उभा
हत्तींची ही रांग देखणी
तोलू पाहे निळ्या नभा

दोन सहस्त्रे वर्षे झाली
काळ गोठला इथे असा
कलासक्त हा मानवतेचा
उरात गोंदून अमर ठसा



श्रीकांत उमरीकर
संपर्क क्र. 9422878575






# भारतात चित्ता पुन्हा धावणार



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**जगभरातील जंगलांमध्ये देखील अवघे सात हजार चित्ते शिल्लक राहिले आहेत, त्यामुळे याला इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर या संस्थेच्या नामशेष होत चाललेल्या प्राण्यांच्या लाल यादीमध्ये टाकण्यात आले आहे. मात्र आता या चित्यांची भारतात पुन्हा एंट्री होणार आहे. जवळपास ७० वर्षांनंतर भारतातील जंगलात चित्ता परत येणार आहे. त्याची डौलदार चाल पुन्हा एकदा भारतीय वन्यप्रेमींना पाहायला मिळणार आहे. मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यान आफ्रिकी चित्त्यांच्या स्वागतासाठी तयार आहे. अंतरमहाद्विपीय स्थानांतरण योजनेअंतर्गत त्यांना भारतात आणले जाणार आहे. जर सर्व गोष्टी ठरल्याप्रमाणे झाल्या तर चित्ता येत्या १५ ऑगस्ट पर्यंत भारतात येण्याची शक्यता आहे.**

चित्ता हा पृथ्वीतलावरचा अत्यंत वेगवान समजला जाणारा प्राणी आहे. त्याचा वेग थक्क करणारा असाच आहे. शिकारीमागे तो ताशी १२० किलोमीटरच्या वेगाने धावतो. जेव्हा तो शिकारीचा पाठलाग करतो तेव्हा त्याला कॅमे-यात टिपणं अवघड होवून बसतं. कारण त्याच्या शरीराच्या ह-हालचाली अत्यंत वेगवान असतात. वन्यजीव अभ्यासकांच्या मते चित्यांसाठी गवताळ प्रदेश पोषक मानला जातो. चित्ता हा प्राणी सिंह, वाघ, बिबट्या या प्राण्यांप्रमाणेच फेलिडो अर्थात मार्जारकुळातील असल्याचं काही वन्यजीव अभ्यासकांच म्हणनं आहे. तर काही वन्यजीव अभ्यासकांना ते मान्य नाही. एकेकाळी चित्त्याचं वास्तव आफ्रिका आणि भारतीय उपखंडातील सपाट भुभागावर होतं. भारतात मुघलांच्या काळात देखील चित्ते मुबलक प्रमाणात होते. १६ व्या शतकात मुघल बादशाह जहांगीर यांच्या काळात जगात पहिल्यांदाच चित्ता पाळण्यात आला. आपल्या काळात एकूण १०,००० चित्ते होते आणि त्यापैकी १,००० आपल्या दरबारात होते, अशी नोंद जहांगीर यांचे वडील अकबर यांनी केली आहे. तर मुघल सम्राट अकबरकडे ९,००० पेक्षा जास्त चित्ते होते. ऐतिहासिक नोंदीनुसार छत्तीसगडमधील कोरिया जिल्ह्यातील महाराजा रामानुज प्रताप सिंहदेव यांनी ७३ वर्षापूर्वी १९४७ साली एका वयस्कर चित्त्याची शिकार केली होती. शिकार केल्यानंतर त्यांनी या शिकारीचे फोटो बॉम्बे नॅचरल हिस्ट्रीला पाठवले होते. महाराजा रामानुज प्रताप सिंहदेव यांचा चित्त्याच्या शिकारीसोबतचा हा फोटो शेवटचा फोटो समजला जातो. १९५२ नंतर भारतात एकही चित्ता सापडल्याची नोंद सापडत नाही. १९५२ साली भारताने चित्ता देशातून नामशेष झाल्याचे घोषित केले. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतातून नामशेष होणारा हा एकमेव मोठा सस्तन प्राणी आहे. चित्त्यांच्या नामशेष होण्यामागे जंगलतोड हे कारण होते असे म्हटले होते. पण हे कारण १०० टक्के खरे आहे असे देखील नाही. यामागील इतर कारणे शोधण्याचा प्रयत्न केला तर दिसून येते की, स्वातंत्र्यपूर्व काळात मोठ्या प्रमाणावर होत असलेली शिकार हे मोठे कारण होते. पूर्वीच्या काळी शिकार हे शौर्याचं प्रतिक मानलं जातं होतं. उच्चभ्रू आणि राजघराण्यातील लोक खेळ-शिकारासाठी प्राण्याची शिकार करत असत आणि वाघांच्या तुलनेत चित्ता हे सोपे शिकार होते. त्यामुळं चित्त्यांची संख्या भारतात झपाट्याने कमी होत गेली. मात्र पुढे मोठ्या प्रमाणात शिकार केली गेल्याने ते नामशेष झाले. इराणमध्येही आता केवळ १२ चित्ते राहिले आहेत. आफ्रिकेत मात्र चित्त्यांचं आस्तित्व कायम असून सव्हानामध्ये चित्त्यांची संख्या मोठी आहे. जगभरातील जंगलांमध्ये देखील अवघे सात हजार चित्ते शिल्लक राहिले आहेत, त्यामुळे याला इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर या संस्थेच्या नामशेष होत चाललेल्या प्राण्यांच्या लाल



यादीमध्ये टाकण्यात आले आहे. मात्र आता या चित्यांची भारतात पुन्हा एंट्री होणार आहे. जवळपास ७० वर्षांनंतर भारतातील जंगलात चित्ता परत येणार आहे. त्याची डौलदार चाल पुन्हा एकदा भारतीय वन्यप्रेमींना पाहायला मिळणार आहे. मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यान आफ्रिकी चित्त्यांच्या स्वागतासाठी तयार आहे. अंतरमहाद्विपीय स्थानांतरण योजनेअंतर्गत त्यांना भारतात आणले जाणार आहे. जर सर्व गोष्टी ठरल्याप्रमाणे झाल्या तर चित्ता येत्या १५ ऑगस्ट पर्यंत भारतात येण्याची शक्यता आहे.

'केंद्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने (एनटीसीए) आफ्रिकन चित्त्यांचे भारतात पुनर्वसन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात परवानगीपर याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील सुनावणीत न्यायालयाने 'एनटीसीए'ला भारतात चित्त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी परवानगी दिली होती. भारतात चित्त्यांच्या पुनर्वसनाकरिता योग्य जागेची निवड करण्यासाठी न्यायालयाने तीन सद्यसीय तज्ज्ञ समितीची नियुक्ती केली होती. मध्य प्रदेशातील 'कुनो पालपूर अभयारण्या'चे वातावरण आफ्रिका खंडातील चित्त्यांच्या वास्तव्यास अनुकूल असल्याचा अहवाल २००९ च्या दरम्यान 'वाईल्ड लाइफ इन्स्टिटयूट ऑफ इंडिया' आणि 'वाईल्ड लाइफ ट्रस्ट ऑफ इंडिया' या संस्थांनी दिला होता. जयराम रमेश यांच्याकडे २००९ साली 'केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालया'ची सूत्रे असताना वाईल्ड लाइफ ट्रस्ट ऑफ इंडियाचे अध्यक्ष एम. के. रणजितसिंह यांनी भारतात चित्त्यांचे पुनर्वसन करण्याच्या योजनेचा प्रस्ताव ठेवला होता. केंद्रीय पातळीवर यासाठी अनुकूल निर्णय झाला होता. सुमारे ३०० कोटी रुपयांची ही योजना होती. मध्य प्रदेश सरकारनेही चित्त्यांच्या स्वागताची तयारी केली होती. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने गिरच्या सिंहांच्या मध्य प्रदेशातील स्थलांतराला अनुकूलता दर्शविताना चित्त्यांच्या पुनर्वसन योजनेला स्पष्टपणे नकार दिला होता.

ज्या देशांमध्ये चित्ते वास्तव्यास आहेत त्या देशांकडं भारताने चित्त्यांची मागणी केली होती. इराणमध्ये चित्ते असल्यामुळे त्यांच्याकडंही मागणी करण्यात आली होती मात्र इराणने चित्ते देण्यास नकार दिला होता. इराणने नकार दिला असला तरी नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेनं चित्ते देण्याची तयारी दर्शवली आहे. भारत सरकार यावर्षी ऑगस्टपर्यंत नामिबिया देशातून आठ चित्ते मध्य प्रदेशातील कुनो-पालपूर राष्ट्रीय उद्यानात आणण्याच्या तयारीत आहे. यानंतर टप्प्याटप्प्याने ३० ते ४० चित्ते भारतात येतील. नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेतून तज्ञांची टीम भारतात येऊन चित्त्यांची वाढ, त्यांचे पालनपोषण अशा गोष्टींवर भारताला मार्गदर्शन करणार आहे. हे दोन्ही देश जगात सर्वात जास्त चित्त्यांची संख्या असलेले देश समजले जातात. यात लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे जगात असे पहिल्यांदा होत आहे की, एका खंडातून दुसऱ्या खंडात एका प्राण्याच्या प्रजातीचे विस्थापन केले जात आहे. पण त्यांच पुनर्वसन योग्य पद्धतीने करण्याची आवश्यकता आहे. आफ्रिका आणि नामिबियातून आणलेले चित्ते थेट जंगलात सोडण्यात आल्यास ते पुन्हा नामशेष होण्याची भिती वन्यजीव अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. मात्र काहीही असले तरी भारतात आता बिबट्यांना बघून चित्ता म्हणण्याचे दिवस संपतील असे म्हणण्यास वाव आहे. चित्त्यांच्या येण्यामुळे भारताची पर्यावरणीय विविधता आणखी वाढणार आहे. देशातील जंगलांमध्ये असलेल्या अन्नसाखळीत प्रमुख शिकारी म्हणून चित्ता त्याची भूमिका पार पाडेल अशा विश्वास मंत्रालयाने व्यक्त केला आहे. ज्याप्रमाणे देशात जागरूकतेने वाघांची संख्या वाढवली जात आहे. त्याचप्रमाणे देशातील संरक्षित जगलांमध्ये चित्ते दिसू लागणार आहेत. भारतात चित्त्याची संख्या वाढावी यासाठी काही बाबींचा विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये जैव प्रयोगशाळा उभारण्याची अत्यंत आवश्यकता आहे. योग्य पद्धतीने चित्यांचं पुनर्वसन केल्यासं पुढच्या काही काळात देशात त्यांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. एखादा प्राणी परिसंस्थेत पुन्हा आणण्यासाठी किमान २० प्राण्यांची गरज असते. चित्ता मार्जार कुटुंबातल्या इतर कोणत्याही प्राण्यापेक्षा वेगाने धावू शकतो. पण अनेकदा त्यांना स्वतः केलेल्या शिकारीचं संरक्षण करता येत नाही आणि कोणीतरी ती पळवून नेतं. अनेकदा त्यांची पिल्लंही सिंहासारखे प्राणी घेऊन जातात. म्हणूनच कुंपण असणाऱ्या संरक्षित जागेमध्ये चित्ते जास्त चांगले जगत असल्याचं तज्ज्ञ सांगतात. कुंपण नसलेल्या जागांमधील चित्त्यांची लोकसंख्या अधिवास नष्ट झाल्याने आणि चित्त्यांचीच इतर प्राण्यांनी शिकार केल्याने कमी झाली. भारतातल्या अनेक जागा संरक्षित असल्या तरी त्यांना कुंपण नाही. त्यामुळे माणूस - जंगली प्राणी संघर्ष होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर सरकारलाही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. एखाद्या प्राण्याला अधिवासात पुन्हा वसवण्यात कायमच काही धोके असतात. पण असं करता येणं दुर्मिळ नाही. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात मलावीमधून चित्ते नामशेष झाले होते. २०१७ मध्ये मलावीमध्ये चार चित्ते पुन्हा वसवण्यात आले. आता इथल्या चित्त्यांची संख्या वाढून २४ झाली आहे. जंगलामध्ये चित्त्यांचं पुरेशा संख्येत प्रजोत्पादन करणं हे चित्ता पुन्हा आणण्यामागचं उद्दिष्टं असायला हवं. नॅशनल पार्कमध्ये फक्त काही प्राणी आणून सोडणं पुरणार नाही. हा प्रकल्प फारसा टिकणार नाही.

# याजसाठी केला होता अट्टाहास। शेवटचा दिस गोड व्हावा।।

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** आयुष्यात सार्थकी लागणारे क्षण बरेच असतात. काही काहींना ते लहानपणीच अनुभवायला मिळतात, काहींना मोठेपणी तर काहींना अजिबात नाही. मात्र आयुष्याचा शेवटचा क्षण सार्थकी लागण्याचा क्षण फारच कमी भाग्यवंतांच्या नशिबी असतो. वारकरी संप्रदायाचं एक भूषण असलेल्या श्री. अरविंद शर्माजींच्या भाळी परमेश्वराने हे भाग्य लिहिलं होतं.

सद्गुरू श्री सखाराम महाराज यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या श्री क्षेत्र लोणी येथे कचरूलालजी शर्मा यांच्या घरी, २९ जानेवारी १९६६ रोजी, अरविंदजींचा जन्म झाला. आदरणीय श्री कचरूलालजी शर्मा हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावंत पाईक होते. देशसेवेचे व्रत त्यांनी निष्ठेने आजन्म अंगिकारले. आणीबाणीच्या काळात त्यांना या निष्ठेपायी तुरुंगवासही भोगावा लागला पण या निर्धाराच्या सह्याद्रीने आपला घेतलेला वसा शेवटपर्यंत टाकला नाही. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या न्यायाने त्यांच्या घरी राष्ट्रसेवेला समर्पित असा कुलदीपक जन्माला. श्री कचरूलालजींपासून प्रेरणा घेऊन अरविंदजींनी देशसेवेचे आणि ईशसेवेचे व्रत घेऊन वयाच्या बाराव्या वर्षीच गृहत्याग केला. पवित्र ते कुळ, पावन तो देश, जेथे हरीचे दास जन्म घेती.!! श्री अरविंदजी शर्मा पुढे स्वतःच्या त्यागाच्या आणि साधनेच्या बळावर हरिभक्तिपरायण अरविंद शर्मा झाले. त्यांनी वारकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि सेवेसाठी अखंड जन्म झिजवला. मना चंदनाचे



श्री. अरविंद शर्मा

परी त्वा झिजावे, मरावे परी किर्तीरूपे उरावे हे समर्थ रामदासांचे शब्द त्यांनी अक्षरशः खरे करून दाखवले. इसवी सन १९९२ पासून त्यांनी पंढरपुरा गुढी नेण्यासाठी आपली स्वतःची दिंडी सुरू केली आणि अखंड ३० वर्षे अव्याहतपणे पांडुरंग परमात्म्याच्या चरणी सेवा देण्याचे धर्मकार्य त्यांनी मनोभावे पार पाडले. भगवंत श्रीकृष्णाने 'स्वधर्मे निधनं श्रेयः।" हे म्हटले खरे; पण ते वास्तवात उतरवून दाखवले केवळ हभप अरविंदजी शर्मा यांनीच!

पांडुरंगाच्या भक्तीत लीन असतानाच श्री क्षेत्र आळंदी येथे त्यांना देवाघरून बोलावणं आलं.१७ जुलै २०२२ रोजी मोठ्या निर्धाराने ते मृत्यूला सामोरे गेले. भोगावरी आम्ही घातला पाषाण, मरणा मरण आणियले। असे म्हणत त्यांनी इहलोक सोडला. त्यांचे पार्थिव माऊलींच्या महाद्वारी आणण्यात आले आणि टाळ मृदंगाच्या गजरात अभंग गात गात त्यांना शेवटचा निरोप देण्यात आला. भोवतालच्या हजारो वारकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले, माऊली ज्ञानेश्वरांच्या डोळ्यात पाणी आले, प्रत्यक्ष वरुणदेवाच्याही डोळ्याला पाणी आले!! धो धो पाऊस पडत होता आणि सर्वांच्या तोंडी एकच वाक्य होतं की आमच्या हक्कासाठी, न्यायासाठी लढणारा वाघ आमच्यातून चालला गेला. लटिका व्यवहार सर्व हा संसार, वाया येरझार हरीविण!!

त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन भाऊ, एक बहीण व आई असा आप्त परिवार आहे...

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# सायबर हल्ल्याच्या कचाट्यात भारत



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**देशातल्या 61 टक्के विविध संस्था आणि उद्योगधंद्यांच्या विकासावर सायबर हल्ल्याचा परिणाम झाला आहे. यामुळे या संस्थांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागले आहे. हा खुलासा एका आयटी विश्लेषक कंपनीने केला आहे. आपल्या देशातले 95 टक्के उद्योगधंदे आणि इतर संस्था डिजिटलीकरणच्या वाटेवर आहेत. ही महत्त्वाची बाब असताना सायबर हल्ल्याशी सामना करण्यासाठी पुरेशी सुरक्षा यंत्रणा मात्र आपण अद्याप विकसित करू शकलो नाही. आकडे सांगतात की, गेल्या दोन वर्षात 46 टक्के संस्था आणि उद्योजक कंपन्यांनी सायबर हल्ले झेलले आहेत. आर्थिकसारखी महत्त्वाची बाब असतानादेखील फक्त 20 टक्के संस्थांनीच डिझिटलीकरणच्या सुरुवातीच्या टप्प्यात सायबर सुरक्षेची व्यवस्था केली.**

देशातील विविध भागांमध्ये "सायबर अटॅक'चे प्रमाण वाढत असून, यातून अनेक गुन्हेदेखील होत आहेत. विशेषतः कोरोना काहीसा नियंत्रणात आल्यानंतर हे प्रमाण अधिक वाढले आहे. 2021 पासून देशात विविध ठिकाणी रोज सरासरी 3 हजार 803 सायबर हल्ल्यांची नोंद झाली आहे. "इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम'च्या (सीईआरटी-ईन) आकडेवारीतून ही चिंताजनक बाब समोर आली आहे. 'कोरोना'च्या कालावधीत ऑनलाईन शिक्षण, वर्क फ्रॉम होम तसेच 'डिजिटल पेमेंट'चे प्रमाण वाढले. याचाच फायदा सायबर गुन्हेगारांनी घेण्यास सुरुवात केली. 'सीईआरटीईन" ही माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत येणारी संस्था असून, भारतीय सायबर स्पेस अधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीने याची स्थापना झाली आहे. 'सीईआरटी-ईन'ला सूचना मिळालेल्या व त्यांनी ट्रॅक केलेल्या माहितीनुसार 2019 मध्ये वर्षभरात सायवर सुरक्षासंदर्भात 3 लाख 94 हजार 499 घटना समोर आल्या होत्या. 2020 मध्ये हा आकडा अडीच पटींहून अधिक वाढला व वर्षभरात 11 लाख 58 हजार 208 घटनांची नोंद झाली, 2021 मध्ये 14 लाख 2 हजार 809 सायबर हल्ले झाले, तर या वर्षात पहिल्या सहा महिन्यांतच 6 लाख 74 हजार घटना नोंदविल्या गेल्या आहेत. सातत्याने सायवर हल्ले वाढत असून, सायबर हल्ले व सायबर दहशतवादही देशासमोरील मोठी समस्या बनत असल्याचे चित्र आहे.

सायबर गुन्हेगारांकडून विविध माध्यमांतून सायबर हल्ले व सायबर सुरक्षा तोडण्याचे प्रयत्न होत असतात, 2021 च्या आकडेवारीनुसार अनधिकृत नेटवर्क स्कॅनिंगमुळे सायबर सुरक्षेशी निगडित 4 लाख 32 हजार 47 प्रकरणांची नोंद झाली, तर असुरक्षित सेवांचा वापर केल्याने सर्वाधिक 7 लाख 28 हजार 276 सायबर हल्ले झाले. 'व्हारस' व 'मालवेअर'च्या माध्यमातून 2 लाख 9 हजार 110 ठिकाणी सायबर सुरक्षा यंत्रणा भेदण्यात आली.

विविध संस्था, संघटना, उद्योजक कंपन्या आदींवर सायबर हल्ल्यांची, वेबसाइट हॅकिंग आणि अवैध देवाण-घेवाण असे गुन्हे घडत आहेत. भारतीय हमी आणि विनिमय बोर्ड (सेबी) ने सायबर हल्ले निष्प्रभ करण्यासाठी सध्याचे फ्रेमवर्क मजबूत बनवण्याची आणि सायबर सुरक्षा अभेद्य बनवण्याची दीर्घकालीन रणनीती आखण्यावर जोर देत असल्याचे म्हटले होते. पण सायबर हल्ल्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढच होत आहे. यात संस्था, संघटना आणि खास करून बँकांबाबत लोकांमध्ये नाराजी वाढली आहे.गेल्या वर्षी अमेरिकी कंपनी एफआयएसद्वारा वैश्विक स्तरावर केलेल्या एका सर्व्हेक्षणात असे आढळून आले आहे की, देशातला 18 ते 36 वयोवर्ग असलेला युवा घटक सध्याच्या बँकांच्या कार्यप्रणालीवर नाराज आहे. कारण या बँका आपल्या ग्राहकांच्या अपेक्षांच्या कसोटीवर उतरलेल्या नाहीत. बँकांसमोर अनेक आव्हाने आहेत, यात शंकाच नाही. पण सायबर हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करण्यात या बँका कमी पडल्या आहेत. सरकारचे आकडे सांगतात की, गेल्या तीन आर्थिक वर्षांमध्ये बँकांशी संबंधित सायबर अपराधाचे 43 हजार 204 प्रकरणे समोर आली आहेत. यात अपराध करणाऱ्यांनी 232.32 कोटी रुपयांना चुना लावला आहे.

एका अभ्यासानुसार देशात आयटी ॲक्टनुसार नोंदणीकृत सायबर अपराधांच्या घटनांमध्ये 2011 पासून आतापर्यंत जवळपास तीनशे टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. या अभ्यासात सांगण्यात आले आहे की, जर सायबर अपराधांवर नियंत्रण मिळवण्यात यश आले नाही तर सायबर हल्ले करणारे हल्लेखोर न्यूक्लियर प्लांट,रेल्वे, परिवहन आणि दवाखाने यांसारख्या महत्त्वपूर्ण संस्थां-संघटनांवर हल्ले करू शकतात. यामुळे गंभीर समस्या उद्भवू शकते. जनजीवन आणि सर्व कामे ठप्प पडू शकतील. काही वर्षांपूर्वी भारतासह जगातल्या अनेक देशांची हॅकरांनी सायबर हल्ला करून झोप उडवली होती.

गेल्या दशकभरात भारतात सायबर गुन्ह्यांमध्ये 88 टक्के वाढ झाली आहे. सायबर गुन्हे प्रकरणात अटक करण्याच्या घटनांमध्येही दहा टक्के वाढ झाली आहे. सायबर गुन्ह्यांबाबतीत अमेरिका आणि चीननंतर भारताचा तिसरा क्रमांक लागतो. आज भारतातील मोठी लोकसंख्या डिझिटल जीवन जगत आहे. बहुतांश लोक बँक खात्यापासून खासगी गोपनीयपर्यंतची संपूर्ण माहिती कॉप्ट्युटर आणि मोबाईल फोनमध्ये ठेवत आहे. इंटरनेट वापर करण्याबाबत जग वेगाने पुढे जात आहे. इंटरनेटवर ज्या वेगाने अवलंबत्व वाढले आहे, त्याच वेगाने धोकेदेखील वाढले आहेत. याच कारणांमुळे हॅकिंगच्या घटनाही वाढत आहेत. भारतातच देश-विदेशातल्या अनेक कंपन्या इंटरनेट आधारित कारोबार आणि सेवा प्रदान करत आहेत. भारत सरकारने अशा कंपन्यांवर लक्ष ठेवण्यासाठी देखरेख यंत्रणा उभी करण्याची आवश्यकता आहे. ज्या कंपन्या किंवा संस्था सायबर संबंधित नियमांचे पालन करणार नाहीत, त्याचे लायसन्स रद्द करण्याची पावले उचलायला हवीत. सायबर हल्ल्याप्रकरणी कडक कायद्यांची अंमलबजावणी व्हायला हवी आहे. याशिवाय अनेक परदेशी कंपन्या भारतात सेवा देत आहेत, त्यांचे सर्व्हर विदेशात आहे. अशा कंपन्यांना देखरेखीखाली आणणे मोठे आव्हान आहे.

भारतात सायबर गुन्हे रोखण्याबाबत कायदा आहे. भारतात सायबर गुन्हे तीन मुख्य अधिनियमांमध्ये ठेवण्यात आले आहे. हे अधिनियम आहेत- प्रौद्योगिक अधिनियम, भारतीय दंड संहिता आणि राज्यस्तरीय कायदा. माहिती प्रौद्योगिकी अधिनियम अंतर्गत येणाऱ्या प्रमुख प्रकरणांमध्ये कॉम्प्युटर स्त्रोत आणि दस्ताऐवजांमध्ये गडबड, कॉम्प्युटर सिस्टिमची हॅकिंग, आकड्यांमध्ये हेराफेरी, अश्लिल सामग्रीचे प्रकाशन, गोपनीयतेचा भंग अशा प्रकारच्या अपराधांचा समावेश आहे. भारतात सायबर गुन्ह्यांबाबत माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 आणि माहिती तंत्रज्ञान संशोधन कायदा 2008 लागू आहे. परंतु, अशाच श्रेणीच्या काही प्रकरणांमध्ये भारतीय दंड संहिता, कॉपीराइट कायदा 1957, कंपनी कायदा, सरकारी गोपनीयता कायदा आणि गरज पडली तर आतंकवाद निरोधक कायद्यानुसारही कारवाई होऊ शकते.

सायबर गुन्ह्यांचे बदलते प्रकार आणि घटनांनी भयंकर समस्यांचे रुप घेतले आहे. गुन्ह्यांच्या विश्वात गुन्हेगार नेहमी कायद्याची दिशाभूल करण्यासाठी नवनवे प्रकार शोधत असतात. हॅकिंगच्या माध्यमातून सुरक्षेशीसंबंधित गोपनीय माहिती चोरण्याच्या घटना कित्येकदा समोर आल्या आहेत.

सीबीआय कार्यालयासारख्या संस्थादेखील सायबर हल्ल्याच्या कचाट्यात आल्या आहेत. आपल्या देशात सायबर हल्ले वाढण्याची प्रमुख कारणे म्हणजे आपल्या देशात सायबर गुन्हे रोखण्यासाठी आणि गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी कडक व प्रभावी कायद्याचा अभाव दिसून येतो. दुर्भाग्य असे की अजूनही सायबर गुन्हा दखलपात्र गुन्हा मानला जात नाही. यासाठी जास्तितजास्त शिक्षा तीन वर्षे आहे. सरकारने सायबर गुन्ह्यांसंबंधीत कायद्यांमध्ये बदल करून तो आणखी कठोर बनवायला हवा. आणि शिक्षाही वाढवायला हवी. देशात सायबर गुन्ह्यांचा निपटरा करण्यासाठी सायबर पोलिस ठाण्यांची संख्या वाढवण्याची आवश्यकता आहे. बहुतांश शहरांमध्ये सायबर गुन्ह्यांची तक्रार सामान्य पोलिस ठाण्यांमध्येच केली जाते.साध्या पोलिस ठाण्यातील कर्मचारी या कामांसाठी सक्षम नाहीत. देशात सायबर पोलिस ठाण्यांची संख्या पन्नासपेक्षाही कमी आहे.

वास्तविक, सरकारला सायबर हल्ले थांबवण्यासाठी , त्याला लगाम घालण्यासाठी कठोर कायदा बनवावाच लागेल. सर्वांना सायबर सुरक्षासंबंधी उपायांचे पालन करावे लागेल.



# "म्हातारी"

आधुनिक केसरी

बस थांबली तसे सगळे प्रवासी आत चढले. म्हातारीनंही आपलं गाठोडं उचललं आणि ती बसमध्ये चढू लागली.
"ए म्हातारे , आत चढू नको. बसमध्ये जागा नाही." म्हातारीला बघताच कंडक्टर डाफरला. "का रे बाबा, सगळ्यास्नी जागा आहे आणि मलाच जागा नाही होय ?" म्हातारी बोलली.
" तुझ्याकडं ओझं आहे म्हणून. कशाचं आहे ते गठुळं ?"
" वांगी हाईत."
"मग मागच्या बसनं ये. ही सीटी बस आहे. यातनं सामान नेता येत नाही."
"एवढं कुठं जास्त आहे ? तर नुसती एक बुट्टी तर आहे." म्हातारीनं एव्हाना वांग्याची बुट्टी बसमध्ये ढकलली होती. तीही वर चढली आणि दारासमोरच्या बाकड्यावर बसली.
" म्हातारे , तिकीट कुठलं देवू ?" कंडक्टरनं विचारलं.
"मार्केट दे बाबा एक."
"लगेजचं तिकीट पण घ्यावं लागेल."
"ते काय असतंय ?"
"हे तुझ्याजवळ गठुळं आहे की नाही त्याचंही तिकीट घ्यावं लागेल."
"एवढं एवढं तर हाय. त्याला रे कसलं तिकीट ?...का उगाचच छळायचं गरीबाला ?"
"तुला सामानाचं तिकीट तर काढावंच लागेल."
"काढ तर मग ! ..पण मी एक पैसाबी देणार नाही त्याचा."
इतक्यात बस थांबली.
एक सैनिक आपल्या बायकापोरांसह आत शिरला. जवळ दोन मोठ्या बॅगा आणि तीन हात लांबीची एक ट्रंक. "कंडक्टर, दोन फुल्ल दोन हाफ, रेल्वे स्टेशन." कंडक्टरनं तिकिटं फाडून दिली.
"आता का लगेज फाडला नाहीस रे लेका ? ....का ट्रंकला लगेज नसतंय ?" म्हातारी बोलली तशी बसमधली सगळी माणसं हसली. "घरात आया भनी आज्ज्या कोण नसल्यावाणी वागत्यात माणसं." म्हातारीनं पुढं म्हटलं आणि कंडक्टर तोंडात मारल्यासारखा गप्प बसला. मार्केटचा स्टॉप आला. म्हातारी ओझं घेऊन खाली उतरली.
ती मंडईत आली तेव्हा बाजार भरायला लागला होता. तिनं डोक्यावरचं गाठोडं खाली ठेवलं. ती एक कापड अंथरुन त्यावर वांगी पसरणार इतक्यात, " ए म्हातारे, तिथं बसू नको. ती जागा माझी आहे." असं कुणी तरी ओरडलं. म्हातारी मग पलीकडच्या बाजूला सरकली. तिथंही तसंच. व्यापारी लोक तिला तिथं बसूच देईनात. म्हातारी पुढं सरकत सरकत पार एका कोपऱ्यात गेली आणि तिथं टेकली.
तो कोपरा पार अडगळीत होता. कधी तरी एखादं गिर्हाइक त्या बाजूला फिरकायचं. बऱ्याच वेळानं एक तरूणी आली.
"आज्जी, वांगी कशी दिली ?" तिनं विचारलं.
" दहा रुपये पावशेर."
"पाच रुपयांना देणार ?"
"एवढं स्वस्त देऊन कसं परवडेल बाळा ?"
"मग राहू दे." ती मुलगी तशीच दुकानात शिरली आणि दहा रुपयांचं चॉकलेट घेऊन गेली.
नंतर एक एक गिर्हाइक येवू लागलं आणि किलो, अर्धा किलो, पाव किलो वांगी घेऊन जाऊ लागलं.
"मावशे, वांगी कशी?" एका सुशिक्षित माणसानं गाडीवर बसूनच विचारलं." "वीस रूपये अर्धा किलो." म्हातारी बोलली.
"एक किलो घेतो. निम्म्या दरानं देणार काय सांग !"
"गाडी नवी घेतलीस वाटतं लेकरा ?"
"होय ! कालच आणली."
"किती रूपयाला ?"
"पंचावन्न हजारला."
"मग त्यांनी किती किंमत कमी केली ? का निम्म्या किंमतीतच आणलीस ?"
तो माणूस काही बोलला नाही.गाडीला किक् मारून पळाला.



म्हातारीची वांगी विकून झाली तेव्हा दुपारचे बारा वाजले होते. उन्हानं म्हातारीचं अंग भाजत होतं. तहानेनं तोंड कोरडं पडलं होतं. काल दिवसभर एकादशीचा उपास. सकाळी चहा घ्यायचा होता. पण बस चुकली तर काय करायचं म्हणून ती तशीच घोटभर पाणी पिऊन आलेली. मघापासून तिला फिरवायला लागलेलं. तिनं पैसे मोजले. नुसते दोनशे वीस रूपये आता यात म्हाताऱ्याची बीपीची औषधं, आठवड्याचं तेल, मीठ, कसं काय बसवायचं ? विचार करत करत ती उठली आणि काय होतंय कळायच्या आतच खाली कोसळली.
अरे ! म्हातारी पडली, म्हातारी पडली असा गलका झाला आणि लोक जमले.
"कशी काय पडली ?"
"उन्हाचा तडाखा बसला असेल."
"सकाळपासून काही खाल्लं नसेल त्यामुळं साखर कमी झाली असेल."
"कुणी सांगावं तंबाखू पण लागली असेल."
सतरा जणांची सतरा तोंडं !
कुणी तिच्या नाकाला कांदा लावला, कुणी पाणी मारलं तर कुणी वारा घातला. घटका भरानं म्हातारी शुद्धीवर आली.
"म्हातारे, सकाळपासून काय खाल्लंय का ?" कुणीतरी विचारलं. म्हातारीनं नकारार्थी मान हलवली.
"चल, मग काय तरी खाऊन घे. नाहीतर कोम्यात जाशील." दोघा तिघांनी तिला समोरच्या हॉटेलात नेलं. आत गेल्यावर ती तिथंच खाली फरशीवर बसली.
" आज्जी, वर बसा की !" वेटर बोलला.
"असूदे हितंच ."
"काय खाणार ?"
"काय हाय ?"
" बैंगन मसाला आणि रोटी देवू ?"
"ते काय असतंय ?"
"वांग्याची भाजी आणि रोटी !"
"चालंल." म्हातारी बोलली.
"तोपर्यंत एक लस्सी बिस्सी द्या रे एक. नाही तर तुमचं जेवण येईपर्यंत म्हातारी पुन्हा एकदा चक्कर येऊन पडायची." बरोबर आलेला माणूस बोलला आणि निघून गेला.
म्हातारीचं जेवण झालं.
"आज्जी, भात देऊ ?" वेटरनं विचारलं.
"नको. पैसं किती झालं ?"
"एकशे ऐंशी रूपये."
"किती ?"
"एकशे ऐंशी रूपये. साठ रुपयांच्या दोन रोट्या, नव्वद रुपयांचा बैंगन मसाला आणि तीस रुपयांची लस्सी."
"एवढं पैसं एका जेवणाला ?"
यष्टीचं जाण्यायेण्याचं चाळीस रुपये आणि जेवणाचं एकशे ऐंशी.... दोनशे वीस रुपये झाले.
म्हातारी हिशेब लावत होती...
चार महिन्यापुर्वी वांग्याची झाडं लावली, चार महीने त्यांची निगा राखली. कालपासून वांगी तोडली. आणली. बाज़ारात आणून विकली. एवढं सगळं करुन पाटीभर वांग्याचे दोनशे विस रुपये ? आणि एका जेवणाचे पण दोनशे विस रुपये ? मग
कालपासुन जीवाचा एवढा आटापीटा केला तो कशासाठी ? नुसत्या एका जेवणासाठी ? आता आठवडाभर काय करायचं ? तेल मीठ कुठनं आणायचं ? आणि म्हाताऱ्याच्या औषधाचं काय ?
विचार करुन म्हातारीला पुन्हा चक्कर आली आणि ती भुईवर कोसळली. कोसळली ती कायमचीच.....!
वस्तू घेताना समोर कोण आहे, याचा विचार नक्कीच करावा. व्यापारी व परिस्थितीशी लढणारी म्हातारी यातील फरक ओळखावा.
तुमची ऐपत व बार्गेनिंग मॉलमध्ये व AC दुकानात करा. कृपया गरीब लोकांच्या वस्तूंची बार्गेनिंग करुन त्यांच्या गरीबीची कुचेष्टा करु नका. शक्य तेवढे घ्या. तुमच्यामुळे किमान त्यांना नफा राहू दे, पोटभर जेवायला तरी मिळेल.....
(बाजारातील सुशिक्षित तरुणवर्ग व खेडोपाड्यातील अशिक्षित शेतकरी मायबाप वस्तुस्थितीवर आधारीत सत्य कथन.......)*



## मुलांचा कलाविष्कार

**आलिया साजेद पटेल**
**औरंगाबाद वर्ग-8 वा**

## अरे पावसा...!

अरे पावसा रे पावसा
कोठे धुंवाधार पडतो,
काही ठिकाणी नुसताच
तू मोठ्याने गडगडतो.

अरे पावसा रे पावसा
कधी लपंडाव खेळतो,
केव्हा सारखा बरसून
कधी दूर-दूर पळतो.


अरे पावसा रे पावसा
चोहीकडे होते चिखल,
राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या
जीवनाची होती उकल.

अरे पावसा रे पावसा
तू बरसे मुसळधार,
नदी-नाले तुडूंब वाहे
गावात येई महापूर.

अरे पावसा रे पावसा
आम्हावर तू कर दया,
आता बरसने थांबव
उभी पिके जाईल वाया...!

-अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## फुलपाखरे..!



किती छान छान दिसे
रंगीत फुलपाखरे,
वेलीवर -फुलांवर
बसे फुलपाखरे.

किती गोड-गोड हसे
निळे-जांभळे पंख गडे,
फुलांवरती झुलूनी
उंच-उंच दूर उडे.

डोळे बारीक -बारीक
गोल मणी लुकलुक,
हिरव्या गवतावरती
येई वाऱ्याची झुळूक.

धरायला गेल्यावरती
कुणी येत नाही हाती,
फुलांजवळ जाताच
उंच उडुनिया जाती...!

-अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## बे चा पाढा

बे एके बे
खेळायला दे
बे दुणे चार
अभ्यास केला फार
बे त्रिक सहा
जरा इकडे पहा
बे चोक आठ
खोड्या करा पाठ
बे पंचे दहा
दूध नको चहा
बे सखे बारा
आई चा पहा तोरा
बे सते चौदा
खाऊचा चेंदा मेंदा
बे आठे सोळा
नको बाबा शाळा
बे नवे अठरा
म्हणू नका नखरा
बे दाहे वीस
द्या मला फीस

-बलराज संघई
संपर्क क्र. : 9420015108

# हा नोकर चोर आहे

आधुनिक केसरी

एके दिवशी एक श्रीमंत व्यापारी बिरबलाकडे आला आणि म्हणाला, माझ्या घरी कोणीतरी चोरी केली आहे. माझे दागिने चोरले आहेत. माझ्या घरी दहा नोकर आहेत. त्यांच्यापैकीच कोणीतरी ते चोरले असल्याचा माझा संशय आहे. मी त्यांच्यापैकी सगळ्यांना विचारले पण त्यातील एकजणही कबूल झाला नाही. कृपा करून तुम्ही यातून काहीतरी मार्ग काढा.
बिरबल त्या व्यापाऱ्याच्या घरी गेला. त्याने त्या दहाही नोकरांना एकत्र बोलावले व त्यांना म्हणाला, की माझ्याकडे दहा जादूच्या काठ्या आहेत. त्या मी तुम्हाला देत आहे. या काठ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व काठ्या समान आहेत. मी त्या तुम्हाला देत आहे. आज तुमच्याकडे ठेवा व उद्या मला परत करा. ज्याने चोरी केली असेल, त्याची काठी रात्रीत एक इंचाने वाढेल. दागिने चोरणारा नोकर घाबरला. आपली चोरी पकडली जाईल म्हणून तो काठी एक इंचाने कापतो. त्याला वाटते की सकाळी ती परत एक इंचाने वाढेल व कुणाला काही कळणार नाही. दुसऱ्या दिवशी बिरबलाने नोकरांच्या हातातील काठ्या पाहिल्या.
त्याला एका नोकराची काठी छोटी झाल्याचे आढळले. त्याच्याकडे बोट दाखवत बिरबल म्हणाला, 'हा नोकर चोर आहे. त्यानेच तुमचे दागिने चोरले.' शेवटी त्या नोकरानेही ते कबूल केले व त्या व्यापाऱ्याचे दागिने परत केले.



# नवी पहाट



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**माननीय द्रौपदी मुर्मू आता महामहीम झाल्या आहेत.एक आदिवासी महिला देशाची राष्ट्रपती बनलेली आहे. देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान होण्याची एखाद्या आदिवासी महिलेची ही पहिलीच वेळ आहे. जग आधुनिक होत आहे. सगळीकडे फाईव्ह स्टार संस्कृती सुरू आहे. माणसाच्या रंगावरून, कपड्यांवरून, बोलीभाषेवरून त्याला कमी लेखण्याची प्रथा ज्या समाजात सुरू आहे त्या समाजामध्ये व त्या देशामध्ये एखाद्या ग्रामीण आदिवासी महिलेला राष्ट्रपतीपदासारख्या सर्वोच्च पदावर विराजमान करण्याचे साहस भाजपाने दाखविलेले आहे. आज पर्यंतच्या इतक्या सरकारांमध्ये आदिवासी समाजाला सुद्धा प्रतिनिधित्व दिले पाहिजे अशा पद्धतीचा विचारही कुठल्याही पक्षाने केलेला नव्हता. भाजपाने उचललेले हे पाऊल म्हणजे मोदीजींच्या "सबका साथ, सबका विकास" या घोषणेला धरूनच केलेले कार्य आहे.**

आदिवासी समाज ज्याला आपण वनवासी असे सुद्धा म्हणतो तो समाज नेहमीच शहरापासून दूर जंगलात राहिलेला आहे. त्यामुळे स्वाभाविकच शिक्षणाचे, सर्व प्रकारच्या सोयी सुविधांचे, शहरी सभ्यतेचे संस्कार या समाजावर अत्यंत कमी होऊ शकले. विकासापासून सुद्धा हा समाज खूप दूर राहिला. ज्यांच्या गावात जाण्यासाठी रस्ता नाही, ज्यांच्या गावात शाळा नाही, विज नाही, पाणी नाही, इंटरनेट वाय-फाय यापासून तर हे लोक फारच दूर आहेत. आजही मोठा समाज जंगलातील वनउपज गोळा करून, त्याला विकून त्यावर आपला उदरनिर्वाह करणारा समाज आहे. यांच्या वाट्याला आलेच तर, फारतर रोजगार हमी योजनेतील रस्त्याचे खड्डे खोदण्याचे काम किंवा तेंदू पत्ता गोळा करण्याचे काम येते. अशा समाजातील व्यक्तीला राष्ट्रपती पदावर बसविण्याचे साहस करणे हे खरोखरच फार मोठे कार्य आहे. साहस हा शब्द यासाठी वापरला जात आहे की आपल्या घरी आलेल्या चार पाहुण्यां मध्ये सुद्धा एखादा पाहुणा धोतर नेसलेला असेल ग्रामीण दिसत असेल, बोली भाषेमध्ये इंग्रजी शब्दांचा वापर नसेल तर अशा पाहुण्याला इतरांपेक्षा कमी मान मिळतो. हा समाज अजूनही व्यक्तीच्या दिसण्याला त्याच्या पेहरावाला, बोलीभाषेला अतिशय महत्त्व देतो व त्यावरून समोरचा माणूस किती शिक्षित आहे किंवा सन्माननीय आहे हे ठरविले जाते. स्वामी विवेकानंद ज्या वेळेला अमेरिकेत गेले होते त्यावेळेस त्यांच्या कपड्यांकडे पाहून कोणीतरी त्यांच्यावर टिप्पणी केली. त्यावेळेला ते जे म्हणाले त्याचा भावार्थ असा की तुमच्या देशामध्ये व्यक्तीला त्याच्या पोशाखावरून ओळखले जाते. म्हणजे तुमचा मान सन्मान तुमची ओळख तुमचा टेलर ठरवितो. तर आमच्या देशामध्ये व्यक्तीच्या चरित्रावरून म्हणजेच त्याच्या कार्यावरून त्याची ओळख होते. त्या अनुसरून ओरिसातल्या एका खेडेगावात राहणारी एखादी स्त्री, जीचा चेहरा मोहरा अजिबात शहरी नाही, आधुनिकतेचा जिच्या चेहऱ्यावर कुठलाही मागमूस नाही, अशा पद्धतीच्या महिलेला भाजपाने दिलेली ही संधी ही भारतीय लोकशाहीतील मोठी घटना आहे.



काही लोक असे म्हणतील की भाजपाला येणाऱ्या काळातील विधानसभा निवडणुकांमध्ये आदिवासी राज्यांमध्ये विजय प्राप्त करायचा आहे म्हणून त्यांनी असे केलेले आहे. केवळ आदिवासी व्यक्तीला राष्ट्रपती केल्याने निवडणूक जिंकता येते असा विश्वास जर इतर पक्षांच्या मनात असता तर त्यांनीही असे केले असते. ज्यावरून इतके वर्षात काँग्रेसने असे केले नाही त्यावरून असे काही असावे असे वाटत नाही. परंतु भाजपाने जे केले ते काँग्रेसही करू शकली असती किंवा इतर पक्षांनी सुद्धा करायला हरकत नव्हती. परंतु ज्या अर्थी त्यांनी ते केले नाही त्याअर्थी आदिवासी समाजाला त्यांनी महत्व दिले नाही असेच यावरून म्हणावेसे वाटते.

गेल्या अनेक दशकांपासून आदिवासी म्हणजेच वनवासी समाजामध्ये अनेकानेक देश विरोधी शक्तींच्या कारवाया सुरू आहेत.ख्रिश्चनांच्या धर्मांतरणाला बळी जर सर्वप्रथम कुठला समाज पडत असेल तर जंगलात राहणारा हाच आदिवासी समाज आहे. याच आदिवासी समाजामधील तरुणांना त्यांची दिशाभूल करून नक्षलवादी गतिविधि मध्ये ओढले जात असते. आसाम, नागालँड, मणिपूर, मिझोराम आदी प्रदेशांमध्ये सुद्धा तेथील आदिवासी समाज हा अराष्ट्रीय तत्वांच्या अधिक जवळ गेलेला होता. गडचिरोली जिल्ह्यामध्ये तर "मावा माटो, मावा राज, अशा पद्धतीची घोषणा फार प्रसिद्ध होती. माझे गाव, माझे सरकार म्हणजे काय? दिल्लीतील सरकार हे वेगळे आहे व आमचे सरकार काहीतरी वेगळे आहे अशा पद्धतीची भावना या समाजामध्ये निर्माण केली जात होती. आम्ही आदिवासी आहोत हिंदू नाहीत अशा पद्धतीचा अपप्रचार सुद्धा या समाजामध्ये केला जात होता. महामहीम द्रौपदी मुर्मू यांचे राष्ट्रपती होणे हा या देशातील समस्त वनवासी गिरीवासी, आदिवासी समाजाला दिल्या गेलेला एक संदेश आहे की या देशाच्या स्वातंत्र्यामध्ये तुमचे योगदान होते. आता या देशाच्या विकासात सुद्धा तुमचे योगदान राहणार आहे. तुम्ही आता स्वतःला प्रवाहा पासून वेगळे समजण्याची आवश्यकता नाही. कारण तुमच्यातीलच एक महिला आज देशाची सर्वोच्च महिला बनलेली आहे. म्हणजे हा देश भेदभावावर विश्वास ठेवत नाही. या देशाची लोकशाही प्रत्येकाला समान संधी देण्यावर विश्वास ठेवते. व मागील आठ वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे सरकार हे प्रत्येकाला समान संधी देण्यासाठी वचनबद्ध आहे, कटीबद्ध आहे. व त्यानुसार ते कार्य करीत आहे असाही संदेश यातून जात आहे. देशातील सामाजिक ताना बाना कायम राहावा, सामाजिक समरसता कायम राहावी, समाजामध्ये एकोपा कायम राहावा, समाजातील सर्वच घटक एकमेकांच्या सोबत उभे राहून त्यांनी कार्य करावे यासाठी द्रौपदी मुर्मू यांचे राष्ट्रपती बनणे ही खूप मोठी गोष्ट आहे. मागील आठ वर्षात देशाने अनेक क्षेत्रांमध्ये कात टाकलेली आहे. देश समोर जात आहे. विज्ञानाच्या तंत्रज्ञानाच्या, सामाजिक प्रगतीच्या, अशा सर्व क्षेत्रांमध्ये देश समोर जात आहे. द्रौपदी मुर्मू यांचे राष्ट्रपती होणे ही यातीलच एक कडी आहे. भारताच्या विकासाची, उज्वल भवितव्याची ही एक नवी पहाट आहे.

आधुनिक केसरी
प्रथम वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा




प्रोप्रा. बशीर करीम सय्यद
Mob. 8793815151

हॉटेल क्रिस्टल कोर्ट

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यामागे, मुंबई-पुणे रोड, पिंपरी चौक, पिंपरी, पुणे - ४११०१८ फोन ०२०-६५७०६१५१/२७४२०४४९

लॉजिंग, मिटींग हॉल इत्यादी
उत्तम सेवा, मध्यवर्ती लोकेशन

शेतकरी संघटना जन शक्ती
आधुनिक केसरी
प्रथम वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
शेतकरी संघटना जन शक्ती



अतुल भाऊ खूपसे पाटील
जनशक्ती संघटना संस्थापक अध्यक्ष



अनिल पाटील शेळके
जनशक्ती संघटना जिल्हाध्यक्ष संभाजीनगर



उदय भाऊ गवळी पाटील
जनशक्ती संघटना उपजिल्हाध्यक्ष संभाजीनगर

# जो दु:खाला प्रज्ञाचक्षू ने जाणतो तो दु:खाचा अंत करू शकतो

आधुनिक केसरी

**जगात दुःख आहे. मनुष्य प्राणी दुःख भोगतो आहे, या जगत आर्य सत्यावर आणि मनुष्यमात्राला दुःखातून मुक्त करणाऱ्या तत्वांवर, उपायांवर तथागतांची संपूर्ण शिकवण आधारलेली आहे. "दुःख" हा त्यांच्या शिकवणीचा मूळ पाया आहे. या पायावरच तथागतांची संपूर्ण शिकवण उभी आहे. बौद्ध साहित्यात विविध प्रकारे दुःखाची मांडणी केली असल्याचे दिसते. जसे:- सर्व प्रकारच्या मानसिक वेदना व शारीरिक यातना, दारिद्र्य, दैनावस्था, जन्म, जरा, मृत्यु, दुःख दोर्मनस, उपा यास, निराशा, कष्ट, चिंता, व्याधी, इच्छांची अपूर्णता, प्रियांचे वियोग, अप्रियांचे संयोग, यापैकी जन्म, जरा, व्याधी आणि मरण या दुःखावर जास्त भर देण्यात आले आहे. जन्म, जरा मरण या क्रमशा घडणाऱ्या घटना आहेत. जन्म आहे म्हणून जरा आणि मरण आहे. जन्मच नसेल तर जरा मरण नसणार आणि मनुष्य मात्र या दुःखातून मुक्त होईल. मग जन्म का आहे? तर क्रेविंग मुळे जन्म आहे किंवा पुनर्जन्म आहे. क्रेविंग म्हणजे पुन्हा पुन्हा जन्म घेण्याची, भव चक्रात पडण्याची, जन्म-मृत्यूच्या चक्रात पडण्याची इच्छा आणि उपादान.जन्म किंवा पुनर्जन्म संसरणामुळे घडतो. संसरन म्हणजे मृत्युसमयी संस्कारयुक्त चित्त किंवा विज्ञान चित् काया त्यागून आईच्या गर्भाशयात प्रवेश करतो म्हणजे प्रतिसंधी चित्तासी एकरूप होतो व मनुष्याचा जन्म घडतं. संक्षिप्त स्वरूपात अशी मांडणी बौद्ध साहित्यात केलेली आहे. याला कारण म्हणजे ज्या भिन्न संस्कृती व भिन्न संस्कृती पातळीच्या लोकांमध्ये बौद्ध धम्माचा प्रसार झाला, त्यांच्या आचार विचार आणि समजुतीचा प्रतिकूल परिणाम होय. "बुद्ध आणि त्यांचा धम्म" या ग्रंथातील पारिभाषिक शब्द साम्यामुळे तात्विक भेद कसे लपून राहतात? या भागात जन्म, पुनर्जन्म तसेच कर्म सिद्धांताबाबत तथागत बुद्धांच्या सत्य वचनांची तसेच आत्म्यावरील विश्वास हा अधम्म होय या प्रकरणात नामरूप सिद्धांताची बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी यथार्थ मांडणी केलेली आहे.**

दुःख आर्यसत्यची दुसरी बाजू.

"बोधिसत्त्वाला बुद्धाची दृष्टी प्राप्त होते व ते बुद्धाच्या धम्माची यथार्थ मांडणी करतात."


1. बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब काठमांडू येथील दिनांक 20 -11 -56 च्या भाषणात म्हणतात की ,"जगात दुःख आहे हे जगत मान्य सत्य आहे .असे सांगून बुद्धाने दुःखाची परिभाषा निरनिराळ्या अर्थाने केली .दुःख म्हणजे पुनर्जन्म, दुःख म्हणजे जीवन मरणाचा फेरा असाही अर्थ बुद्धाने केलेला आहे ,परंतु या अर्थाशी मी ( डॉक्टर बाबासाहेब )सहमत नाही .दुःख हा शब्द दारिद्र्य ,गरीबी या अर्थाने उपयोगात आणला गेला असल्याचे बौद्ध वांग्मयातून दिसून येते.

2. बुद्ध आणि त्यांचा धम्म "या ग्रंथातील परिचय भागात बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब लिहितात :-"जीवन दुःख आहे ,मृत्यु दुःख आहे आणि पुनर्जन्म दुःख आहे , तर सर्व काही संपलेच म्हणायचे .या जगात ना धम्म ना तत्त्वज्ञान माणसाला सुखी करण्याच्या प्रयत्नात मदतगार सिद्ध होईल .जर या दुःखापासून मुक्ती नसेल तर धम्म तरी काय करू शकणार ?जन्मापासून जे दुःख अस्तित्व येते अशा दुःखातून मानवाला मुक्ती मिळवण्यासाठी बुद्ध तरी काय करू शकणार ?(जाती ,जरा ,व्याधी आणि मृत्यु या चार तत्वांना डॉक्टर बाबासाहेब चार आर्य सत्य संबोधतात. हे माझे स्वतःचे आकलन आहे) ही चार आर्यसत्य अबौद्धांनी बौद्ध धम्म स्वीकारण्याच्या मार्गात एक मोठाच अडथळा आहे .ही चार आर्य सत्य मानवाला आशा नाकारतात .ही चार आर्यसत्ये तथागत बुद्धांच्या सत्य वचनांना निराशावादी ठरवतात. काय ही चार आर्यसत्य बुद्धाच्या मूळ सत्य वचनांचा भाग आहेत ?कि ती भिक्खूंनी नंतर दिलेली जोड आहे

3. बौद्ध धम्म निराशावादी आहे काय? या प्रकरणात बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब लिहितात" असं सांगितल्या जाते की, भगवान बुद्धांनी आपल्या प्रथम प्रवचनात म्हटले होते की जन्म दुःखद आहे, वृद्धत्व दुःखद आहे, मृत्यू दुःखद आहे .परंतु हा एक कलापूर्ण अतिशयोक्तीचा प्रकार आहे आणि तो प्रभाव पाडण्यासाठी, परिणाम साध्य करण्यासाठी वापरला गेला आहे .जन्म दुःखद आहे, ही अतिशयोक्ती आहे ,हे तथागत बुद्धांच्या एका प्रवचनाचा संदर्भ देऊन सिद्ध करता येईल ,की ज्यात त्यांनी सांगितले आहे की मानव जन्म ही एक अमोल श्रेष्ठ आणि दुर्लक्ष वस्तू आहे. माता पित्याची अवस्था सुखकर आहे. निबान परम सुखाचे परिणाम साध्य करण्यासाठी जीवनात प्रत्येकाने आर्य अष्टांगिक मार्गाचे सदाचरण करणे आवश्यक आहे.

4. बुद्ध आणि त्यांच्या धम्म" ग्रंथात बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब मनुष्यमात्राला भोगावे लागणारे दुःख म्हणजे सर्व प्रकारच्या मानसिक वेदना आणि शारीरिक यातना अशी बुद्ध वचनांची मांडणी करतात आणि हे दुःख जगत मान्य सत्य आहे .या दुःखाची कारणे अज्ञान ,विकार यातून सामाजिक व आर्थिक कारणांमुळे, माणसामाणसात घडणारा अनुचित व्यवहार आहे .यावरील उपाय आर्य अष्टांगिक मार्ग आहे ,अशाप्रकारे बुद्ध वाचानांची बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब मांडणी करतात .

5. जगात दुःख आहे. मनुष्यप्राणी दुःख भोगतो आहे .या दुःखाला कारणे आहेत. आणि हे कारणे नष्ट करून मनुष्यमात्राला निबानाचे



परमसुख प्राप्तीचे उपाय आहेत .याला जर आपण अनुलोम समजले आणि त्या अनुषंगाने प्रतीलोमाची मांडणी करण्याचे प्रयत्न केले ,तर ते पुढील प्रमाणे असेल :-मनुष्यमात्राला निबाना चे परमसुख प्राप्तीसाठी दुःखाची कारणे कोणती आहेत हे परिभाषित होणे आवश्यक आहे .दुःखाच्या कारणावरून दुःख परिभाषेत होणे आवश्यक आहे .या प्रतिलोम पद्धतीने दुःख परिभाषित केल्यास जन्म ,जरा आणि मरण हे दुःख परिभाषित होऊ शकत नाहीत."

6. "बुद्ध आणि त्यांच्या धम्म "ग्रंथातील "निबान "प्रकरणात बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब बुद्ध वचनांची पुढीलप्रमाणे मांडणी करतात :-पाच उपादन स्कंद जळत आहेत .( डॉक्टर बाबासाहेबांनी केलेल्या मांडणीचे हे संक्षिप्त रूप आहे )आणि हे राग अग्नि ने ,द्वेष अग्नीने ,मोह अग्नीने ,अज्ञान अग्नीने ,जन्म जरा ,मृत्यू ,दुःख ,दोर मनस, उपायास, आणि निराशा या अग्नीमुळे जळत आहेत. राग अग्नि यात क्रेविंग मुळे उद्‌भवणारे विकार आहेत. द्वेष अग्नि यात अँटी पॅथी ने उद्‌भवणारे विकार येतात .आणि मोह अग्नीने ,अज्ञान अग्नीने यात सर्व प्रकारच्या अज्ञानातून उद्‌भवणारे जडता, मूर्खता आणि मुडता हे येतात .याचा संबंध जे सर्व विचार सत्यापासून भिन्न असतात ,त्यांच्याशी निगडीत आहे. ( टीप :-अज्ञान ,अविद्या यासाठी अग्नि हे रूपक वापरले आहे.) जन्म, जरा, मृत्यू बाबतचे अज्ञान अर्थात जाती, जरा, मरण हे दुःख आहे, असे मानणे म्हणजे अज्ञान .या अज्ञानातून मुक्त होण्यासाठी :बुद्ध आणि त्यांचा धम्म" या ग्रंथातील पारिभाषिक शब्द साम्यामुळे तात्विक भेद कसे लपून राहतात ?या भागातील जन्म ,पुनर्जन्म व कर्मसिद्धांत तसेच आत्म्यावरील विश्वास हा अधम होय या प्रकरणातील नामरूप सिद्धांत अभ्यासावे लागतील.

"जो दुःखाला प्रज्ञाचक्षू ने जाणतो तो दुःखाचा अंत करू शकतो "

"धम्म चक्र प्रवर्तन पौर्णिमेनिमित्त आपणास कोटी कोटी मंगल कामना". आपला धम्म बंधू

**शे.ह .सहारे**
**8275254361**






GI-ONE HOSPITAL
AURANGABAD
INSTITUTE OF GASTROENTEROLOGY

## पोटविकाराकडे दुर्लक्ष करणे ठरू शकते धोकादायक !

# जीआय वन हॉस्पिटल

आधुनिक केसरी

**औरंगाबाद : मराठवाड्यामध्ये वर्ष २०२० पूर्वी पोट व लिव्हर विकारासाठी रुग्णांना ठिकठिकाणी जावे लागत होते. सर्व अद्ययावत सुविधा मिळत नसल्याने त्यावेळी रुग्णांना मुंबई, पुणे, हैदराबाद तसेच अन्य मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागत होती. या सर्व बाबींचा विचार करून पोट व लिव्हर विकार तज्ज्ञांच्या पाच जणांनी औरंगाबादमध्ये एकत्रित येत जीआय वन हॉस्पिटलची सुरुवात केली. याठिकाणी एन्डोस्कोपी, कोलोनोस्कोपी, ईआरसीपी, लॅप्रोस्कोपी आणि खुल्या शस्त्रक्रियांची सुरुवात करण्यात आली.**

रेल्वे स्टेशन रोडवर गोल्डी सिनेमाच्या बाजूला असलेल्या जीआय वन हॉस्पिटलमध्ये मेडीकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. वैभव गंजेवार (एमडी, डीएम), डॉ. अशोक मोहिते (एमडी, डीएम, डीएनबी), व डॉ. विनय झंवर (एमडी, डीएम, डीएनबी) आणि सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. संदीप भालसिंग (एमएस, डीएनबी), डॉ. मुकेश राठोड (एमएस, FIAGES) यांचा समावेश आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांत मराठवाडा तसेच आजूबाजूच्या परिसरातील हजारो रुग्णांनी येथे उपलब्ध असलेल्या सुविधांचा लाभ घेतला. हळूहळू मौखिक प्रसिद्धीने मराठवाड्यासह विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांसोबतच गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक, छत्तीसगड आणि राजस्थानातील रुग्णांनी देखील जीआय वन हॉस्पिटलमध्ये आरोग्य तपासणी करत याठिकाणी असलेल्या अद्ययावत अशा सुविधांचा लाभ घेतला. हा अनुभव लक्षात घेत हॉस्पिटलच्या वतीने अद्ययावत एन्डोस्कोपीक अल्ट्रासाऊंड (इ यू एस) ज्याद्वारे विना शस्त्रक्रिया शरीरातून बायप्सी करणे, वेगवेगळ्या भागातून पू काढणे, धोकादायक शस्त्रक्रिया सहजपणे करता येतात, कॅप्सूल एन्डोस्कोपी ज्याद्वारे आतडीतील सुक्ष्म रक्तस्त्रावाचे निदान करणे, हायट्रोजन ब्रेथ टेस्ट (एचबीटी), ॲडव्हान्स इन्फ्रारेड लॅप्रोस्कोपी ज्याद्वारे दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करताना होणारी गुंतागुंत टाळणे यासारख्या अत्यंत उपयोगी गोष्टी



साध्य करता आल्या आहेत तसेच अत्याधुनिक फायब्रोस्कॅन ज्याद्वारे लिव्हरची इजा ओळखणे सुविधा उपलब्ध करून दिली. मूळव्याध, भगंदर आणि फिशरसारख्या आजारांवरही अत्याधुनिक लेझरद्वारे शस्त्रक्रिया येथे केल्या जातात. अन्न नलिका तसेच गुदद्वारासंबंधी तपासणी करण्यासाठी मॅनोमेट्री ची सुविधादेखील येथे उपलब्ध आहे.

अत्याधुनिक उपचार पद्धतीद्वारे विविध आजारांवर मात करता येणे शक्य असल्याने जीआय वन हॉस्पिटलमध्ये थर्ड स्पेस एन्डोस्कोपीद्वारे केली जाणारी POEM शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे जठर तसेच आतडीच्या अस्तरावरील गाठी काढणे (इएमआर/इएसडी), सर्व प्रकारच्या हर्नियावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया तसेच अतिशय क्लिष्ट समजली जाणारी लिव्हर, स्वादुपिंड, पानथरी आणि आतडीवरील शस्त्रक्रिया तसेच सर्व प्रकारच्या कॅन्सर शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे तथा खुल्या पद्धतीने करण्याच्या सुविधा येथे उपलब्ध आहेत. सर्वोच्च रुग्णसेवेचा मापदंड समजला जाणाऱ्या एनएबीएच संस्थेची मान्यता मिळवणारे मराठवाड्यातील पहिले पोट व लिव्हर विकार हॉस्पिटल ठरले आहे. इतकेच नव्हे तर जीआय वन हॉस्पिटलच्या डॉक्टरांची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली जाते. त्यामुळे विविध राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परिषदांमध्ये याठिकाणच्या डॉक्टरांना सहभागी होऊन मार्गदर्शनाची संधी सातत्याने मिळत आहे.

मराठवाड्यातील पहिल्या स्टोमा क्लिनिक (पोटावर काढलेला शौचाचा अनैसर्गिक मार्ग) याचीही सुरुवात करण्यात आली. आजवर शेकडो रुग्णांनी स्वतः शिकून स्वावलंबीपणे पूर्ण देखदेख करण्याची समर्थतता मिळवली आहे. रुग्णांना यकृत प्रत्यारोपणाविषयी (लिव्हर ट्रान्सप्लांट) माहिती मिळावी या उद्देशाने लिव्हर ट्रान्सप्लांट क्लिनिकची सुविधा महिन्यातून चार वेळा देण्यात येते.

पचनसंस्थेशी निगडित सर्व प्रकारच्या सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासोबतच रुग्णांसाठी आवश्यक सोनोग्राफी, सीटी स्कॅन, पॅथॉलॉजी लॅब तसेच फार्मसी व कँटीनची सुविधाही येथे उपलब्ध आहे. सामाजिक बांधिलकी जपत जीआय वनच्या वतीने डॉक्टर तसेच फ्रंट वर्कर्ससाठी कोविडच्या कठीण काळातही हेपिटायटिस बी लसीकरण, मोफत आरोग्य तपासणी शिबीर तसेच रुग्णालयाच्या प्रत्येक वर्धापनदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते.

**GI One Hospital- Institute of Gastroenterology Multi-speciality Clinic**
Amrut Sai Solitaire, Landmark Near Goldie Cinema, Railway Station Road, Aurangabad.
Contect : 9850835616 Ph. 0240-2355616 Mail : info@gionehospital.com









# खरी गोल्ड मेडालिस्ट

आधुनिक केसरी

**वासु भाई आणि वीणा बेन गुजरातमधील एका शहरात राहतात. आज दोघंही प्रवासाला निघण्याची तयारी करीत होते. तीन दिवसांची सुट्टी मिळणार होती. व्यवसायनं ते दोघेही डॉक्टर आहेत.त्यामुळे खूप मोठी सुट्टी ते घेऊच शकत नाहीत. परंतु जेव्हा केव्हा त्यांना दोन तीन दिवसाची सवड मिळते तेव्हा तेव्हा ते त्या काळात दोन तीन दिवस कुठल्यातरी ठिकाणाला भेट देतातच. आज त्यांचा इंदौर- उज्जैनला भेट द्यायचा विचार होता.**

ते दोघेही जेव्हा एकत्र वैद्यकीय महाविद्यालयात शिकत होते तेव्हाच ते दोघं एकमेकांच्या प्रेमात पडले होते आणि वैद्यकीय शिक्षण पूर्ण होता होता त्यांच्या प्रेमाचा वटवृक्ष तयार झाला होता. वैद्यकिय शिक्षण पूर्ण झाल्यावर दोघांनीही आपल्या कुटुंबीयांच्या संमतीनं विवाह केला. आता विवाहाला दोन वर्षे झालेली आहेत, पण अजून तरी ते दोघांचे तीन झालेले नाहीत. म्हणूनच, फुरसत मिळाली की ते कुठेतरी प्रवासाला जाऊन येतात. दोघांनाही प्रवास करायला भारीच आवडतंही.

विवाहानंतर दोघांनीही बँकेचं कर्ज घेऊन आपापली इस्पितळं थाटली आहेत.  वीणाबेन स्त्री-रोग विशेषज्ञ आहेत तर वासुभाई एम डी आहेत. दोघेही निष्णात डॉक्टर असल्यामुळे त्यांचा व्यवसाय चांगला सुरू आहे. तर त्यादिवशी ते आपल्या कारनं प्रवासाला निघाले. आकाशात ढगांनी गर्दी केली होती. मध्यप्रदेशची सीमा अजूनही जवळपास दोनशे किलोमीटर दूर होती तेव्हाच पावसाला सुरुवात झाली होती. म.प्र. सीमेच्या ४० कि.मी. आधीचं एक छोटं शहर पार करण्यासाठी त्यांना बराच उशीर झाला. रस्त्यावरील चिखल आणि वाहनांची गर्दी यातुन कसाबसा रस्ता काढत ते मध्यप्रदेशच्या सीमेकडे जाऊ लागले. संध्याकाळचं जेवण मध्यप्रदेशातील एखाद्या गावामध्ये उरकण्याचा त्यांचा विचार होता परंतु पावसामुळे त्यांना उशीर होत होता. आता दुपारच्या चहाची वेळ झाली होती. मध्य प्रदेशातील ते शेवटचं छोटं शहर ओलांडून त्यांची कार चार ते पाच किलोमीटरवर पोहोचली असेल नसेल इतक्यात त्यांना रस्त्याच्या लगत असलेले एक छोटसं घर दिसलं त्या घराच्या बाहेर वेफर्सची पाकीटे लटकलेली होती. हे बहुधा एखादं छोटेखानी हॉटेल असावं असं त्यांना वाटलं.

वासुभाईनं त्या ठिकाणी आपली कार थांबवली. ते दुकानावर गेले परंतु समोर कुणीच नव्हतं.

त्यांनी आवाज दिला. घरातून एक महिला बाहेर आली. तिनं विचारलं, "काय हवंय भाऊ आपल्याला ?"

वासुभाईनं वेफर्सची दोन पाकिटं घेतली आणि ते म्हणाले, "ताई, जरा दोन कप चहा बनवून देता का? जरा लवकर हं, आम्हाला अजून बरंच दूर जायचं आहे." ती हो म्हणाली.

पाकीटं घेऊन वासूभाई कार मध्ये जाऊन बसले. दोघांनीही वेफर्सचाच नाष्टा केला. अजून पर्यंत चहा आला नव्हता. दोघंही कार मधून बाहेर निघून दुकानासमोर ठेवलेल्या खुर्च्यांवर जाऊन बसले.

वासुभाईनं फिरून आवाज दिला.

इतक्यात घरातील ती महिला आतून बाहेर आली आणि म्हणाली, "माफ करा हं! परसात तुळशी आणायला गेले होते. तुळशीची पानं आणायला वेळ लागला. आता लगेच चहा बनवून देते."

काही वेळानंतर एका प्लेटमध्ये दोन मळकट कप घेऊन त्यातून गरमागरम चहा घेऊन ती बाहेर आली. ते मळके कप बघून वासूभाई एकदम अपसेट झाले आणि आता त्यावर ते काही बोलणार इतक्यात वीणाबेननं वासूभाईंच्या हातावर अलगद आपला हात ठेवला आणि काहीही न बोलण्याचा त्यांना इशारा केला.

दोघांनी चहाचे कप आपल्या हाती घेतले चहाला मस्त आल्याचा आणि तुळशीच्या पानांचा सुगंध येत होता. दोघांनीही चहाचा एक घोट घेतला. इतका स्वादिष्ट आणि सुगंधित चहा ते दोघेही जीवनात पहिल्यांदाच पित होते. त्यांच्या मनाची अस्वस्थता कुठल्या कुठे पळून गेली.

चहा पिऊन झाल्यावर वासू बाईंनी त्या महिलेला विचारलं, "किती पैसे झाले?"

महिला म्हणाली, "वीस रुपये"

वासुभाईनं शंभराची नोट पुढे केली.

महिला म्हणाली, "भाऊ सुट्टे पैसे नाहीत. कृपया वीस रुपये सुट्टे द्याना."

वासुभाईनं वीस रुपयांची नोट देऊ केली.

महिलेनं शंभराची नोट परत केली.

वासुभाई म्हणाले, "आम्ही तर वेफर्सची पाकीटंही घेतली आहेत !

महिला म्हणाली, "वीस रुपये त्याचेच झाले. चहाचे पैसे नाही घेतले."

"अरे! चहाचे पैसे कां नाही घेतलेत ?"

ती म्हणाली, "आम्ही चहा विकत नाही. हे हॉटेल नाही."

"मग आपण चहा कशाला बनवून दिलांत?"

"आपण अतिथि आहात. आपण चहा मागितला. आमच्यापाशी दूधही नव्हतं. आमच्या छोट्या मुलाकरता थोडं दूध वेगळं काढून ठेवलं होतं. परंतु आता तुम्हाला नाही कसं म्हणायचं? म्हणून मग मुलासाठी बाजूला काढून ठेवलेल्या दुधाचा चहा तुम्हाला करून दिला."

"मग आता त्या छोट्या मुलाला काय पाजणार?"

"एक दिवस दूध प्यायला मिळालं नाही म्हणून कांही तो मरून नाही जाणार. याचे वडील आजारी आहेत. ते शहरात जाऊन दूध आणू शकले असते. पण त्यांना कालपासुन ताप आहे. आज जर ते बरे झाले तर उद्या सकाळी गावात जाऊन ते दूध घेऊन येतील."

वासुभाई त्या महिलेचे हे बोलणं ऐकून एकदम गप्प झाले. त्यांच्या मनात विचार आला, 'या महिलेनं हे तिचं हॉटेल नसून घर असतानासुद्धा आपल्या मुलासाठी काढून ठेवलेल्या दुधाचा चहा बनवून दिला आणि ते सुद्धा केवळ एवढ्यासाठीच की मी मागितला म्हणून, आणि मी अतिथी आहे आणि अतिथीनं कांही मागितलं आहे असं समजून! संस्कार आणि सभ्यता यामध्ये ही महिला माझ्या खूप पुढे आहे.'

ते त्या महिलेला म्हणाले, "आम्ही दोघेही डॉक्टर आहोत. आपले पति कुठे आहेत?" महिला त्यांना घराच्या आत घेऊन गेली घरातलं दारिद्र्य बघता क्षणीच लक्षात येण्यासारखं होतं. आंत एका खाटेवर एक गृहस्थ झोपून होता. फार हडकुळा दिसत होता. वासुभाईनं जाऊन त्याच्या कपाळावर आपला हात ठेवला. त्याचं कपाळ बरंच गरम वाटत होतं. त्या गरम कपाळावर ठेवलेला त्यांचा हातही गरम झाला होता. थंडी आणि तापामुळं त्या गृहस्थाचं सर्वांग थरथरत होतं.

वासुभाई परत आपल्या कारपाशी गेले. कार मधून त्यांनी आपली औषधाची बॅग उचलली. त्यातून २, ३ औषधी गोळ्या काढून त्यांनी त्या आजारी माणसाला पाण्यासोबत घ्यायला सांगितल्या आणि ते त्याला म्हणाले, "केवळ या गोळ्यांनी हा रोग बरा होण्यासारखा नाही. मी हा असाच मागल्या शहरात जाऊन इंजेक्शन आणि सलाईनची बाटली घेऊन येतो."

वीणाबेनला रोग्यापाशी बसायला सांगून ते गाडी घेऊन शहरात गेले. तिथून अर्ध्या तासामध्ये सलाईनची बाटली आणि इंजेक्शन्स घेऊन ते परत आले. सोबतच त्यांनी दुधाच्या पिशव्याही आणल्या होत्या.

त्यांनी पहिल्यांदा त्या आजारी माणसाला इंजेक्शन दिलं, सलाईनची बाटली वर भिंतीला लटकवून त्याला सलाइन लावलं. सलाईनची बाटली संपेपर्यंत ते दोघेही डॉक्टर पती-पत्नी त्याच्या उशाशी बसून होते. त्या महिलेनं पुन्हा एकदा तुळशी आणि आलं घालून केलेला चहा दोघांनाही प्यायला दिला. दोघांनीही चहा घेतला आणि चांगला चहा पाजल्याबद्दल त्या महिलेचे फिरून एकदा आभार मानले. जेव्हा आणखी कांही वेळानंतर त्या आजारी माणसाची तब्येत थोडी सुधरली तेव्ह मग डॉक्टरद्वय आपल्या पुढील प्रवासाला रवाना झाले. तीन दिवस इंदौर-उज्जैनला राहून जेव्हा ते परतले, तेव्हा येतांना त्यांनी त्या महिलेच्या मुलासाठी ढिगभर खेळणी आणि दुधाची पाकिटं आणली. त्यांनी त्याच दुकानासमोर आपली गाडी उभी केली.

बाहेरूनच त्यांनी त्या महिलेला आवाज दिला. आवाज ऐकून ती दोघंही नवराबायको घराबाहेर आले. समोरच्या डॉक्टरद्वयांना पाहून त्यांना खूप आनंद झाला. तो आजारी माणूस सांगू लागला, "डॉक्टर, तुम्ही दिलेल्या औषधांनी मला लगेच दुसऱ्या दिवशीपासूनच बरं वाटू लागलं होतं."

वासुभाईंनी त्याच्या लहान मुलाला खेळणी दिली. दुधाची पाकीटं त्या महिलेच्या हवाली केली.

फिरून एकदा, तशाच आलं, तुळशीपानं घातलेल्या चहानं त्या डॉक्टरांचं स्वागत झालं. आता दोन्ही कुटुंबात आपलेपणा निर्माण झाला होता. वासुभाईंनी आपलं व्हिजिटिंग कार्ड त्यांच्या हाती ठेवलं आणि म्हणाले, "तुमचं जेव्हा केव्हा आमच्या गावी येणं होईल तेव्हा आमच्याकडे नक्की या." त्यानंतर ते दोघंही आपल्या गांवी रवाना झाले.

शहरात परतल्यावर वासुभाईं त्या महिलेची गोष्ट विसरले नाहीत. त्यांनी आपल्या मनाशीच एक निर्धार केला. आपल्या इस्पितळातील रिसेप्शनवर बसलेल्या व्यक्तिला ते म्हणाले की येथून पुढे आपल्या इस्पितळात जे कुणी रोगी येतील त्यांचं नांव तेवढं रजिस्टरवर नोंदवायचं, त्यांच्याकडून फी वसूल करायची नाही. फी मी स्वतःच त्यांच्याकडून घेईन. आणि मग त्या दिवसापासून जेव्हा पेशंट त्यांच्या दवाखान्यात येत ते गरीब असतील तर त्यांच्याकडून डॉक्टर फी घेत नसत. केवळ ऐपत असलेल्या पेशंट्सकडूनच ते फी घेऊ लागले.

हळू हळू शहरात त्यांची भरपूर प्रसिद्धी झाली. दुसऱ्या डॉक्टरांच्या कानावर ही प्रसिद्धी पडली तेव्हा यामुळे आपली प्रॅक्टिस कमी होईल आणि लोक आपली निंदा करू लागतील अशी त्यांना भिती वाटू लागली. त्यांनी असोसिएशनच्या अध्यक्षांना हे सांगितलं : असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. वासुभाईंना भेटायला आले आणि ते त्यांना म्हणाले, "आपण हे सारं कशासाठी करीत आहात?"

तेव्हा वासुभाईंनी जे उत्तर दिलं ते ऐकून असोसिएशनचे अध्यक्ष देखिल प्रभावित झाले.

वासुभाई म्हणाले, "मी माझ्या जीवनातील प्रत्येक परीक्षेत मेरिटमध्ये पहिल्या क्रमांकाने पास होत आलेलो आहे; एम.बी.बी.एस. मध्येही, एम.डी. मध्येही गोल्ड मेडलिस्ट होतो परंतु सभ्यता, संस्कार आणि अतिथि सेवा यांत ती खूप गरीब असलेली गांवातली महिला माझ्या समोर निघून गेली आहे. मग मी कसा मागे राहू?म्हणूनच मी अतिथि-सेवा आणि मानव-सेवा यांतही गोल्ड मेडलिस्ट होणारच. तेवढ्याच साठी मी ही सेवा सुरू केली आहे. आणि मी तर म्हणतो की आपला वैद्यकीय व्यवसाय हा मानव सेवेचाच व्यवसाय आहे. सगळ्या डॉक्टर लोकांना मी आवाहन करतो की त्यांनी सेवा भावनेनं आपला व्यवसाय करावा. गरीबांची निःशुल्क सेवा करावी, उपचार करावा. हा व्यवसाय केवळ कमाईचा व्यवसाय होऊन रहायला नको. भगवंतानं आपल्याला मानव-सेवेची संधी दिलेली आहे."

असोसिएशनच्या अध्यक्षांनी वासुभाईंना प्रणाम केला आणि त्यांना धन्यवाद देत ते म्हणाले की मीही यापुढे याच भावनेनं माझा व्यवसाय चालवणार आहे.












# घराचे वय !

आधुनिक केसरी

**प्रत्येक घराचे वय असते.. कोणी लिहिलय माहित नाही पण छान आणि बरोबर लिहिलय ..... आज सकाळपासून ती तापाने फणफणली होती,... कालच डॉक्टरांनी अगदी कडक शब्दात सांगितलं होतं,...दोन दिवस फक्त आरामच करायचा,...त्यामुळे अभयने आपल्या मावशीला गावाकडून बोलावून घेतलं होतं,...गाव तसं तासभर अंतरावर होतं,... छोटीशी शेती,घर सांभाळत मावशी एकटी रहात होती,...ठेंगणी, ठुसकी गोरी गोमटी मावशी अभयच्या एका फोनवर सकाळीच दारात हजर,...तेंव्हा बाईसाहेबांचं कुरकुरत,..वाकत कपबश्या विसळणं सुरू होतं,..**



पोरं शाळेत निघून गेले होते,...मावशीने लगेच तिच्या हातातुन कप काढून घेत तिला रूममध्ये झोपायला पाठवलं,...अभय कुरकुरत मावशीला म्हणाला,"आग फार चिडचिड करत असते ही पसारा,पसारा म्हणत,...आता तू जरा समजव तिला तब्येत बघ कशी झालीये तिची कालच डॉक्टर म्हणालेत जरा दोन काम कमी करून आराम करत जा,...म्हणजे शरीराला शीण येणार नाही आणि दोन चार महिन्याला असा ताप येणार नाही,...पण ही बया ऐकेल तर,." मावशी हसुन म्हणाली अरे असतंच बायकांना सगळ्याच डगरीवर हात ठेवावा वाटतो,.. आता आहे मी आठवडाभर सांगते तिला समजावून,....चल तुला डबा भरून देते तू निघ उशीर होईल तुला,... अभय गेला मावशीने मस्त आल्याचा चहा बनवला आणि आली रूपाच्या खोलीत,...रूपा उठून बसली,"मावशी अहो चहा कशाला केलात,..?" घे ग तेवढंच फ्रेश वाटेल तुला,... रोज नोकरी,मुलांचं,नवऱ्याचं आणि घराचं करून दमत असशील ना,..."मावशीने तिच्या डोक्यावरून हात फिरवला तसं तिला रडूच आलं,.."खरं आहे मावशी,खुप थकून जाते मी,... कदाचित म्हणूनच शरीर असे दुखणे काढत असेल आरामासाठी ,पण काय करणार मावशी घरात इतका पसारा होतो ना की खुप वेळ तर माझा घर आवरण्यातच जातो,.." मावशी हसुन म्हणाली,..."प्रत्येक घराचं ना वय असतं ते स्वीकारायला शिकता आलंना  मग त्रास होत नाही पसाऱ्याचा,..." तिला कळेना नेमकं काय म्हणायच आहे मावशींना आणि घराला वय म्हणजे..??मावशींच्या लक्षात आलं,..हिला घराचं वय कळलं नाही,...मावशी हसुन म्हणाली,... तू प्राजक्ताकडे जातेस ना,..म्हणजे माझी सून ग नोकरीमुळे नाही राहत माझ्याकडे,...तिच्या घरी तू गेली आहेस ना,....मावशीच्या प्रश्नाला ती उत्तर देत म्हणाली,.."हो घरभर खेळणे पसरलेले असतात,... अगदी उड्या मारून जायची वेळ येते हं!.... अश्या घराचं वय 1 ते 5 वर्ष,...आता तुझ्याकडे आहे का असा पसारा नाही आता तुझ्याकडे गोष्टींची पुस्तकं,.. रंग,खडू,रंगीत कागद आणि कपडे म्हणजे तुझ्या घराचं वय आहे 6 ते 15,...आपल्या सुनीलकडे म्हणजे माझ्या पुतण्याकडे सगळीकडे फोन,चार्जर,कपडे,पुस्तकं,.. बुटांचे चपलांचे जोड,..ते वेगवेगळे स्प्रे ह्याचाच पसारा कारण त्या घरच वय 15 ते 20 आणि आता माझंच घर बघ काही पसारा नाही कारण पिल्लं गेलेत ग उडून घरट्यातून मग कोण पसारा करतंय,... सगळं चित्रातल्या सारख आहे,... काही हलत नाही मला फार वाटतं कसे कसे वय होऊन गेले घराचे पण आता हे बिनपसाऱ्याच म्हातारपण पेलवत नाही,.. म्हणून त्या घरच ते वय छान आनंदाने स्वीकारायला शिक कारण आपण बायका उगीच चिडचिड करून सगळ्यांना बेजार करतो आणि हे सगळं समोर असलं ना तर मुलं त्याला हात लावतात ठेवून दिल की गेलं नजरे आड,... थोडी फार आवरा आवर ठिक पण त्यासाठी अगदी दमछाक करून अस आजारपण नको ग,...घराचे हे वय परत येत नाहीत पिल्लं आहेत तेव्हाच घराची ही मजा अनुभवायची असते,... मग आहेच आपलं म्हातारपणीच शांत आणि स्वच्छ घर,.. तिलाही पटलं मावशींच म्हणणं आणि खरंच आठवलं मुलांचं बालपण सगळीकडे खेळणे,...बाहुल्या,सायकली,..आता सगळे पुस्तकं, रंग पण आता मावशींनी घराच्या वयाची दृष्टी दिल्याने नकळत तिला तो पसारा वाटत नव्हता तर घर सजावटीच सामानच वाटत होतं,...ती हसुन म्हणत होती 6 ते 15 वयातल आहे माझं घरं आणि कौतुकानं घराकडे पहात होती.













# अनावश्यक संदेश

आधुनिक केसरी

**मोबाईल मध्ये किंवा संगणकामध्ये जादाचे मेसेज किंवा अनावश्यक संदेश काढून टाकतो आणि त्याला स्वच्छ करतो त्यामुळे पून्हा त्याचे काम चांगल्या पद्धतीत सुरु होते तसेच मनातील अनावश्यक विचार काढून टाकले की मनाची अवस्थाही चांगल्या विचारांनी काम करायला लागते त्यालाच म्हणतात मनाचे रिबुटींग हल्ली प्रत्येकाजवळ स्मार्ट फोन आहे. स्मार्ट फोन म्हटलं कि सोशल मिडीयाशी प्रत्येक व्यक्ती जोडलेला असतो .त्या अनुषंगाने येणारे मेसेज, व्हिडीओ किंवा काही फोटोज यामुळे मोबाईल वर खुप ताण येतो आणि मग तो भरकटल्या जहाजासारखा वागतो.मग आपण त्यातील अनावश्यक माहीती काढुन टाकतो.**

रोज येणारे नेहमीचे सुविचार काढुन टाकतो . इतकं करुनही मोबाईल व्यवस्थित काम करत नसेल तर मग शेवटचा उपाय म्हणजेच त्याला आपण बंद करतो आणि पुन्हा सुरु करतो. असाच प्रकार संगणकाच्या बाबतीतही आपण करतो..यानंतर मात्र मोबाईल किंवा संगणक पुर्वीप्रमाणे काम करु लागतो .यालाच रिबुटींग म्हणतात ...संगणकीय भाषेत छोट्या छोट्या बग्ज या रिबुटींग मुळे नाहीसे होतात.. रिबुटींग करताना या छोट्या छोट्या फाईल्स स्वरुपातील अडथळे नाहीसे होतात..आणि आपली सिस्टीम छान पैकी आपल्याला सेवा द्यायला तयार होते .

आपण या इलेक्ट्रॉनीक्स शी इतके परीचित झालोय कि कोणाला हे बंद करुन पुन्हा चालु करणे सांगावे लागत नाही

.... मानवी मनाचं देखील असंच असतय. खुपदा मनामध्ये भरपुर कचरा साठलेला असल्याने संभ्रमावस्था निर्माण होते..आता तुम्ही म्हणाल हा कचरा काय प्रकार आहे ?.

हा कचरा म्हणजे भौतिक वस्तु नसते तर विचारांचा गोंधळ मनात साठलेला असतो .आणि हे साठलेले विचार मग आपल्याला इतर काम करण्यात अडथळा आणतात.

या विचारांची उगमस्थाने आपणच तयार केलेली असतात.यात प्रमुख भुमिका आपल्या अहंकाराची असते . मनाची लवचिकता न ठेवल्याने नातेसंबंधात या अहंकाराने कटुता येते . प्रत्येक व्यक्ती चा स्वभाव वेगळा असतो. त्यानुसार अहंकार, राग, चांगलेपणा, कपटीपणा असे अनेक मानवी स्वभावाचे पैलु आपल्याला दिसतात.

फक्त नाते संबंधच नाही तर मित्रपरिवारातही आपण खुप अपेक्षा ठेवत असतो आणि अपेक्षाभंग झाला कि त्याचे दुःख हे होणारच.मुळात ही सगळी आप्तस्वकीय किंवा मित्रपरिवार जशी आहेत तशी स्वीकारली तर खुपदा असे कटुता वगैरे प्रश्न निर्माण होत नाहीत..थोडक्यात काय तर आपल्या स्वभावामुळे आपण आपल्या मनात बराच कचरा जमा करत असतो .हा कचरा बाहेर तर टाकला गेलाच पाहीजे नाहीतर त्या संगणकासारखच आपली पण सिस्टीम शुद्धपणे काम करत नाही .बरं ...त्या मोबाईल वगैरेंना बंद करुन चालु करता येते हो ..आपल्या मनाचं काय ? त्याला रिबुट कसे करणार?

या न दिसणाऱ्या पण आपल्या वर मानसिक आणि शारीरिक प्रभाव करणाऱ्या मन या अवयवाला देखील आपण रिबुट करु शकतो . कसे ? तर बघा एखाद्या वेळेस आपले मन विचलीत झालेले असेल किवा मुड आफ असेल तर आपण एकदम शांत बसतो ..शांत बसल्याने काय होतं? तर गढुळ पाणी ढवळल्यावर जर थोडा वेळ त्या पाण्याला शांत होउ दिलं तर सगळा गाळ तळाशी बसतो आणि मग वर फक्त नितळ पाणी स्थिर झालेलं आपल्याला दिसते..अगदी तसेच आपण ध्यानस्थ बसलोत तर मन शांत होते ..कचरा आपोआप बाहेर टाकला जातो.

आपल्याला छंद वगैरे असतील तर एखादं छानसं गाणं ऐका .बघा मन कसं ताजंतवानं होतं ते.. एखाद्या मित्राला किंवा नातेवाईकाला फोन करा.. आपणा स्वतः हुन फोन केल्याने काही कमीपणा येत नाही .त्या व्यक्ती ला तुमच्या एका फोनने झालेला आनंद त्याच्या बोलण्यातुन तुम्हाला जाणवेल .आहे कि नाही मनाचं रिबुटींग. ..मन सैरभैर धावत असतं ..त्याला व्यक्ती गणिक बरीच कारणं असु शकतात.. अशा बेचैन अवस्थेत निसर्गाच्या सान्निध्यात जा.. जगात निसर्ग ही अशी एकमेव जागा आहे जे आपल्याला फक्त देत असतय .काही ना काही तरी निसर्ग देतच असतो .मग ती फूलं असतील ,फळं असतील, किंवा मानवी मनाला मोहुन टाकणारा हिरवा गालीचा असेल ..या निसर्गाच्या जवळ गेलो तरी आपला ताणतणाव कुठल्याकुठे पळुन जातो..हे पण एक प्रकारच रिबुटींगच म्हणु या ना..

खुपदा असे होते कि आपण प्रापंचिक समस्येने त्रस्त असतो ..विचारांचे काहुल मानात उठलेले असते..मग मन बेचैन होते .ही बेचैनी जी आहे ती म्हणजे मनात साठलेला कचरा

आपले काम करत असतो ..अशा वेळेस आपण एखाद्या मंदीरात किंवा घरातल्या देव्हार्यासमोर बसतो ..त्या गणपतीच्या डोक्यावरचे लालचुटुक जास्वंदाचे फुल किंवा हिरव्यागार टवटवीत दुर्वा आपलं मन प्रफुल्लीत करतात..हे देखील एक प्रकारचं मनाचं रिबुटींगच आहे ना ...

एखाद्या मित्राची खुप दिवसापासुन भेट झालेली नसते ..न सांगता त्याला त्याच्या घरी भेटा .बघा त्याला किती आनंद होतो ते ..त्याचा आनंद पाहुन आपणही तर ताजेतवाने होतोच ना.... एखादा उपाशी असलेला माणुस तुमच्याजवळ भुकेसाठी हात पसरतोय आणि त्यावेळेस तुम्ही त्याला काहीहि खाण्यास दिले तर तो तृप्त होतो आणि त्याची तृप्तता बघुन तुम्हालाही मनावरचं मणभर ओझं कमी झाल्याचा भास होतो .हे ही एकप्रकारचं रिबुटींगच की... थोडक्यात काय ...तर मोबाईल असो , संगणक असो किंवा मानवी मन , बिनकामाच्या विचारांच्या फाईल्स तिघांसाठीही घातक असतात.त्यांना वेळीच बाहेर टाका .मानवी मन कचरापेटी नका बनवु .. मनाची वेळीच काळजी घ्या ..कोणतेही वादविवाद दीर्घकाळ मनात राहीले तर कटुतारुपी कचरा तुमच्या शरीराला धोकादायक असतो ..कधी थोडी माघार घेउन तर कधी मनाची लवचिकता वाढवुन मनातला कचरा होणारच नाही याची काळजी घ्या .आणि झालाच तर त्याला विवीध मार्गांनी साफ करा ..जन्म आणि मरण यात फक्त पळभराचं अंतर असतय .हे "दो पल जिंदगीके " एकदम उत्साहाने जगा ..जास्तीत जास्त निसर्गाच्या सान्निध्यात जा .त्याचा दातृत्व भाव आपल्यात येउ द्या .. आपल्या छंदांना मनाचं रिबुटींग करण्यासाठी वापरा . एकमेकांविषयी न बोलता एकमेकांशी बोला .. मन ठेवा रे प्रसन्न

**श्रीपाद महाशब्दे**
























# जिवतीच्या प्रतिमेचा भावार्थ

आधुनिक केसरी

**मानवाला अनादी काळापासून घडणाऱ्या घटनांचं कौतुक आणि त्याबद्दल उत्सुकता आहे. याच उत्सुकतेमधून तो नवनवीन आविष्कार आणि गूढ घटना यांबद्दल आदरभाव दाखवत आलेला आहे. या आदराचं रूपांतर त्या अनाकलनीय गूढाचा सत्कार व पूजन करण्यात झालं. यातूनच ते गूढ पिढ्यांपिढ्या पुजल्या जाऊ लागलं . असाच एक गूढ दार पिढ्यांनी पुजलं ते 'जिवती पूजन' या रूपात. कोण ही जिवती? हिच्या पूजनाचा हेतू काय? जिवती प्रतिमेचा नेमका भावार्थ काय? असे बरेच प्रश्न मनात रेंगाळत होते. यासंदर्भात मला जे काही कळलं ते आपल्या पर्यंत पोहोचवण्यासाठी हा लेखन प्रपंच.**


आषाढ महिन्याच्या अमावस्येला हे दीपपूजन केलं जातं आणि याच दिवशी जरा-जिवंतिका पूजन सुद्धा करतात. दिवा हे ज्ञानाचं, वृधिंगतेच प्रतीक आहे. अज्ञानाचा नाश करून ज्ञानाकडे जाणाऱ्या मार्गाचा मुख्य आधार आहे दीप. तुम्ही एक दिवा उजळा त्यावरून तुम्ही हजारो दिवे उजळू शकता त्यामुळेच याला वंश वृद्धीचं प्रतीक मानतात. या प्रतीकाचं पूजन म्हणजेच आजचं दीपपूजन.
आजची दुसरी पूज्य देवता म्हणजे जिवती. जिवतीची प्रतिमेच्या रूपात पूजा केली जाते. आजपासून संपूर्ण श्रावण महिना या प्रतिमेच पूजन मातृशक्तीकडून केलं जातं व आपल्या अपत्यांच्या मंगलतेची प्रार्थना केली जाते. ही प्रतिमा विशेष अर्थपूर्ण आहे.
या एकाच प्रतिमेत चार वेगवेगळ्या देवतांच्या, वरवर पाहता परस्परांशी संबंध नसलेल्या स्वतंत्र प्रतिमा आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात याच प्रतिमेचे पूजन केले जाते. यातील एकही प्रतिमा बदललेली दिसत नाही. काय रहस्य असेल या प्रतिमा क्रमाचे?
जिवती प्रतिमेत नरसिंह, कालियामर्दन करणारा कृष्ण, मुलांना खेळवणाऱ्या जरा- जिवंतिका आणि सगळ्यात खाली बुध - बृहस्पती (गुरु) यांचा समावेश असतो. याच क्रमात त्यांना पुजल्या जाते.

प्रथम भगवान नरसिंहचं का?

भगवान विष्णूंचा चवथा अवतार असलेले नरसिंह, आपल्या बाळ भक्तासाठी प्रगट झाले. ही कथा आपल्या सर्वांना परिचयाची आहे. बाळ प्रल्हादाचे हिरण्यकशिपू पासून म्हणजेच दैत्यांपासून रक्षण करणे याच मूळ उद्देशाने भगवंताने हा अवतार धारण केला. बालकांचा रक्षक आणि बाल भक्तासाठी अवतार धारण केलेली देवता म्हणून भगवान नरसिंह या प्रतिमेत पुजले जातात.

त्यानंतर येतात कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण

यातील नाग आणि गोपाळकृष्ण दोन्हीपण श्रावणातील आराध्य दैवत. मग नाग प्रतिमा वेगळी आणि कृष्ण प्रतिमा वेगळी न देता कालियामर्दन करणारा श्रीकृष्णच का? आपण जर कालियामर्दन प्रसंगाचा विचार केला तर लक्षात येईल की या प्रसंगात कृष्ण आणि त्याचे मित्र खेळात असतांना त्यांचा चेंडू यमुनेच्या डोहात गेला आणि कृष्णाने तो परत आणला. खेळणाऱ्या- बागडणाऱ्या मुलांवर आलेला वाईट प्रसंग कृष्णाने दूर केला. तसेच कालियाला न मारता त्यालाही अभय देऊन दूर जाण्याचा आदेश दिला. नाग हा सरटपटणाऱ्या प्राण्यांमध्ये मुख्य. सरपटणाऱ्या प्राण्यांपासून वाचवणारा, त्याचबरोबर महत्त्वाच्या प्राण्यांना अभय देणारा, खेळात बागडत असतांना बालकांवर आलेल्या वाईट प्रसंगातून वाचवणारा कृष्ण येथे कालियामर्दन रूपात पुजला जातो.
नरसिंह घरात ओढवणाऱ्या आपत्तीपासून बाळाचा बचाव करतात जसे उंचावरून पडणे, अन्नातून कधी विषबाधा होणे, आगीपासून होणारी हानी इत्यादी आणि कालियादमनक कृष्ण बाहेरच्या आपत्तीपासून जसे खेळतांना येणाऱ्या आपत्ती, पाण्यापासूनचे संकट, सरपटणाऱ्या प्राण्यांचे भय इत्यादींपासून बचाव करतात. घरात आणि घराबाहेर बाळांवर येणाऱ्या संकटांपासून हे दोन्हीदेव बालकांचे रक्षण करतात म्हणून जिवती प्रतिमेत त्यांचे प्रथम स्थान.




नंतर येतात त्या जरा व जिवंतिका

या यक्ष गणातील देवता. जरा या यक्षिणीबद्दल महाभारतात एक कथा येते. मगधनरेश बृह्दरथ याला दोन राण्या असतात. दोन्हीही राण्यांवर त्याचे सारखेच प्रेम असते. परंतु राजाला पुत्र/ पुत्री काहीही नसल्यामुळे राजा चिंतीत असतो. याच सुमारास नगरजवळील उपवनात ऋषी चंडकौशिक आल्याचे राजाला समजते. राजा त्यांचे दर्शन घेऊन आपली चिंता प्रगट करतो. ऋषी राजाला प्रसादात आंबा देतात व राणीला खायला द्या म्हणून सांगतात. दोन्ही राण्यांवर समान प्रेम असल्यामुळे राजा आंब्याचे समान भाग करून राण्यांना देतो. कालांतराने दोन्ही राण्यांना पुत्र होतो परंतु केवळ अर्धा-अर्धा. अशा विचित्र आणि अर्धवट अर्भकांना राजा जंगलात नेऊन टाकतो. त्याच वेळेस तेथून जरा नामक यक्षिणी जात असते. ती दोन्ही अभ्रक तुकड्यांना हातात घेते आणि आपल्या अवयव सांधण्याच्या कलेने दोन्ही शकलं सांधते. जरा ते सांधलेले अर्भक संध्यासमयास बृह्दरथ राजाला आणून देते. जरा यक्षिणीने सांधले म्हणून राजा त्याचे नाव जरासंघ ठेवतो आणि जरा यक्षिणीच्या उपकाराप्रीत्यर्थ नगरात देऊळ बांधून तिला मगधाच्या इष्टदेवतेचा मन देतो. त्याच प्रमाणे जारदेवतेचा वार्षिक महोत्सव सुरू करतो, अशी ही जरा देवी.
जरेंचीच सखी जिवंतिका. जिवंतिका या शब्दाचा अपभ्रंश जिवती. जिवंतिकेचा अर्थ होतो दीर्घायू प्रदान करणारी. बालकाच्या दीर्घायुष्याची कामना करून या देवीची पूजा करतात. ही देवी पाळण्यात व आजूबाजूंनी बालकांना खेळवतो अशा रूपात दाखवतात.

प्रतिमेत सगळ्यात शेवटी येतात बुध - बृहस्पती..

बुध हा ग्रह हत्तीवर बसलेला असून हाती अंकुश धारण करतो. तर बृहस्पती (गुरु) वाघावर बसलेला आणि हातात चाबूक घेतलेला दाखवतात. बुधाच्या प्रभावाने जातकाला अलौकिक बुद्धिमत्ता, आकर्षक व्यक्तिमत्व, वाक्पटुत्व इत्यादी गुण प्राप्त होतात. तर बृहस्पतीच्या प्रभावाने शैक्षणिक प्रगती, अध्यात्मिक उन्नती, विवेकबुद्धी जागृत होते. बुधाचं वाहन हत्ती. हत्ती हे उन्मत्ततेचं प्रतीक आहे. मानवी मनाला येणारी उन्मत्तता आपल्या बुद्धिमत्तेने, व्यक्तित्त्वाचा अंकुश घालून आवर घालावा हे बुध प्रतिमेवरून लक्षात येते. बृहस्पतीचं वाहन वाघ. हे अहंकाराचा प्रतीक आहे. मानवी मनाला अहंकार लवकर चिटकतो. अहंकार मानवाच्या प्रगतीमध्ये, आध्यात्मिक साधनेत बाधक ठरतो. त्यावर आपण ज्ञानाच्या, गुरुकृपेच्या आशीर्वादाने ताबा मिळवावा हे बृहस्पती प्रतिमा आपल्याला शिकवते. म्हणूनच बुध - बृहस्पती यांना सुद्धा जिवती प्रतिमेत स्थान मिळालं.
प्रथम रक्षक देवता, नंतर जन्माबालकेचे रक्षण व दीर्घायुष्य देणारी देवता आणि नंतर व्यक्तिमत्व प्रभावित करणारे ग्रह देवता असा हा जिवती प्रतिमेचा क्रम.
एका मातृशक्तीने दुसऱ्या रक्षक व पालक शक्तीचे केलेले पूजन म्हणजेच जिवती पूजन. जगातील सर्व प्राणिमात्रांच्या उज्वल भविष्याची, रक्षणाची प्रार्थना करून हा लेख प्रपंच थांबवतो......

जरे जीवन्तिके देवी बालयुक्ते प्रमोदिनी ।
रक्षाव्रते महाशक्ती पूर्णकामे नमोस्तुते ।।

इदं न मम
#साभार
लेखक अनाम।
द्वारा प्रसाद पिंगळे।
व्हाट्सअप्प।















# खरच पुरुषांना स्वातंत्र्य आहे काय?

आधुनिक केसरी

**आजचा काळ धकाधकीचा आहे. या काळात संविधानानुसार पुरुष आणि महिलांना समान स्थान दिलेले आहे. त्यानुसार सर्वांना समान संधीही प्राप्त झालेली आहे. त्यानुसार प्रत्येक स्त्री पुरुष समानतेने वागत आहे. असे असतांना आजही सत्तर प्रतिशत महिलांना विशेष स्थान प्राप्त आहे. काहींना नाही. अजुनही त्या पुरुषांच्या हातच्या कळसुत्र्या बाहुल्याच ठरत आहेत.**

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्त झालेले असून भारतीय संविधान हे १९४९ ला बनलं. तसेच ते २ जानेवारी १९५० ला लागूही झालं. त्यानुसार महिला व पुरुषांना समान अधिकार मिळाले. परंतू त्याच अधुकाराचा गैरवापर होताना दिसत असून आज पुरुषांवर अत्याचार होत असलेले दिसत आहेत. आज विवाह होवून घरात पत्नी म्हणून आलेली महिला पुरुषांना आपल्या हातचे कळसुत्री बाहुले तर बनवतेच. तसेच अत्याचारही करते. असे वास्तविक चित्र आज जनमानसात अगदी स्पष्टपणे दिसत आहे. त्यानुसार आज घरी विवाह होवून आलेली महिला सर्वात प्रथम आपला वचक निर्माण करण्यासाठी आपल्या पतीच्या नातेवाईकांना तोडते. त्यानंतर सुरु होते तिचा अत्याचार.

वास्तविक जीवनात स्त्रीला कमजोर समजत पुरुषांना ताकदवार समजलं जातं. त्यानुसार ती पुरुषांवर. अत्याचार करुच शकत नाही. असं चित्र दिसतं. परंतू ते धांदात चुक आहे. आज बरेचसे पतीवर्ग कित्येक आपल्या पत्नीचा मार खातांना दिसतात. ही देखील एक शोकांतिकाच आहे. परंतू बरेचसे पुरुषवर्ग आपल्या इगो समस्येमुळे आपली नाचक्की होवू नये म्हणून गप्प राहतात. बरीचशी पती असलेली पुरुष मंडळी स्त्रीयांपुढं लोटांगण घालत तिचे शब्द न् शब्द ऐकतात व तिच्या माहेरच्या मंडळींची सेवाही करतात. परंतू ब-याचशा घरात ती मात्र आपल्या पतीच्या टाळते. ती त्यांची सेवा करीत नाही. उलट ती ज्या मायबापांनी त्याला जन्म दिला. त्याच मायबापांना वृद्धाश्रमात टाकायला सांगते. त्यावेळी विचार येतो की आपण विवाह नसता केला तर बरे झाले असते. ही मानसिकता आज प्रत्येक घराघरातून पाहायला मिळते.

आज अशी नवीन नवरी म्हणून घरी आलेली मुलगी आपल्या म्हाता-या सासूसास-यांना नीट जेवनही देत नाही. रात्रीचं जेवन सकाळी अर्थात शिळं जेवन त्यांना मिळत असतं. त्यातच हे शिळं जेवन खावून समजा पोटात काही गडबड झालीच तर त्यांना रुग्णालयात नेण्याऐवजी त्यांना जेवनच मिळत नाही. याला स्त्री अत्याचार नाही म्हणता येईल तर काय? हाही स्त्री अत्याचारच आहे. परंतू याकडे लक्ष कोण देतं, कोणीच नाही. कारण म्हाता-या माणसाचं आज कोणीच ऐकायला तयार नाही. आजही साधा चष्मा तुटला तरी पुरुष बोलण्याच्या आधी ती स्त्रीच बोलते की कशाला गरज आहे चष्म्याची. त्यातच डोळे तपासणे दूरच.

हे म्हातारपण. या म्हातारपणात शरीरात रक्त कमी तयार होतं. त्याचबरोबर रोगप्रतिकारक शक्तीही कमी होत असते. या काळात वेगवेगळे आजारही बळावतात. डोळ्यावर मोतियाबिन्दू आलेला असतो. त्याचं ऑपरेशन करणं गरजेचं असतं. परंतू घरी मुलगा हा आपल्या पत्नीचंच ऐकत असतो. कारण ती त्याला सर्रास धमकी देते की माझं जर ऐकणार नसशील तर मी माहेरी किंवा तुला सोडून चालली जाईल. अर्थात निघून जाईल. हे वक्तव्य ती त्यावेळी करते, ज्यावेळी तिला दोन मुलं झालेली असतात. काही पुरुष हे विकृत मानसिकतेचे असतात. ते काही अशा महिलांचं चालूच देत नाहीत. काही मात्र चांगल्या स्वभावाचे असतात. त्यांना भीती वाटते की खरंच त्याची पत्नी त्याला सोडून गेली तर........ कारण तसे इतर मित्रांच्या बाबतीत घडलेलं असतं.

म्हातारी माणसं मात्र आपण पुर्व जन्मात काही पाप केलं अशी मानसिकता ठेवून गप्प बसतात. बिचारे आपला मुलगा सुखी राहावा अशी मानसिकता बाळगून. काही काही महिला तर याच स्वातंत्र्याचा फायदा घेवून त्यांचा पती जीवंत असतांना परपुरुषांशी संबंध ठेवतात. ते पतींनाही दिसतं. परंतू तो काहीही बोलू शकत नाही. कारण मुलं झालेली असतात आणि तेव्हा भीती वाटते की आपली ही पत्नी आपल्यालाच नाही तर आपल्या मुलाबाळांनाही सोडून त्या परपुरुषासोबत निघून जाईल. मग आपल्याच मुलाबाळांची आबाळ होईल. ती तशी जातेही. असं बरेचदा घडलेलं आहे. काही अंशी केवळ महिलाच जबाबदार असतात असेही नाही. पुरुषही तेवढ्याच प्रमाणात जबाबदार असतात. हे तेवढंच सत्य आहे.

पुरुष हा स्त्रीला दुषणे देणारा व्यक्ती. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण ती कितीही चांगली वागली तरी तिला तो दोष देत असतो. याच मानसिकतेतून समजा ती एखादे वेळी कोणाशी बोललीच तर पुरुषवर्ग तिच्यावर शंका घेतो. त्यात त्याला असंख्य वेदना होतात. अशा वेदना की तो कोणाला त्या वेदनेविषयी सांगू शकत नाही. प्रसंगी तो त्या वेदना विसरण्यासाठी तो व्यसनाचा आधार घेतो. मुख्सतः दारुचा. ही त्याची दारु दिवसेंदिवस वाढत जाते. ती एवढी वाढते की ती त्यांच्या पत्नींना सहन होत नाही. मग घटस्फोट व रोजची भांडणं इत्यादी गोष्टी घडतात.

महत्वपूर्ण गोष्ट अशी की आजच्या काळात संविधानाचं राज्य आहे. त्यानुसार प्रत्येकजण कायद्यासमोर समान आहे. कोणीच लहान वा मोठा नाही. मग ते लहान बालक असेल वा एखादा वयोवृद्ध व्यक्ती. ती स्त्री असेल वा तो पुरुष. ते झाड असेल वा एखादा प्राणी. प्रत्येकाला कायद्यानुसार जगण्याचा अधिकार आहे. तेव्हा आजच्या काळात कोणी कोणाचा गुलाम नाही. त्यामुळं महिला असो की पुरुष यांनी एकमेकांना कमजोर समजू नये वा गुलामागत वागणूक देवू नये. पुरुषांनी स्त्रीयांना समानतेचा अधिकार द्यावा. कारण तसा अधिकार संविधानानं दिलेला आहे. तिला सर्व गोष्टी करण्याचं बंधन नसावं. तसंच स्त्रीयांनीही संविधानानं स्वातंत्र्य दिलं म्हणून उहापोह करु नये. स्वातंत्र्याचा स्वैराचार करु नये. पुरुषांची मानसिकता लक्षात घेवून त्यावर अत्याचार करु नये. तसेच म्हाता-या सासूसास-यांवर तर अजिबात नाही. तेही तुमच्या मायबापासारखेच असतात. हे लक्षात घ्यावे.

**अंकुश शिंगाडे, नागपूर**

























# पांडुरंगावरची श्रद्धा

आधुनिक केसरी

**नोकरी निमित्त फिरतीवर असायचो. तेव्हा कंपनीच्या गाडीने महाराष्ट्रात फिरण्याचा योग यायचा. असाच एकदा सोलापूर -जत मार्गे कोल्हापूर कडे येत होतो. आषाढी एकादशी संपून 5 -6 दिवस झालेले होते. वारकरी मंडळी आपापल्या मार्गानी घरी परतत होती. सकाळी सोलापूरहून लवकर निघालो होतो. सांगोला सोडलं होतं. भूक लागलेली होती. बरोबर दोघे assistant होते. त्यांनी सुचवलं एखाद्या ढाबा वजा टपरीवर नाष्टा चहा चांगला मिळेल. 9.30 चा सुमार मंडळींनी गाडी एका ढाबा वजा टपरी जवळ थांबवली. उतरलो पाय मोकळे केले आणि नाष्ट्याला काय विचारपूस केली. कांदे पोहे, उसळ पाव आणि चहा कॉफी अशी ऑर्डर दिली. 20 -25 मिनिटे लागणार होती. ऊन खात उभे होतो.**



तेव्हढ्यात एक 60 - 65 वयाचं वारकरी जोडपं चालत चालत आमच्याच टपरी पर्यंत आलं. अंगावरचा एकही कपडा धड नाही. बाईंच्या डोक्यावर तुळस आणि खाकेत एक बोचकं. बाबांच्या डोकीवर एक बोचकं नी खांद्यावर एक भली मोठी पिशवी. पायताणं यथा तथाच .बरीच दमलेली वाटत होती. टपरीच्याच बाजूला सारं सामान उतरवून ठेवत जमिनीवरच बसले.

मी आपलं सहज कौतुकाने विचारपूस केली. मंडळी वारी वरूनच परतत होती. मी विचारलं नाष्टा करणार का ? बाबांनी एकदा बाईकडे पाहिलं आणि होकारार्थी मान हलवली. मी सहज सुचवलं बाबांनो पोटभर खाऊन घ्या. मला उगीचच वाटलं चला तेव्हढच पूण्य . मी बाबांना विचारलं वाटेत चालता चालता काय करता. ते म्हणाले कधी अभंग तर कधी पाडुरंगाचं नाव घेत जातो. म्हनजे अंतर कसं पार झालं उमगत नाय. मी आपली विनंती केली की एखादा अभंग ऐकवाल का ? बाबांनी क्षणाचा विलंब न लावता अभंगाला सुरुवात केली आणि बाईंनी टाळावर साथ दिली. खरंच वेळ कसा गेला समजलंच नाही. नाष्ट्यावर ताव मारला. त्या वारकरी जोडप्याला आग्रहानी आमच्या बरोबर बसवलं. सहज चौकशी केली की अजून यांना घरी पोहचायला किती दिवस .लागतील ? तर कळले की अजून 4 - 5 दिवस. निरोप घेण्याची वेळ आली. आम्ही त्यांचे आणि त्यांनी आमचे आभार मानायचे सोपस्कार पार पडल्यावर निघालो.

सहज मनात आले की यांना घरी पोचायला अजून 4 - 5 दिवस आहेत त्यांना काहीतरी मदत करूया. वारकरी बाबा आणि बाईंना थांबवलं आणि 100 रूपयांची नोट त्यांना मदत म्हणून पुढे केली.

बाबांनी अदबीने मदत नाकारली. मला आश्चर्य वाटले. मला न राहवून मी विचारले का ?

बाबांनी उत्तर दिलं -

वारीला निघताना घरून एक छदाम घेतला नाही. आत्ता या क्षणालाबी खिशात छदाम नाही. पूर्ण वारी तो पांडुरंगच आम्हा जिवांची काळजी घेतो की. त्यापुढे दादा तुमची ही 100 रूपयांची नोट आमच्या काय हो कामाची. मी अवाक झालो. क्षणभर काय REACT व्हावं मला सुधरंत नव्हतं. केवळ सुन्न. क्षणात मला माझी लायकी समजली, डोळ्यातून खळ्ळं आसू आले आणि मी त्या माउलीच्या पायावर डोकं ठेवलं.

सुमारे 30 वर्षांनंतर....

आज जवळपास 30 वर्षांनी ही घटना आठवली आणिक सारा क्रम आणि संवादातील शब्द नी शब्द परत ताजे तवाने होउन डोळ्यासमोर फिरू लागले.

त्या वारकरी बाबा आणि बाईंच वय आज माझं होतं. आज माझ्याकडे सगळं आहे. घर, गाडी, उर्वरित आयुष्य बऱ्या पैकी सुखांत पार पडेल एव्हडी व्यवस्था. तरीही मला उद्याची निश्चिंती नक्कीच नाही. पण मग त्या वारकरी बाबांना अंगावर धड कपडे नाहीत, धड अंथरूण पांघरूण बरोबर नाही. वेळ पडली तरी खिशात छदाम नाही. असं असून सुद्धा एक EMERGENCY साठी म्हणून मी पुढे केलेले 100 रुपये सुद्धा हा भला माणूस अव्हेरतो आणि प्रचंड आत्मविश्वासानी सांगतो माझ्या पुढच्या प्रत्येक क्षणाची काळजी तो पांडुरंगच करेल. त्याला आयुष्यात कसलीही पुंजी करून ठेवावं असं नाहीं वाटलं कारणं त्याने जमवली होती पांडुरंगाच्या श्रद्धेची पुंजी होती. त्यामुळे त्याला ना उद्याची भ्रांत ना आयुष्याची चिंता.

ती त्याची श्रीमंती पाहीली आणि नजर स्वतः कडे वळली. त्यानी शाश्वत श्रद्धेची नी भक्तीची पुंजी जमवली आणि मी अशाश्वत पुंजी जमवण्यात धन्यता मानत राहिलो. हे परमेश्वरा अजूनही वेळ गेलेली नाही. त्या वारकऱ्याची श्रद्धा आणि भक्ती मला सुद्धा जमवता यावी अशी बुद्धी मला दे, हीच कळकळीची प्रार्थना तुझ्या चरणी.

ओरीऑन सिटिकेअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, उस्मानपुरा, औरंगाबाद.
ORIION CITICARE
SUPER SPECIALITY HOSPITAL
QUALITY • COMPASSION • INNOVATION
102 BEDDED SUPER SPECIALITY HOSPITAL
& Tertiary Care Centre
!! हॉस्पिटलचे ठळक वैशिष्ठ्ये !!
• तज्ञ व अनुभवी सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर
• ॲंजियोग्राफी, ॲंजियोप्लास्टी व बायपास करीता अद्ययावत वैदयकीय उपकरणे व सुविधा
• उच्च प्रतीची Philips Azurion 7C कॅथ लॅब व EP Tracer 70 इलेक्ट्रोफिजीयॉलॉजी लॅब
• मेंदूच्या सर्व आजारांवर आधुनीक तपासणी (Video EEG,EMG,NCV) व उपचार Aneurysm Coil Embolization, Flow Diverter, AVM Glue Emobolization, Carotid Angioplasty, Mechanical Thrombectomy In Acute Strokes
• पाच सुसज्ज ऑपरेशन थिएटर(O.T) हृदय, मेंदू, मणका, पोटाच्या व इतर शस्त्रक्रियांकरिता
• कान, नाक, घसा (ENT) व मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी आधुनिक मायक्रोस्कोप
• २६ बेडचे मेडीकल व सर्जिकल I.C.U (अतीदक्षता विभाग)
• फुफ्फुसांवरील आजाराकरीता ब्रॉन्कोस्कोपी व थोरॅकोस्कोपी सुविधा
• गुडधा व इतर सांधेरोपण शस्त्रक्रिया
• किडनीच्या आजारांवर उपचार, डायलिसिस व शस्त्रक्रिया
• २४ तास अपघात विभाग (Casualty),पॅथोलॉजी व फार्मसी कार्यरत
• 1.5 T एम.आर.आय., 32 slice सी.टी.स्कॅन, अद्ययावत सोनोग्राफी मशिन, डिजिटल X-RAY
• सुसज्ज डेंटल, फिजियोथेरपी, ऑडिओमेट्री, नेत्ररोग विभाग
5-5-70, Opp Kalash Mangal Karyalaya, New Osmanpura, Aurangabad- 431005
0240 2617777 E-Mail : oriionciticare@gmail.com




# प्रस्थान

आधुनिक केसरी

**माझ्या घरासमोर एका बंगल्याचे काम नुकतेच सुरू झाले होते. सिमेंट, लाकडं, विटा येऊन पडत होत्या. एक दिवस एक मजूर बाई, तिचा नवरा आणि तिच्या हातात दोन महिन्याचे बाळ यांच्यासह आली. तिच्या मागे एक हडकुळे ३ वर्षाचे पोर ओढल्यागत चालत होते. आल्या आल्या बाईने बंगल्याच्या आवारात दोन लाकडी खांबांना जुनी साडी बांधली आणि त्या झोळीत ते पोर झोपवले. मोठ्या पोराच्या हातात वाळलेल्या भाकरीचा तुकडा दिला. बाई कामाला लागली. जागा साफ करून तिने नवऱ्याच्या मदतीने लाकडी खांबावर पत्रे टाकून झोपडी तयार केली. शेजारी बंगल्याचे बांधकाम वेगाने सुरू झाले. ती दोघे नवरा-बायको इतर मजुरांसह दिवसभर काम करत.**

जाता येता मी त्या परिवाराशी बोलत असे. कधी चॉकलेट बिस्किटे नाश्ता देत असे. सिमेंट रेती विटांचे काम सुरू होते. बघता-बघता बंगला उभा राहिला. तिचे फाटक्या कपड्याच्या झोळीत झोपणारे पोरही ऊन्हा तान्हात दगड-वाळूत खेळू लागले. पुढे पावसाळा सुरू झाला तशी तिची रवानगी बंगल्यातल्या अर्धवट बांधलेल्या खोलीत झाली. मी तिला, तिच्या नव-याला कधी आरामात बसलेले बघितले नाही. बंगला बांधणारा कंत्राटदार दोन-चार दिवसांत कधीतरी यायचा. मालक तर महिन्या-दोन महिन्यांनी उगवायचा. एरव्ही ही दोघे दिवसरात्र मेहनत करत. दिवसभर ती मुंगीसारखी सतत काम करत असे. सगळ्यांची अस्सल मातीशी बांधिलकी. मुलं दगडा मातीत ऊन थंडी पाऊस झेलत खेळायची. पण कधी आजारी पडली नाहीत.

आमच्या बोलण्यात माणूस गप्प असायचा. ती मात्र मोठ्या हौशीने घराच्या बांधकामाविषयी, झालेल्या कामाविषयी सांगायची. हळुहळू बंगला पूर्ण झाला. मग प्लास्टर. लवकरच बंगल्याला आतबाहेर सुंदर रंग दिला गेला. बंगला छान सजू लागला. एक दिवस मी सहज खिडकीबाहेर पाहत होतो. त्या घरासमोर ट्रक आला. त्यात कुदळ, फावडे, टोपल्या असे सामान होते. ड्रायव्हर त्या बाईशी बोलला. तिने लगेच टोपलीत मुलाला ठेवले, मोठ्या मुलाला ट्रकमध्ये उभे केले, तीही नव-यासह ट्रकमध्ये चढली. ट्रक निघाला! जेव्हा तो ट्रक आमच्या घराजवळून जाऊ लागला तेव्हा मी धावतच जाऊन तो थांबवला. तिच्या डोळ्यात पाणी होते. ट्रकच्या आवाजात ऐकू येणार नाही, असं वाटून ती ओरडून म्हणाली, 'दादा, आमचा मुक्काम संपला. येते जी मी!' मला तो धक्का होता. मी ओरडूनच विचारले, 'का हो,असे अचानक चाललात?' तिचे हसून उत्तर आले, 'मालकाचा निरोप आलाय. नव्या साईटीवर काम सुरू होणार आहे.आता तिथे बघायला नको कां? ' तिने मायेने हात हलवला. आणि ट्रक दिसेनासा झाला.

मी सुन्न होऊन बघतच राहिलो....

एखाद्या सुगरण पक्षिणीने गवताची एकेक काडी गोळा करून खोपा विणावा, तसे तिने जीव ओतून घर बनविले. तिला कधी आपलेही घर असावे असे वाटत नसेल का? कसे यांचे जीवन? यांनी राबराबून दुसऱ्यांचे इमले उभारायचे. ऊन्हा तान्हात पोरं वाढवायची. घर पूर्ण झाल्यावर सारे सोडून निघून जायचे! जवळजवळ वर्षभर ती बाई ज्या घरात राहिली, तिचा संसार फुलला, जे घर तिने इतक्या कष्टाने उभे केले, ते सगळे किती सहज सोडून ती चालली होती. कसला मोह नाही, लोभ नाही, तक्रार नाही. आनंदी चेहऱ्याने निरलसपणे तो साधाभोळा जीव निघाला. कुठल्यातरी अज्ञात साईटीवर पुन्हा कुणा दुसऱ्याचे घर बांधायला. मनात विचार आला... जीवन यांना आपल्यापेक्षा जास्त चांगले कळलेले नाही का? तसे पाहिले तर आपल्या सगळ्यांना एक दिवस असेच जायचे नाही का? जे मिळविले, निगुतीने सजविले, ते तसेच सोडून जावे लागणार नाही का? त्या 'वरच्या मालकाचा' निरोप आला की आपल्यालाही दुसऱ्या साईटवर नव्या कामाला जावे लागेल. कोण थांबू शकते? अगदी एक क्षण, एक श्वासतरी जास्त मिळतो का कुणाला ? सर्वांना जावेच लागते की! पण दुसऱ्याचे घर बांधून, सजवून त्यांचे विश्व अधिक सुंदर करून इतके निरिच्छपणे, निरलसपणे, निःसंगपणे जाणे आपल्याला जमणार आहे का?

एकदा अवश्य विचार करून पहावा....















# देवाची गाडी

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात लातूर ते मिरज यादरम्यान धावणारी बारसी लाईट रेल्वे ही स्वातंत्र्यपूर्व काळातील खाजगी कंपनी असून बार्शीला मुंबई मद्रास लोहमार्गाला जोडण्यासाठी कुर्डूवाडी ते बार्शी या 34 किमीसाठी एव्हरार्ड कॅल्थरॉप या बुद्धिमान इंजिनीअरने ईस्ट इंडिया कंपनीचा राजीनामा देऊन 11 जुलै 1795 ला 'बारसी लाईट रेल्वे कंपनी लिमिटेड, लंडन ( BLR )' नावाने 7,014, 477 रुपयाचे भागभांडवल उभा करून खाजगी कंपनी स्थापन केली. कंपनीचे कार्यालय कायमस्वरूपी विंचेस्टर हाऊस ब्रॉडस्ट्रीट लंडन येथे राहिले. कुर्डूवाडी बार्शी रस्त्यालगत फक्त 9 फुट रुंदीवर 2 फुट 6 इंच रुंदीची नॅरोगेज रेल्वे 1 मार्च 1897 ला सुरू झाली. कंपनीचे भारतातील कार्यालय सुरूवातीला बार्शीत तर पुढे कुर्डूवाडीला राहिले. ए. एल. अलेक्झांडर यांची मुख्य व्यवस्थापक आणि एजंट म्हणून नियुक्ती झाली. अलेक्झांडर आणि कॅल्थरॉप या जोडगोळीने रात्रीचा दिवस करून BLR ला सोन्याचे दिवस आणले. त्यांचा पगार होता 2200 आणि 1500 रुपये महिना.**




सुरूवातीला फक्त बार्शी रोड ( कुर्डूवाडी ) ते बार्शीसाठी तयार झालेली ही रेल्वे वाढत वाढत 1927 साली लातूर ते मिरज याप्रमाणे 323 किमी म्हणजे भारतातील सर्वात मोठी खाजगी नॅरोगेज रेल्वे झाली. सुरूवातीला प्रवाशाकडून कंपनीने किती तिकीट घ्यावे याचे दरही निश्चित केलेले असून त्यानुसार, फर्स्ट क्लास – 24 पैसे प्रती मैल, सेकंड – 12 पैसे, थर्ड – 8 पैसे, फोर्थ – 3 पैसे , घोड्यासाठी – 24 पैसे प्रती मैल , कुत्रे – 8 आणे प्रती 50 मैल, धान्य – 7 शेराखालील वजनासाठी 8 आणे प्रती 50 मैल, सोबत लगेज असेलतर 4 आणे असे दर होते. सुरूवातीला कंपनीने प्रती मैलासाठी 3585 युरो एवढा खर्च केला. यावेळी 1 रुपयाची किंमत 16 डॉलर एवढी होती. दरवर्षी या कंपनीची इंग्लंडमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभा भरत असून विशेष म्हणजे 1908 पासून या सभेचे वृतांत तेथील 'द टाइम्स'सारख्या वर्तमान पत्रात छापून आलेले आहेत.

पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांमुळे या गाडीला देवाची गाडी म्हटले जायचे. आषाढी एकादशीला तर अगदी मालगाडीचे डबे सोडले तरी रेल्वेच्या टपावरच नाहीतर इंजिनच्या पुढच्या बाजूलाही लोक बसलेले असायचे. यावेळी तिकीटधारक किती हा विषय गौण असायचा.

याचा कंपनीला एकदा फटकाही बसला. त्यानुसार 20.11. 1939 ला धुळ्यावरून कुर्डूवाडीमार्गे पंढरपूर असे आगाऊ तिकीट काढलेल्या शंकर नारायण यांना यात्रेमुळे मालगाडीच्या डब्यात उभे राहून प्रवास करावा लागला. त्यांनी कोर्टात केस ठोकली. तेव्हा 11/4/1946 साली कोर्टाने कंपनीला 9 आणे व्याजासह 5 रुपये दंड ठोठावला.

दिवसेंदिवस कंपनीचा विस्तार वाढत गेला. त्यामुळे 1911 च्या अहवालानुसार या गाडीने जून ते डिसेंबर 1911 या सहामाहीत 3, 87,070 एवढ्या प्रवाशांची वाहतूक करत 126. 03 पैसे प्रती मैल प्रती आठवडा या दराने 3, 19, 550 रुपये जमा केले.

कंपनीचा प्रशासकीय वार्षिक खर्च 51 % पर्यन्त असून त्यांनी नेहमीच फक्त 4 % एवढाच नफा अपेक्षित धरला होता.

सुरूवातीला ही गाडी पंढरपूरला नदीच्या अलीकडेच थांबायची. त्यानंतर भीमा नदीवरील पूल आणि पुढील लाइनसाठी 8,66,000 रुपये खर्च केला, त्यामुळे पंढरपूरच्या रेल्वे पुलाचे 'विलीग्टन पूल' असे नाव होते. या कंपनीमुळे आपणास इतिहासातील काही रंजक गोष्टी समजायला मदत होते. त्यानुसार केवळ बार्शी लाइट रेल्वे आली म्हणूनच कुर्डूवाडी गावाची निर्मिती झाली.

खरंतर 23 आक्टोबर 1914 पर्यंत कुर्डूवाडीला बारसी रोड असे नाव असून इंग्रजांनी बार्शीचा उच्चार शेवटपर्यंत BARSEE व 1870 नंतर BARSI असाच केला.

BLR कंपनीच्या 1912 च्या प्राप्त वार्षिक अवहालानुसार नोव्हेंबर 1911 ला होणारी कार्तिकी एकादशीची पंढरपूर यात्रा प्लेगमुळे तर त्यानंतर जुलै 2012 ची आषाढी यात्रा कॉलरामुळे रद्द करावी लागली होती. म्हणजे 1911 ते 12 असे वर्षभर पंढरपूरचे मंदिर साथीच्या रोगामुळे बंदच असून नव्वद वर्षापूर्वीही लॉकडाऊन ही संकल्पना होती हे समजण्यास मदत होते. त्यामुळे अपेक्षित 4, 53, 768 एवढे प्रवाशी न आल्यामुळे कंपनीला 41650 रुपयाचा तोटा झाला.

इंग्रज किती प्रगत होते हे पुढील उदाहरणावरून दिसून येते. त्यानुसार 1897 ला एखादी कंपनी काढून मोठा उद्योग उभा करण्यासाठी लोकामधून शेअरच्या माध्यमातून भांडवल उभे केले. 10 युरोच्या प्रती शेअरसाठी 4 % बोनस दिला जायचा. 1911 -12 ला साथीच्या रोगामुळे तर लगेच 1914 च्या पहिल्या महायुद्धामुळे कंपनीला आर्थिक नुकसान झाले तेव्हा लंडन सरकारच्यावतीने उभारलेल्या 'प्रिन्स ऑफ वेल्स फंडा'तून बार्सी लाइट रेल्वे कंपनीला 500 युरोची आर्थिक मदत झाली. कंपनीसाठी लागणारी जमीन शासनाच्यावतीने मोफत देण्यात आली होती. 1930 ला कुर्डूवाडीला मोठे वर्कशॉप काढण्यात आले. तर किंगस्टन कंपनीचे इंजिन लंडनचे असले तरी मराठी माणसासाठी त्याचे मौखिक नाव रुक्मिणी वगैरे प्रमाणे मराठी ठेवण्याची प्रथा होती.

कोळशावर चालणाऱ्या इंजिनमुळे वाफ तयार व्हायला वेळ लागायचा म्हणून कधीकधी एखाद्या स्टेशनवर गाडी तासनतास थांबायची.

तर येडशीच्या रामलिंग घाटात डबल इंजिन लागायचं. पूर्वी गाडी येण्यापूर्वी विशेषतः जंगल परिसरात रेल्वेलाइनवर काही अडथळा तर नाही ना हे पाहण्यासाठी एक घोडेस्वार रेल्वे येण्यापूर्वी पुढे धावत जावून पाहणी करायचा. रामलिंगच्या घाटात गाडीची गतीच एवढी कमी होती की, कधी कधी जनावरे आडवी आली तर ड्रायव्हर खाली उतरून जनावरे बाजूला हाकून मग गाडी पुढे जायचा. कुसळंब ते तडवळा या लाइनचे काम पाठक आणि वालचंद कंपनीकडून सुरू असताना कंपनीचे चीफ इंजिनीअर ए. एल. अलेक्झांडर यांना पिंडीच्या आकाराचा रामलिंगनजिक दुर्गादेवीचा डोंगर पसंत पडला आणि त्यांनी इंग्लंडवरून साहित्य मागवून अतिशय देखणे विश्रामगृह 1907 साली बांधले. आजही ते तेवढेच मजबूत असून त्याची प्रकाश, बैठक, स्वयंपाक, शिकार, थंडपाणी अशा सर्व व्यवस्था पाहण्यालायक आहेत.

1 जानेवारी 1954 ला भारतीय रेल मंत्रालयाने बार्शी लाइट रेल्वे कंपनी विकत घेतली. पुढे काही ठिकाणी तिचा मार्ग बदलला मात्र लातूर उस्मानाबाद परिसरातील लोकांना रामलिंगच्या स्टेशनशिवाय या गाडीत बसल्याची मजा कधीच येणार नाही. आजही काही ठिकाणी जुने रूळ, स्टेशनच्या नावाचे फलक तसेच पडून आहेत. त्याकडे पाहिल्यानंतर तो कळाकुट्ट धूर, इंजिनची शिट्टी, कोळसा टाकतानाचा ड्रायव्हर आणि इंजिनमधले निखारे आठवले की, देवाच्या गाडीच्या आठवणी ताज्या होतात. या यादगार क्षणाचे सर्व श्रेय जाते, एव्हरार्ड कॅल्थरॉप नावाच्या ध्येयवेड्या इंजिनीअरला, ज्याने भारतात 2 फूट 6 इंच रुंदीच्या रेल्वेचा प्रयोग करून तो सत्यात उतरविला.

**प्रा. डॉ. सतीश कदम**


















# मोराची कुत्र्यांच्या तावडीतून सुटका करत केले वनविभागाच्या स्वाधीन



आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** शिवारात शेकटा रोडवर जखमी अवस्थेत आढळलेल्या मोराला बिडकिन पोलीसामुळे जीव वाचला. बिडकीन शिवारात शेकटा रोडवर जखमी अवस्थेत आढळला. सविस्तर माहिती अशी की शेकटा रोडवरून येणाऱ्या वाहन चालकाने बिडकीन पोलीस स्टेशन येथील सपोनी संतोष माने यांना फोनवर माहिती दिली की बिडकीन शिवारात शेकटा रोडवर पाच ते सहा कुत्रे मोराचे मागे लागलेले आहे



व मोराला जखमी केले आहे ही माहिती मिळताच तात्काळ सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने, पोलीस कर्मचारी विष्णू गायकवाड, खरात मॅडम, राठोड मॅडम यांच्यासह जेष्ठ पत्रकार हसन चाऊस घटनास्थळी जावून जखमी मोराला ताब्यात घेऊन पोलीस ठाणे बिडकीन येथे घेऊन आले व त्याच्यावर प्रथमोपचार करून वन विभागाला माहिती देण्यात आली. बिडकीन पोलिसांच्या सतर्कतेमुळे जखमी मोराचा वाचला प्राण. आज सकाळी 11 वाजता दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांना माहिती मिळाली की शेकटा रोड लगत रोड लगत सहा कुत्रे मोरावर हल्ला करीत असल्याचे मोर जखमी झाला मात्र ये जा करणाऱ्या  लोकांनी कुत्र्यांना हुसकावून लावले व पोलिसांना कळवले सपोनी माने यांच्या मार्गदर्शनाखाली जखमी मोराला वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# वीज कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी कामगार महासंघ आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वीज उद्योगाच्या खाजगीकरणाची चर्चा असताना विद्युत कंपन्यांचे व्यवस्थापन कामगारांच्या जिव्हाळ्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष करीत आहे. याच वीज कामगार महासंघाने द्वारसभा घेऊन निषेध केला. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र  आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

विद्युत कंपन्यांचे खाजगीकरण होऊ नये यासाठी वीज कामगार प्रसंगी आपला जीव धोक्यात घालून थकबाकी वसूल करीत आहेत तर दुसरीकडे राजकारणी आपल्या उद्दिष्टांसाठी महावितरणच्या अस्तित्वाला छेद देत वीज कामगार करीत असलेल्या प्रयत्नांवर पाणी फेरत आहेत. तत्कालीन ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी सरकार कोसळण्याच्या काही दिवस अगोदर अदानी उद्योगसमूहासोबत हजारो कोटीचा करार केला व मागच्या दाराने खाजगी भांडवलदारांना मुक्त संचार या वीज उद्योगात दिल्याचे ताजे उदाहरण आपल्यासमोर आहे याचा महासंघाने तीव्र निषेध केला. एकीकडे केंद्र सरकारच्या खाजगीकरण धोरणाला तत्कालीन राज्य सरकारचा विरोध असल्याचा आव आणायचा व दुसरीकडे दुप्पट वेगाने खाजगीकरणाच्या दिशेने वाटचाल करायची, खाजगी करार करायचे, जलविद्युत प्रकल्प भाडेतत्वाची मुदत संपल्यावर देखभालीसाठी खाजगी कंपन्याकडे सोपवण्याचे निर्णय, घ्यायचे या दुटप्पी धोरणाचा परिणाम सर्वसामान्याच्या वीजबिलात वाढ होताना आपल्याला दिसत आहे, असे द्वारसभेत मार्गदर्शन करताना वाल्मीक निकम (झोन सचिव), दादाराव वाघमोडे (अध्यक्ष), बाबुराव शिंदे यांनी सांगितले. कोणत्याही राजकीय उद्दिष्टांसाठी हे आंदोलन नाही. कारण आपल्या पक्षांच्या राजकीय स्वार्थासाठी कामगारांना व जनतेला वेठीस धरणे भारतीय मजदूर संघास व वीज कामगार महांघास मान्य नाही. वीज उद्योगातील धोरणात्मक विषयांसोबतच कामगारांच्या जिव्हाळ्याचे अनेक विषय तिन्ही कंपन्यामध्ये दुर्लक्षित



आहेत. काही विषय असे आहेत की, ज्यात प्रत्येक कंपनीचा वेगळा नियम आहे. मृत कामगारांच्या वारसास नोकरी देण्यात अक्षम्य विलंब होत आहे, नोकरी मिळेपर्यंत वारसांना दिला जाणारा निर्वाह भत्ता अतिशय तुटपुंजा आहे व तोही ठराविक वयानंतर बंद केला जातो. लाईन स्टाफ/जनमित्र यांच्यावर अनेक कामे लादली जात आहेत. त्यामुळे जनमित्र प्रचंड दबावात आहे. 24 तास जबाबदारी असूनही ज्यादा कामाचा मोबदला दिला जात नाही. उलट प्रतिकूल परिस्थितीतही जनमित्र वसुलीसह इतर दैनंदिन सेवा अव्याहतपणे देत आहे. वसुली कमी झाली तर कारवाई केली जाते. महावितरणमध्ये ज्येष्ठ यंत्रचालक पदाची निर्मिती करावी ही खूप जुनी मागणी अद्यापही प्रलंबित आहे. तिन्ही कंपन्यांमध्ये अनेक जागा रिक्त आहेत व दरमहा त्यात भर पडत आहे. कंत्राटी कामगारांचे शोषण होत आहे. त्यांना शाश्वत रोजगार देऊन कंपन्या सेवेत जुन्या एनएमआर धर्तीवर सेवेत घ्यावे कारण एकीकडे कामाचा बोजा वाढत आहे तर दुसरीकडे रिक्त जागा वाढत आहेत. रिक्त जागा ह्या प्रथम पदोन्नतीने भराव्यात नंतर कंत्राटी कामगारांना एनएमआर म्हणून सामावून घ्यावे व उर्वरित जागा सरळ भरतीद्वारे भरण्यात याव्यात. बदली धोरण समान असावे व त्यात पक्षपात होऊ नये.

सौर ऊर्जा प्रकल्प महानिर्मितीद्वारे चालविण्यात यावे. एम.ओ.डी. स्पर्धेत टिकण्यासाठी उत्तम प्रतीचा कोळसा खरेदी केला जावा व अन्य अनावश्यक खर्च टाळला जावा.  महापारेषण कंपनीत अभियांत्रिकी पदविकाप्राप्त कामगारांना कनिष्ठ अभियंता होण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी. सर्वेक्षण श्रेणी १ व २ ला पूर्वीप्रमाणे पदोन्नती दिली जावी. तांत्रिक कामगार आकृतीबंध फायनल करताना कामगार महासंघास जे आश्वासन दिले होते, त्यानुसार ऑपरेटिंग स्टाफ व लाईन स्टाफला शक्यतो कामात बदल होणार नाही अशा ठिकाणीच पोस्टिंग दिले जावी. महावितरणच्या जनसंपर्क संवर्गातील अधिकाऱ्यांचे अपग्रेडेशन करण्यात यावे या व इतर अनेक मागण्याकडे शासन व व्यवस्थापनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र वीज कामगार महासंघाने व्यवस्थापनाला नोटीस दिली होती. परंतु व्यवस्थापनाने सकारात्मक  प्रतिसाद न दिल्याने २१ जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्रात, सर्व सर्कल, झोन व पॉवर स्टेशनसमोर प्रचंड निषेध सभांचे आयोजन करून शासनाला व  व्यवस्थापनाला कामगारांमध्ये असलेल्या असंतोषाची जाणीव करून दिली व ह्या असंतोषाची जर वेळीच दखल घेतली नाही तर मात्र २७ जुलै रोजी महावितरणचे मुख्य कार्यालय मुंबई येथे तीव्र धरणे आंदोलन केले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या द्वार सभेस तुषार भोसले (प्रादेशिक अध्यक्ष), ज्ञानेश्वर हातकंगणे (कोषाध्यक्ष), धुराजी जैवळ (संघटनमंत्री), दादाराव वाघमोडे (औरंगाबाद परिमंडळ अध्यक्ष), वाल्मीक निकम (औरंगाबाद परिमंडळ सचिव), प्रेमसिंग डोबाल (औरंगाबाद परिमंडळ उपाध्यक्ष), अण्णा ताठे (औरंगाबाद परिमंडळ उपाध्यक्ष), नितीन गरुड, संजय दळवी, बाबुराव शिंदे, न्यायधिश, धनंजय वझुरकर (औरंगाबाद परिमंडळ संघटनमंत्री), गणेश दाभाडे, विजय मेटे, कृष्णा ताडे, नितीन खाजेकर, पांडुरंग धांडे, पुंडलिक सपकाळ, सपना मुक्कावर, रसिका कुलकर्णी, सीमा कोलते, कविता सराफ, किरण भदर्गे, सुरेखा दौड, रुपाली कोरडे यांच्यासह मोठ्या संख्येने औरंगाबाद परिमंडलातील शहर मंडळ, गंगापूर उपविभाग, पैठण उपविभाग, वैजापूर उपविभाग,ग्रामीण उपविभाग-१ व २, कन्नड, पिशोर, फुलंब्री, सिल्लोड, खुलताबाद येथील विविध स्तरावरील महावितरण कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते.



















